ग्रं. सं. ठाणे
७०२३
८१२५
नं. नं.
२२०
६८८

संगीत

# विश्वमंगल

( नवीन मराठी नाटक )

लेखक

प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले
न्यू पूना कॉलेज

नवीन किताबखाना, पुणें, येथें
पुस्तकें मिळतात

—:०:—

किंमत एक रुपया

# कांहीं अभिप्रायांचा सारांश.

### प्रो. शिवराम महादेव परांजपे.

प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं हें नाटक फार मार्मिकपणानें रचिलें आहे. प्रो. लेले शास्त्री हे संस्कृत व मराठी या दोन्हीही भाषांतील प्रभुत्वाबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यांचें काव्यरचनाकौशल्य या नाटकांत अनेक ठिकाणीं दिसून येत आहे. यांतील पद्यरचना शुद्ध, सरळ व उत्तानार्थ-वाचक असून मार्मिक व मधुर आहे. या नाटकाचे प्रयोग रंगभूमीवर पहावयाला तर चांगलेच होतील, पण तूर्त हें पुस्तक एक काव्य या दृष्टीनें वाचण्यालाही मनोरंजक व बोधप्रद झाल्यावांचून राहणार नाहीं.

### रा. नरसिंह चिंतामण केळकर.

'विश्वमंगल' नाटक मीं समग्र वाचिलें. याची भाषा प्रौढ व सुसंस्कृत आहे. हिमवान् व शंकर यांसंबंधीं उपयोगांत आणलेल्या जुन्या व नव्या काव्यकल्पना मनोहर आहेत. प्रस्तुत नाटकाच्या मिषानें एक Romantic कथानक पुढें आणिलें गेलें ही महत्त्वाची गोष्ट आहे. काव्य या दृष्टीनें कुमारसंभव न वाचलेल्या लोकांनीं प्रस्तुतचें नाटक वाचल्यास कालिदासाच्या कित्येक उत्कृष्ट कल्पनांशीं त्यांचा परिचय होईल यांत संशय नाहीं; व ही गोष्ट मराठी भाषेच्या दृष्टीनें हिताची व इष्टच आहे. यांतील विनोदप्रवेश वगळले असतां विशुद्ध classical स्वरूपाच्या दृष्टीनें शापसंभ्रमाच्या पंक्तीला हें नाटक बसूं शकेल.

### प्रो. पांडुरंग वामन काणे.

नाटकाची भाषा शुद्ध व प्रौढ आहे. पद्यें सुबोध व अर्थपूर्ण आहेत. कवि-कुलगुरूच्या काव्यनाटकांतील रम्य विचार यांत सहज ओघानें आणून सोडले आहेत. प्रस्तुत प्रयत्न अभिनंदनीय आहे.

### श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

संगीत विश्वमंगल हें नाटक मीं साद्यंत वाचिलें. त्यांतील पदांची रचना संगीत नाटकास शोभेशी सुबोध व सरस झाली आहे. 'नव्या वस्तूचें०,' 'शोधुनि रवि घेई०,' इत्यादि पदें तर फार सरस वठलीं आहेत. गद्य भाषाही शुद्ध, सुंदर,

प्रौढ व अलंकारिक अशीच आहे. जागोजाग आढळणाऱ्या बहारीच्या कोट्या-कल्पनांवरून नाटककारांचा संस्कृत काव्यग्रंथांशीं व साहित्यशास्त्राशीं मार्मिक परिचय असलेला दिसून येतो. मेनकेनें केलेलें शिवाच्या तपोवनाचें वर्णन, इंद्रानें केलेली कामदेवाची स्तुति, निरंजन मुनीनें केलेलें उत्पातांचें वर्णन, पर्णाशनानें केलेलें पार्वतीच्या तपाचें वर्णन, विजयेनें केलेलें पार्वतीच्या क्लेशाचें वर्णन, हिमवान् व वसिष्ठ यांनीं केलेलें परस्परांचें माहात्म्य-वर्णन इत्यादि स्थलांवरून या नाटकांतील भाषेच्या व कल्पनांच्या सौंदर्याची योग्य कल्पना करतां येईल. या नाटकांतील अनेक स्थलांवरून नाटककारांस कोटि व विनोद हे दोन्ही हास्यरस-प्रकार चांगले साधतील असें वाटतें.

## श्रीयुत सीताराम वासुदेव पेंडसे.

प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं रचिलेलें नवीन नाटक ' विश्वमंगल ' हें आम्हीं समग्र वाचलें. दृश्यकाव्य-क्षेत्रांतील प्रोफेसरसाहेबांचा हा पहिलाच प्रवेश या दृष्टीनें ही कृति फारच चांगली उतरली आहे यांत संशय नाहीं. भाषा रसाळ व सुबोध असून हवी त्या प्रसंगीं विनोदपूर्ण व ठसकेदार आहे. मुख्य पात्रांच्या महोदार चरितांना योग्य अशी ओजस्वी आहे. पद्यें सुंदर व मधुर आहेत. पार्वतीच्या तपश्चर्येचें वर्णन कुमारसंभवाच्या अनुरोधानें केलें असून तितकेंच हृदयंगम वठलें आहे. एखाद्या नांवाजलेल्या नाटकमंडळीनें हें नाटक रंगभूमीवर आणल्यास सहज लोकप्रिय होईल असें वाटतें.

## ज्ञानप्रकाश, ता. ३०–८–१९२३.

विवाहाचें उदात्त स्वरूप हें नाटक लक्ष्यपूर्वक वाचणारांच्या मनावर बिंबल्याशिवाय राहणार नाहीं. जुन्या कथेचें वैशिष्ट्य बिघडूं न देतां तिला नवीन व समाजोपकारक विचारांचा पेहेराव चढविण्यांत प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं दाखविलेलें कौशल्य वर्णनीय आहे. वैवाहिक प्रेम शुद्ध व सात्त्विक स्वरूपाचें असलें पाहिजे, समाजाची कामगिरी करण्यासंबंधांत आपली कार्यक्षमता वाढावी हाच उदात्त हेतु विवाहाच्या मुळाशीं असला पाहिजे हें विश्वमंगल प्रमेय सर्वांच्या मनावर ठसावें अशीच नाटकाची एकंदर रचना केलेली आहे. नाटकांतील संवादच काय, पण संवादाच्या भाषेंतील रूपक, उपमा वगैरे योजलेले अलंकारही याच प्रमेयास पोषक आहेत ही गोष्ट वाचकांच्या तेव्हांच लक्ष्यांत येईल. संगीत नाटक या दृष्टीनें या नाटकांतील पद्यसंख्या सुमारें पन्नास आहे, ही अल्प आहे. पण

हा दोष नसून गुणच आहे असें आम्ही समजतों. गद्याचा ओघ चालतां चालतां ज्या ठिकाणीं खरोखर एखादी बहारीची कल्पना किंवा भावना व्यक्त करावयाची असेल त्या ठिकाणींच पद्याची योजना स्वाभाविक दिसते. या गोष्टीकडे प्रस्तुत नाटकांत पूर्ण लक्ष्य दिलेलें दिसून येत आहे. प्रौढ भाषा, प्रगल्भ विचार, उच्च दर्जाचा विनोद वगैरे गुणांनीं जसें हें नाटक रसिकांच्या प्रशंसेस पात्र होईल त्याप्रमाणेंच सुगम व सरस पद्यरचनेच्या योगानेंही तें काव्याभिज्ञ वाचकांना पसंत पडेल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

## श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे.

विश्वमंगल नाटक वाचून मनाला संतोष वाटला. सध्याच्या काळीं महाराष्ट्रांतल्या नाट्यसृष्टींत बरीच अराजकता माजलेली आहे. लेखकांना कसलेंही बंधन राहिलेलें नाहीं. औचित्यभंग पदोपदीं घडत आहे. अशा वेळीं शास्त्रकारांनीं दूर दृष्टीनें घालून दिलेले व अनुभवानें हितकर ठरलेले नियम यथासांग पाळून लिहिलेलें प्रस्तुतचें नाटक माझ्या मनाला विशेष संतोषकारक व आदरणीय वाटलें. समाजाच्या दुर्दशेचें चित्र दाखविणारीं सध्यां रंगभूमीवर धुमाकूळ घालीत असलेलीं नाटकें पाहिल्यानंतर 'विश्वमंगला'-सारखें नाटक वाचल्यानें जी मनाला एक प्रकारची प्रसन्नता येते ती मुंबईतल्यासारख्या गजबजलेल्या, दुर्गंधियुक्त, रोगोत्पादक हवेंतून निघून माथेरानासारख्या शांत, स्वच्छ आणि आरोग्यदायक हवेंत गेल्यानें मनाला येणाऱ्या प्रसन्नतेसारखी वाटते. हल्लीं कित्येक नाटककार नाटकाला एखादी पौराणिक कथा घेऊन तत्कालीन समाजस्थिति, आचारविचार व पात्रांचे स्वभाव यांच्याशीं पूर्णपणें विसंवादी अशा सद्य:कालीन प्रकारांची भेसळ करितात ही चूक या नाटकांत बिलकुल झालेली नाहीं. या नाटकाची मांडणी सशास्त्र, पात्रांच्या तोंडीं घातलेली भाषा त्यांच्या उदात्त स्वभावानुरूप प्रौढ व त्यांच्या तोंडीं घातलेले विचार त्यांना साजतील असेच आहेत.

## R. V. P.

'विश्वमंगल' नाटक खरोखरीच अत्युत्कृष्ट वठलें आहे. पण त्यांतील सूत्रधारानें म्हटल्याप्रमाणें तें बहुधा पंडितजनांच्या हृदयालाच रमवील अशा दर्जाचें आहे. त्यांतलि संविधानक, कल्पना व भावना इतक्या उच्च प्रतीच्या आहेत कीं, त्या वाचतांना मनोविकार सहज उद्दीपित होऊन वाचक क्षणभर तन्मय होतो.

त्यांतील स्थलवर्णनें व इतर कांहीं प्रसंगांचीं वर्णनें फारच बहारीचीं आहेत.

हल्लीं जनाभिरुचीला केवळ हंगामी व बाष्कळ नाटकांमुळें कांहीं चमत्कारिक वळण लागलें आहे. त्यामुळें ' विश्वमंगल ' नाटकासारख्या भारदस्त व विद्वत्ताप्रचुर कृतीस लोकाश्रय मिळणें जरा कठिणच आहे. लोकप्रियतेचा दर्जा व किंमत, सध्यांच्या जर्मन मार्कासारखी, कवडीमोल झाली आहे. प्रस्तुत नाटककारांनीं सवंग लोकप्रियता संपादन करण्याच्या मोहास बळी न पडतां, नाटक म्हणजे अश्लील–विनोदप्रधान किंवा निरर्गल शृंगाररसभरित कल्पनांनीं मनोवृत्ति क्षणैक उच्छृंखल व उन्मत्त करून सोडणारें असें भाटांचें भारूड नाहीं, ही गोष्ट सक्रिय सिद्ध करून दाखविली आहे. प्रस्तुत नाटक वाचतांना शुद्ध, सात्विक व उच्चतम वातावरणांत आपण संचार करीत आहों असें वाचकांस वाटल्याशिवाय राहात नाहीं; व त्यामुळें त्याचें मन फार प्रसन्न होतें. पद्यरचना तर सर्वत्रच प्रसन्न व हृदयंगम आहे.

## ' नाट्यलालुप '

प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले यांची अभिनव नाट्यकृति अर्थात् ' विश्वमंगल ' वाचून आनंद वाटला व खेदही झाला ! शुद्ध व सुंदर भाषा, उदार व उदात्त विचार, प्रसन्न पद्यरचना, चमत्कृतिजनक विनोद, ऐटदार व ठसकेदार संभाषणें, मधुर निसर्गवर्णनें, विविध पात्रस्वभाव, इत्यादि प्रशंसनीय गुण या कृतींत दिसून येतात. यामुळें मन फार प्रसन्न होतें व आनंद वाटतो. पण असल्या उच्च व उदात्त प्रकारच्या नाटकाचें चीज आजच्या रंगभूमीवर कितपत होईल याविषयीं मन साशंक होऊन त्याला खेद वाटूं लागतो ! प्रस्तुतच्या पुस्तकानें मराठी नाटकीय वाङ्मयांत फार सुंदर भर घातली आहे ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे.' काव्यं यशसे ' ही मम्मटोक्ति विश्वमंगलानें चरितार्थ केली आहे. पण ' काव्यमर्थकृते ' या वचनाचा अनुभव घेण्याची प्रो० लक्ष्मणशास्त्री यांस इच्छा असेल तर त्यांनीं सामान्य जनतेला समजतील, पटतील व आवडतील अशीं ऐतिहासिक व सामाजिक नाटकें आपल्या प्रसन्न व रसमय वाणीनें व उज्ज्वल प्रतिभेनें निर्माण करावीं अशी माझी त्यांस सप्रेम विनंति आहे. विश्वमंगलाच्या प्रस्तावनेवरून प्रोफेसर मजकूर नाट्यमाला गुंफणार असें दिसतें. म्हणून मित्रभावानें ही सूचना मीं केली आहे.

———

संगीत

# विश्वमंगल

( नवीन मराठी नाटक )


लेखक

**प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले**

न्यू पूना कॉलेज, पुणें.


“ धातूंत जसें हाटक नाटक वर तेविं सुप्रबंधांत. ”

—मोरोपंत..


शा. श. १८४५ ] पुस्तकें मिळण्याचें ठिकाण [ इ. स. १९२३

**नवीन किताबखाना, बुधवार चौक, पुणें सिटी.**

**किंमत एक रुपाया.**

प्रकाशक

प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले, न्यू पूना कॉलेज, बुधवार पेठ, पुणें.

मुद्रक

रा. लक्ष्मण भाऊराव कोकाटे, 'हनुमान' प्रेस, सदाशिव पेठ, पुणें.

---

**सूचनाः—**( प्रस्तुत नाटकाचा प्रयोग, भाषांतर वगैरेचे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणांकडे राखून ठेविले आहेत. त्यांसंबंधीं पत्रव्यवहार करणें झाल्यास तो प्रकाशकांच्या नांवानें त्यांच्या पत्त्यावर करावा. )

# संगीत विश्वमंगल

---:o:---

## प्रास्ताविक शब्द.

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थ–प्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वती–परमेश्वरौ ॥–कालिदास

दृश्य काव्य ( नाटक ) प्रयोग-रूपानेंच पहावयाचें असल्यामुळें, इतर म्हणजे श्रव्य काव्यापेक्षां अधिक परिणाम करणारें असतें, एवढेंच नाहीं तर तें एकाच वेळीं हजारों प्रेक्षकांचें रंजन व प्रबोधन करूं शकतें. या दृष्टीनें श्रव्य--काव्यापेक्षां दृश्य काव्य समाजशासनाचें बलवत्तर व अधिक कार्यक्षम साधन आहे. अशा प्रकारच्या वाङ्मयाची उपासना करून पाहावी या हेतूनें आम्हीं हा उपक्रम केला आहे.

प्रस्तुत नाटकांत शिवाचा पार्वतीशीं विवाह वर्णिला आहे. हा अखिल विश्वाच्या मंगलास कारण झाला, म्हणून याला ' विश्वमंगल ' असें नांव आम्हीं दिलें आहे. शिवविवाहाची कथा जुनीच आहे. कित्येक पुराणग्रंथांत व विशेषतः कविकुल-गुरूच्या कुमार-संभव काव्यांत ती मोठया हृदयंगम रीतीनें वर्णिली आहे. हा विवाह अनेक प्रकारांनीं विचार करण्यासारखा आहे;आणि विवाह-संस्था समाजाचें मूळ आहे. म्हणून हा कथाभाग समाजापुढें नाटक-रूपानें आणावा अशी आमची फार वर्षांची इच्छा होती. गेल्या वैशाखांत तिला दृश्य स्वरूप येण्याचा योग आला. आज पुस्तक--रूपानें हा प्रयत्न रसिक वाचकांपुढें प्रकट होत आहे.

नाटकरचनेच्या दृष्टीनें या पुस्तकांत अनेक नवीन प्रसंग व पात्रें कल्पिलीं आहेत. परंतु जुनीं प्रसिद्ध पात्रें रेखाटतांना तीं विकृत दिसूं नयेत याविषयीं फार काळजी घेतली आहे. यांतील जुन्या सुंदर कल्पनांचें श्रेय कविकुल-गुरूकडे आहे. यांत नवें कांहीं असलें तर त्याची सर्व जबाबदारी आमच्यावर आहे. नाटकाचें संविधानक अगदीं सरळ व साधें आहे, म्हणून तें येथें दिलें नाहीं.

नाटक-ग्रंथ प्रायः प्रयोगाकरितांच रचितात. हें नाटकही त्याच हेतूनें आह्मीं लिहिलें आहे. तेव्हां हें रंगभूमीवर आलें ह्मणजे याचा जन्म सफल झाला असें होणार आहे. पण हा योग परावलंबी आहे हें वाचकांस सांगणे नकोच. सध्यां श्रव्य काव्याप्रमाणेंच रसिक वाचकांनीं याचा परामर्ष घ्यावा अशी त्यांस आमची विनंति आहे. एकाद्या चांगल्या मराठी नाटक-मंडळीनें याचा प्रयोग करण्याचें मनांत आणिल्यास या पुस्तकाची वेगळी रंगावृत्ति लोकरंजनार्थ काढण्याचा आमचा विचार आहे.

प्रस्तुत नाटकांतील पदांचे राग व चाली ठरविण्याच्या कामीं कित्येक संगीतज्ञ व संगीत-प्रिय मित्रांनीं मदत केली याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानितों.

न्यू पूना कॉलेज, पुणें.
ऑगस्ट, १९२३.

लक्ष्मणशास्त्री लेले.

# नाटकांतील पात्रांची यादी.

१ हिमवान् ( राजा )—हिमालयाची देवता.
२ शिव—कैलासाधिपति, शंकर.
३ मैनाक - हिमवानाचा मुलगा.
४ वसिष्ठ –सप्तर्षींपैकीं एक.
५ नारद —प्रसिद्ध देवर्षि.
६ इंद्र—स्वर्गाचा अधिपति.
७ कामदेव—मदन.
८ पर्णाशन—शिवाचा तपस्वी मित्र.
९ निरंजन—एक परमहंस.
१० पद्मनाभ—पर्णाशनाचा शिष्य.
११ विद्याधर } —गंधर्व.
१२ प्रियंवद }
१३ शृंगी } —शिवाचे परिचारक.
१४ भृंगी }
१५ तारकासुर—वज्रांग--दैत्याचा बलाढ्य पुत्र.
१६ विकटोदर – तारकासुराचा मुख्य प्रधान.
१७ रहस्यपाल—तारकासुराचा खाजगी मंत्री.
१८ महिषासुर —तारकासुराचा सेनापति.
१९ विजयसेन—विजयेचा पति.
२० यज्ञेश्वरदीक्षित – राजोपाध्याय.
२१ कपिलाचार्य – मथुरेचा पंडित.
२२ मेना—राणी, हिमवानाची स्त्री.
२३ अरुंधती--वसिष्ठाची पत्नी.
२४ पार्वती—मेनेची व हिमवानाची मुलगी.
२५ जया } --पार्वतीच्या सख्या.
२६ विजया }
२७ बकुलावलिका } —पार्वतीच्या दासी.
२८ वासंतिका }
२९ मेनका--प्रसिद्ध अप्सरा.
३० रंगूबाई--यज्ञेश्वराची तिसरी बायको.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २२४६
ग्रं. शाखा

श्री ग्रंथ संग्रह
वा. नो. १८०
२५५८

संगीत

# विश्वमंगल

## अंक पहिला

### प्रस्तावना

( सूत्रधार व पारिपार्श्वक प्रवेश करितात )

नान्दी

( राग यमन; ताल धुमाळी. )

श्री-जगदंबा-रमण-पदांला । अर्पण करितों प्रणाम-माला ॥
प्र-मुदित करिती तीं विश्वाला । सुर-गण मुनि-जन वंदि तयांला ॥ध्रु०॥
रंगविती तीं संसाराला । दाविति त्यांतिल मधु भावांला ।
परिणय-संस्कृति-रीती विमला । शिकविति सुखविति सकल-जनाला ॥१॥

( पारिपार्श्वक निघून जातात )

**सूत्रधार**—अहाहा ! केवढा आनंदाचा दिवस हा ! भगवान् चंद्रमौली महाकालेश्वर याच्या यात्रेनिमित्त या ठिकाणीं आज केवढा तरी मोटा समाज लोटला आहे ! याच्या दर्शनानं मी खरोखरी धन्य झालों. यांत अनेक विद्वान् व रसिक लोक आहेत. तसंच या जनसमुदायांत कित्येक आर्य कुलवधू आपल्या कोमलमति बाल-बालिकांसह आलेल्या दिसत आहेत. अशा या मिश्र व भिन्नरुचि आबालवृद्ध प्रेक्षकांचं योग्य प्रकारें रंजन करून त्यांची सेवा करावी अशी माझी इच्छा आहे. नाटक नवीन असून उदार व उदात्त भावनांनीं अलंकृत असावं अशी या नांदीनें सुप्रसन्न झालेल्या सभेची आज्ञा आहे. प्रेक्षकांना नाटक नवं हवं आहे ही त्यांची इच्छा साहजिक व योग्य नाहीं असें कोण म्हणेल ? पण ही नव्याची आवड जुनीच आहे. पहा,

दिंडी ( राग–लीलांबरी, ता० दादरा )

नव्या वस्तूचें प्रेम फार वाटे ।
पाहुनी ती जनमनीं मोद दाटे ॥
शुक्रपक्षीं पहिलीच चंद्रकोर ।
कौतुकानें पाहती सान थोर ॥ १ ॥

पण नाटकाच्या नवेपणाला उदार व उदात्त कल्पनांची जोड पाहिजे अशी या सभेची अपेक्षा आहे. पर्यायानं आम्हां नाटकमंडळ्यांवर ही अंमल खोंचदार टीकाच आहे ! अस्तु. रसिक समाजाची आज्ञा आम्हांस पाळलीच पाहिजे कारण, समाजाकरितां आम्ही, आमच्याकरितां समाज नव्हे, हें आम्हीं विसरतां कामा नये. बरं पण, या प्राप्त झालेल्या जबाबदारींतून आपण मुक्त कसं होणार ? ( कांहीं सुचल्यासारखें दाखवून ) खरंच, आपल्याला आज पाहिजे तसं नाटक आठवलं बोवा !

साकी. ( राग–जोगी, ताल धुमाळी )

गणेश–तनय प्रसिद्ध लक्ष्मण–कवि काश्यप–कुलिं झाला ।
नव नाटक–कृति रमवि तयाची पंडित–जन–हृदयाला ॥
वाटे आजि मना, दावावी ती रसिक–जना ॥ १ ॥

( सूत्रधाराचें वचन ऐकून प्रवेश करून )

**मारिष**—महाराज, या नव्या नाटकाचं नांव काय रं ?

**सूत्रधार**—याचं नांव विश्वमंगल. हें किती तरी गोड आहे !

**मा०**—हें कवीनें कशाकरितां रचिलं आहे व यांत कथाभाग काय आहे ?

**सूत्र०**—विवाह या आर्य व पवित्र संस्थेचं खरं स्वरूप समाजाला कळावं शुद्ध व सात्त्विक प्रेमाची त्यास कल्पना यावी, व संसाराचं रहस्य व रमणीयता हीं त्यास समजावीं असा त्याचा उदात्त हेतु आहे. याकरितां जगाच्या परम पावन मातापितरांचं, अर्थात् पार्वती व शिव यांचं, विवाहमंगल आदर्शरूपानं यांत कवीनें वर्णिलं आहे. या विवाहानें सगळ्या विश्वाचं मंगल झालं म्हणून याला विश्वमंगल असं यथार्थ नांव कवीनें दिलं आहे. असो. मुख्य काळजी दूर झाली. आतां पात्रांच्या योजनेकड नीट लक्ष दे. तोंपर्यंत मी प्रियेला सभेची थोडी सेवा सांगतों.

**मा०**—ठीक आहे. आपल्या आज्ञेप्रमाणं व्यवस्था करितों. ( जातो )

**सू०**—( बाजूकडे पाहून ) प्रिये, थोडी इकड ये पाहूं. ( प्रवेश करून )

**नटी**—इतक्या निकडीनं कां इकडं बोलवायचं झालं ! काय आज्ञा आहे ?

**सू०**—अग, या सभेपुढं आज एका नव्या नाटकाचा प्रयोग व्हावयाचा आहे. त्याला आतां लौकरच आरंभ होईल. तोंपर्यंत आपल्या मधुर गाण्यानं या रसिक प्रेक्षकांची थोडीशी सेवा कर पाहूं.

**नटी**—माझी तयारी आहे.

**सू०**—हा पहा, हेमंत ऋतु विलास करतो आहे, यालाच अनुलक्षून गा, असं तुझ्यासारख्या रसिकेला सांगणं नकोच. याचं सौंदर्य अप्रतिम आहे. पहा यांतील चमत्कार;

अंजनीगीत ( राग झिंजोटी, ता. धुमाळी ):

सुखविति तनुला अतिशय रविकर, क्षेत्रें विलसति शालि-मनोहर,<br>
जनपदिं गो-रस दिसति विपुलतर, रुचिकर फलधान्यें.<br>
दुंदुभि ठोकुनि वीर महीपति, दिग्विजयाला बाहिर पडती,<br>
अहा ! समय हा उपजवि रणरति, बहु त्यांच्या हृदयीं.

**नटी**—आणखी दुसऱ्या किती तरी मौजा या कालांत दिसत आहेत ! पहा,

( राग ललितगौरी, ता. धुमाळी )

दिन–मणि दाक्षिण-दिंगगनेवरि प्रणय-दृष्टि बहु करी<br>
दुःखी उत्तर ती अंतरीं ॥ ध्रु० ॥<br>
इंदु–बिंबही श्वास-मलिनशा दिसते मुकुरापरी<br>
पसरे हिम–कण-तति त्यावरी ॥<br>
दीर्घ यामिनी पथिक–कामिनिस विरह–व्याकुल करी<br>
क्लेशा कवण तिच्या परिहरी ? ॥

( चा. दु. )

बघ कसे विहंगम हंस मधुप सारस,<br>
उगवतां भानु तो चाखिति लीलारस,<br>
चहुंकडे भूवरी दिनकर वितरी रस,<br>
सार्थ होतसे हिमकोशानें नगेन्द्र तो हिमगिरी ॥ दुःखी० ॥

**सू०**—शाबास प्रिये ! तुझ्या या रागबद्ध आलापांनीं ही सभा नागकन्ये-प्रमाणं डोलत आहे ! ( बाजूकडे नजर टाकून ) पण ही या बाजूला कोणाची चाहूल येत आहे बरं ? ( थोडा विचार करून ) हं समजलों. ही पहा जगज्जननी

अंबिका—जिला लोकांत पार्वती या नांवानें विशेष ओळखतात ती—आपल्या सख्या जया व विजया यांसहवर्तमान हिमालयावरील ओषधिप्रस्थ राजधानीजवळच्या प्रमदवनांत फिरत आहे ! इतक्यांत ही सभाजनाच्या दृष्टीस पडेल. चला आपण बाजूला जाऊं व हातीं घेतलेलं काम पार पाडूं. ( निघून जातात. )

## प्रवेश पहिला.

( स्थल—हिमालयावरील प्रमदवन; पात्रें—पार्वती, जया व विजया )

**पार्वती**— गडे विजये ! अग जये ! पाहिलास का हा सृष्टिसुंदरीचा विलास ! या प्राची—दिशेला दिव्य पुत्ररत्न झाल्यामुळंच जणुं काय जिकडे तिकडे मंगल व आनंदी आनंद दिसत आहे ! पहा,

( राग देसकार, ता० धुमाळी )

कुंकुम—सलिलें वसुंधरा ही अरुण—रंग त्याली, ॥ सख्यानों ॥
बंधन—मुक्ता मिलिंद—माला मधु-गुंजनिं रमली !
मंजु—द्विज—संगीतें अवनी नाद'वुनि गेली ॥ सख्यानों ॥
अस्तं-गत तम, सुख—कर जागृति जीवांना आली ॥ १ ॥

या पूर्व दिशेचं केवढं भाग्य हें ! सगळ्या विश्वाला जीवन देणारा व बंधमुक्त करून सुख देणारा प्रभावशाली तेजस्वी पुत्र हिला झाला ! खचित बाई ! हिच्या जन्माचं सार्थक झालं. वीरमाता होणं हें स्त्रियांना केवढं भूषण आहे !

**जया**— खरंच बाई ! बायकांचा खराखुरा अलंकार हाच आहे. ( दुसरीकडे पाहून ) अग पार्वती ! हा पहा दुसरा चमत्कार इकडे ! वेलींच्या कोंवळ्या पानांच्या टोंकांवर दवाचे बिंदु चमकत आहेत. त्यांवर सूर्याचे लाल किरण पडल्यामुळें ते माणकांसारखे दिसत आहेत. हे डाळिंबाचे दाणेच आहेत असें वाटून पोपट त्यांवर चंचुप्रहार करीत आहेत ! व फसगत होऊन दुसरीकडे उडून जात आहेत !

**विजया**—गड्यानों ! या भगवान् सहस्ररश्मीच्या प्रणयाचा हा विलक्षण प्रकार पहा ! हा एकीकडे अनुरागिणी प्राचीचें चुंबन करीत आहे व दुसरीकडे आपल्या कोमल करांनीं वसुंधरादेवीला आलिंगन देत आहे !

**पार्वती**—स्त्री काय किंवा पुरुष काय तिचं किंवा त्याचं प्रेमाचं स्थान एकच असणं योग्य आहे. प्रेमाचे अनेक भागीदार असणं ही गोष्ट केव्हांही प्रशंसनीय नाहीं. पहा,

( राग कालंगडा, ता. धुमाळी )

आम्र-मंजरी चुंबुनि तिजला झिडकारुनि मधु-प हा
झोंबतो कुंद-कळीला पहा !
प्रेम काय हें ! सगळी थट्टा ! बालिश बहु हा अली,
पाहिजे शिक्षा या चांगली !

**जया**—हा पवन तरी कसा धटिंगण आहे पहा ! स्त्रियांशीं मर्यादेनं वागणं त्याला ठाऊकच नाहीं बाई ! पहा, त्या पुष्पित लतांशीं तो किती झगडत आहे व त्यांना व्याकुळ करून सोडीत आहे ! त्या मेल्याला लज्जा नाहीं व दयाही नाहीं !

**विजया**—हे पक्षी व झरे आपल्या मृदु व मधुर आलापांनीं त्या दयाघन प्रभूला परोपरीनें आळवीत आहेत असं वाटतं. त्यामुळं या प्रदेशाला एकतानता आली आहे. शांतरस चहूंकडे पसरल्यासारखा दिसत आहे !

**पार्वती**—हे निर्झरांचे सर्पाकृति ओघ पाहिले काय ?

( राग अरब्बी, चाल कानडी )

शैल-कंठिं हार दिसति, मुक्तांचे धवल अति,
तेज तयांलागि किती, नयन भुलविती !
हिम-गिरिच्या विमल यशा, नेति जणों सकल दिशां,
उठति मनामाजिं अशा, विविध कल्पना !

**जया**—पार्वती ! मला वाटतं हे वृक्षरूप मुनि उदयगिरीवर आलेल्या भगवान् सवित्याला पुष्पांजलि अर्पण करीत आहेत !

**विजया**—पक्ष्यांनीं आकाशांत व गाईच्या खिल्लारानें या भूप्रदेशावर मनोहर स्वैर विहार चालविला आहे ! यांच्या योगानें हा प्रदेश सचेतन वाटत आहे.

**पार्वती**—गिरिराजाच्या अंकावर क्रीडा करणाऱ्या या नद्या पहा ! ही गंगा, ती सिंधु, ती ब्रह्मपुत्रा ! किती लडिवाळपणानं बापाशीं वागत आहेत व बापही केवढया वात्सल्यानं त्यांचे लळे पुरवीत आहे !

**जया**—अंमळ पलीकडे दृष्टि फेक पार्वति ! म्हणजे यांचं स्वरूप अगदीं वेगळंच दिसेल. गिरिराजाच्या अंकाचा विरह होतांच यांचा अल्लडपणा जाऊन या पहा किती गंभीर दिसूं लागल्या आहेत ! त्यांचे शांत व प्रसन्न ओघ पाहून त्यांच्या वृत्तींतला फरक तेव्हांच नजरेस येतो.

**विजया**—आणि पुढें रत्नाकरांत मिळाल्यीं म्हणजे तर त्यांच्या स्वरूपाचा मागमूसही लागत नाहीं !

**पार्वती**—याला म्हणावं खरं प्रेम ! पतीशीं प्रेमानं एकरूप होणं यांतच संसाराचं सगळं रहस्य आहे.

**जया**—पण त्या बिचाऱ्यांना पित्याचा एकदा वियोग झाला म्हणजे जन्मांत त्याची पुन्हां भेट नाहीं ही गोष्ट मात्र कठीण आहे बाई !

**विजया**—खरंच. प्रेमळ जनकाची ताटातूट त्यांना फार जाचत असेल बाई !

**पार्वती**—हा भगवान् सूर्य सगळ्या जगाचं कल्याण करणारा आहे. तो त्यांचीही काळजी वाहतो.

**विजया**—ती कशी ग !

**पार्वती**— ( राग खमाज, ता० गजल )

शोषुनी रवि घेइ हा जलधींतुनी स्वकरीं जळें,
अंबरीं घन–रूप त्या देई, अहा ! अपुल्या बळें ॥ ध्रु० ॥
वृष्टितें करूनी महा शैलासि भेटवि त्यां पहा,
या रीतिनें सविता करी उपकार, हें कवणा कळे ?

हे भगवंता दिनकरा ! जसं गंगा, सिंधु वगैरे कन्यांवर तुझं प्रेम, तसंच या आम्हां मुलींवरही असावं अशी तुला प्रार्थना आहे. ( हात जोडते )

**जया**—गडे पार्वती, आतां वेळ बरीच झाली. आईनें आम्हांला लवकर घरीं बोलाविलं आहे.

**विजया**—खरंच, मी अगदीं विसरलें होत्यें जये ! बरं तर पार्वती, आम्ही येतों बाई, आतां !

**पार्वती**—बरं आहे गड्यानों ! आईची आज्ञा पाळलीच पाहिजे. या हो ! मी थोडा वेळ इथंच इकडे तिकडे फिरतें. [ सख्या जातात ] सृष्टिसौंदर्यानं माझ्या मनाला केवढी तरी मोहनी घातली आहे ! ही प्रमदवनाची मौज पाहिली. आतां या जवळच्या चंपकवनांत जावं तर. [ तिकडे जाते. पडदा पडतो. ]

## प्रवेश दुसरा.

[ चंपकवन–मैनाक व पार्वती. ]

**मैनाक**—मी ताईचा शोध करीत येथें आलों. पाहातों तों ती जया–विजयांबरोबर सृष्टिसुंदरीच्या वर्णनांत निमग्न झाली आहे. त्यांच्या रंगाचा भंग न

व्हावा म्हणून मी दूर बाजूला उभा राहून त्यांचं भाषण ऐकत होतों. इतक्यांत जया-विजया झराकडे गेल्या व ताई चंपकवनाकडे निघून गेली. आतां तिला तिकडेच जाऊन भेटलं पाहिजे. ताई आपल्या मैत्रिणीशीं किती मोकळं मन करून बोलत होती, व किती आनंदांत होती !

[ राग पहाडी, ताल एका ]

चुंबित मधु कुसुमिं भ्रमरी, गाइ गान मधुर भारि,
परम मोद सतत भोगि, दुःख-कल्पना न वरि ॥ ध्रु० ॥
भानूच्या किरण-जालिं, हास्य करी कमल-वल्लि
डुलत राहि पवन-संगिं, तशिच भगिनी मम रंगली ॥ १ ॥

ताई घरीं कोणाशींच असं कधीं बोलत नाहीं. आज मला अनायासं ही तिची वृत्ति कळली. हिच्याशीं आतां हितगुज करावयाला कांहींच हरकत दिसत नाहीं. [ थोडें फिरून ] हां ! लागलंच चंपकवन हें. [ दूर पाहून ] ती ताई उभी आहे. ती कांहीं तरी गुणगुणत आहे असं दिसतं आहे. तिचं बोलणं संपलं म्हणजे पुढं जावं. ती पहा, आपल्या विचारांत अगदीं गढून गेलेली आहे ! [ तिचं बोलणं ऐकत उभा राहतो ]

**पार्वती**--[ स्वगत ] अहाहा ! येथें या वनांत चंपकमंजरींचा केवढा सुगंध सुटला आहे ! हा सगळा प्रदेश त्यानें दरवळून गेला आहे. या पुष्करिणीवर हे किती तरी पक्षी गोळा झाले आहेत, आणि कोण हा किलबिलाट त्यांनीं चालविला आहे ! अहाहा ! यांच्या कोमल आवाजाचें मिश्रण किती तरी मंजुळ आहे ! हें कलहंसांचं जोडपें पहा. काय हें यांचं प्रेम ! [ निरखून ] काय, त्यांच्याजवळ त्यांचं बालकही दिसतं आहे ! ती पहा हंसी आपल्या चोंचीनें त्यास दाणा चारीत आहे ! तिचा शीण दूर करावा म्हणून हंसही त्या पिल्लाला चारीत आहे, व मधून मधून उभयतांसही गोंजारीत आहे ! काय विलक्षण प्रेम हें !

[ राग भैरवी, ताल त्रिवट. ]

किति माधुरी विलसे संसारीं सुंदरीं पहा या ॥ ध्रु० ॥
सुख-विश्रामा करुणा-निधाना तव लीला ही न कळे सखया ! ॥ १ ॥

असाच सर्व प्राण्यांचा संसार असेल काय ? देवा ! तुझ्या योजनेची व करुणेची कल्पनाही करवत नाहीं ! ( दूर पाहून व थोडें दचकून ) काय, माझा

दादा मैनाक तेथें उभा आहे ! [ हांक मारून ] दादा, ये कीं इकडे ! [ मैनाक पुढें जाऊन ]

**मैनाक**—काय ग ताई, आज काय हें चाललं आहे ! आम्ही तर तुझं भाषण ऐकून थक्क झालों बुवा ! एरव्हीं तूं कधीं फार बोलत नाहींस, पण आज जया-विजयांबरोबर चाललेलं तुझं भाषण थोडसं ऐकलं त्यावरून मला तर खचित असं वाटलं कीं कोणा तरी पंडितेचं तें प्रवचन असावं !

**पार्वती**—तुला थट्टा करावयाला मोट्टी संधि मिळाली खरी बाबा ! म्हणतात ना अगोदरच उल्हास नी त्यांत—.त्यांतलीच गत ही. तूं जन्माचाच थट्टेखोर, आणि त्यांत मी अचूक तुझ्या तावडींत सांपडलें. चालूं दे आतां तुझी थट्टा !

**मैनाक**—बरं तें असूं दे. बाबांनीं आज तुला पार्थिवपूजेकरितां बेलफुलं आणावयाला सांगितलीं होतीं त्याचं काय केलंस तूं, हें सांग मला अगोदर.

**पार्वती**—[ एकदम स्मरण होऊन व दचकून ] अग्गबाई ! आतां काय करूं ? खरंच दादा, माझ्या हातून मोठीच चूक झाली. मी अगदीं अगदीं विसरलें बरं का. आतां बाबा काय म्हणतील बरं !

[ राग–जीवनपुरी, ताल–त्रिताल ]

सांगें मज आतां, दादा ! सांगें मज आतां,
ताताज्ञा मीं विसरुनि गेलें, प्रमाद घडला माझ्या कडोनी ॥ ध्रु० ॥
बाबा आतां मजवर करितिल कोप भीति ही उभी मनीं,
काय करूं मी आतां जेणें सोडुनि देतिल राग झणीं ॥ १ ॥

**मै०**—बाबानीं पुष्कळ तुझी वाट पाहिली. शेवटीं उपाध्यायबोवांचा मुलगा किशोर यानें कुसुमोद्यानांतून बेल व फुलं बाबांना आणून दिलीं. बाबांची देवपूजा होऊन ते आतां जपाला बसले आहेत. बाबा तुझा शोध करीत होते. म्हणून मी तुला धुंडीत इकडे आलों. पहातों तों तुमचा संवाद रंगांत आला आहे ! मग म्हटलं थोडं थांबून पुढं यावं. झालं माझं काम. येऊं आतां ?

**पा०**—जाशील रे दादा, तुझ्यामागं यावेळीं कांहीं कामाची निकड नाहीं. मला माहीत आहे. दादा ! खरंच सांग, बाबांचा माझ्यावर राग नाहीं का होणार ?

**मै०**—छे छे ! ताई ! त्याची तुला धास्ती नको. तूं तर बाबांचा जीव कीं प्राण आहेस. पार्वतीवर आणि हिमवानाचा राग ! केवढा तरी हा विरोध ! हा

भाषाप्रयोगच अप्रयोजक होय. आमच्यावर मात्र बाबांचा थोडा कटाक्ष आहे हे! त्यांचं खरं प्रेम सगळं तुझ्यावरच आहे, समजलीस ?

पा०—तूं म्हणतोस तें कांहीं अंशीं खरं आहे. पण आईची तर आपणांवर सारखीच ममता आहे नाहीं का ?

मै०—यांत काय संशय !

पा०—पण आतां बाबा रागावतील त्याची वाट काय ?

मै०—त्याची तुला काळजी नको. मी बाबांपाशीं तुझी रदबदली करीन, मग तर झालं ना ?

पा०—मग तर काय देवानेंच गाऱ्हाणं ऐकलं म्हणायचं !

मै०—बरं पण ताई ! या कामगिरीबद्दल मला बक्षीस काय देशील ?

पा०—दादा ! तूं म्हणशील तें. तूं कांहीं भलतंच मागणार आहेस थोडंच !

मै०—पहा बरं ताई ! माघार घेशील. सबबी सांगशील. म्हणून म्हणतों, पुन्हां एकदां विचार करून मला वचन दे.

पा०—असं मागणार आहेस तरी काय तूं ? माझ्याजवळ नाहीं किंवा मला देतां येणार नाहीं अशी कां वस्तु तूं मागणार आहेस ? एवढं बजबजावून सांगतो आहेस म्हणून म्हणत्यें असं तूं मागणार तरी काय तें तरी कळूं दे बाबा !

मै०—असं कसं वेड्यासारखं मी मागेन बरं ? तुझ्याजवळ असलेली, तुझ्या मालकीचीच वस्त मी मागेन. दुसरी नाहीं मागणार. मग तर हरकत नाहीं ना ?

पा०—मग तर ती तुला दिलीच समज दादा ! अधिक काय सांगूं ?

मै०—बरं तर मग ताई, मला तुझं एक रहस्य सांगशील काय ?

पा०—( विचार करून ) रहस्य ! माझं रहस्य ! ! मला कांहींच कल्पना होत नाहीं बाबा तुझ्या म्हणण्याची !

मै०—मी तुला त्याची थोडीशी कल्पना आणून देतों.

पा०—( साशंक वृत्तीनें ) ती कशी काय ? दे पाहूं.

मै०—दोन महिन्यापूर्वीची गोष्ट आहे ही.

पा०—माझी उत्सुकता तूं अधिकच जागृत करीत आहेस; बोल एकदम काय तें.

मै०—एकदम सगळं सांगूं ?

पा०—होय दादा ! मला ती गोष्ट केव्हां ऐकेन असं झालं आहे !

**मै०**—ताई ! रंगशाळेंत तुझ्या पेटींत दोन चित्रं आहेत तीं कुणाचीं एवढंच मला पाहिजे आहे !

**पा०**—( गुप्त बातमी फुटल्याबद्दल विस्मय, खेद व लज्जा वाटून ) बाबा, तुझी शर्थ झाली ! हें हेराचं काम कधींपासून करूं लागलास दादा !

**मै०**—म्हणजे ! बाबांच्या राज्यकारभारांत अस्मादिकांकडे थोडी कामगिरी असते अलीकडे ! सगळ्या राज्यांतल्या गुप्त बातम्या आम्हांला लागतात. मग तुझ्या रंगशाळेंतली बातमी लागणं मोठं कठीण काम नाहीं !

**पा०**—खचित दादा! तुला विचारतें, ही बातमी तुला विजयेनं कां सांगितली ? तिच्या शिवाय दुसऱ्या कोणासही ती ठाऊक नाहीं. तिचंच हें काम दिसतं तर मग ? आतां भेटली म्हणजे तिची एकदा चांगली कानउघाडणी करितें. आतां तिच्यापाशीं कांहीं हितगुज करण्याची सोय राहिली नाहीं म्हणावयाची बाई !

**मै०**— त्या बिचारीचा संशय घेऊं नकोस हो ! तिचं हें काम खचित नाहीं !

**पा०**—मग हें व्हावं कसं हें माझ्या लक्षांत मुळींच येत नाहीं.

**मै०**—हें खरोखर अगदीं अकल्पित रीतीनं घडून आलं. कसं तें सांगतों, ऐक. सुमारें दोन महिन्यांपूर्वी मी रंगशाळेच्या बाजूला बकुलोद्यानांत हिंडत होतों. तेव्हां एकाएकीं वावटळ सुटली. त्यावेळीं चित्रशाळेचे दरवाजे उघडे होते, त्यांतून भूर्जपत्रांनीं वेष्टिलेलं एक भेंडोळं उडत उडत माझ्याकडे येऊन माझ्या पायांत घोंटाळूं लागलं. तें उलगडून पाहातों तों त्यांत दोन चित्रपट आढळले. ते पुन्हां नीट गुंडाळून रंगशाळेंत तुझ्या पेटींत मीं नीट ठेविले.

**पार्वती**—( मनांत ) पक्का रहस्यभेद झाला ! ( उघड आश्चर्यानें ) बरं दादा, ही गोष्ट तूं कोणाजवळ बोललास काय ?

**मै०** — खचित आतांपर्यंत कोणाजवळ नाहीं. पुष्कळ दिवस म्हणत होतों तुला विचारीन म्हणून. आज संधि मिळाली म्हणून गोष्ट काढली एवढंच.

**पा०**— बरं झालं बाबा ! ही गोष्ट षट्कर्णी होतां उपयोगी नाहीं. विजयेला मात्र ती ठाऊक आहे. बाकी कुणाला नाहीं.

**मै०**—पण, ताई ! आतां तर ती षट्कर्णी झालीच कीं !

**पा०**—अरे बाबा ! मी बोलायला चुकलें ! झालं आतां ? असल्या गोष्टींत देखील तुझी शब्दांची पकड व थट्टा !

**मै०**—नाहीं ताई ! रागावूं नकोस, व भीतिही बाळगूं नकोस. मी तुझा रहस्यभेद करीन का ?

**पा०**—खचित नाहीं. मग तूं माझा दादा कसा ? बरं पण, आतां या बाबतींत तुझ्याशीं मोकळेपणानं बोलावयास हरकत नाहीं. तीं चित्रं तुला आवडलीं का दादा ?

**मै०**—चित्रंच तीं. त्यांतून तीं तुझ्या कुशल हातानें व सुंदर कुंचलीनें निर्माण केलेलीं, मग तीं कुणाला आवडणार नाहींत ?

**पा०**—दादा ! असं औपचारिक बोलूं नकोस. खरं सांग काय तें.

**मै०**—त्यांत एक चित्र पुरुषाचं आहे व दुसरं स्त्रीचं आहे, नव्हे का ?

**पा०**—वा: ! हें तर एकादा अडाणी माणूसही सांगेल ! त्यांत काय आहे !

**मै०**—तो पुरुष एक तरुण सुंदर जटाधारी तपस्वी आहे व स्त्री तर प्रत्यक्ष गंधर्व–कन्या असावी असं वाटतं.

**पा०**—तुझ्यासारख्या रसिकापासून अशाच उत्तराची अपेक्षा होती ! बरं तर, तें जोडपं शोभण्यासारखं आहे, नाहीं का ?

**मै०**—याचा निर्णय तर तूंच करून ठेविला आहेस ? मला का तो विचारतेस ?

**पा०**—[ फसल्यासारखें होऊन स्वतांशीं ] आतां काय करावं ? गळ्यांत गोष्ट आली ! [ उघड ] मीं निर्णय केला आहे म्हणतोस तो कसा सांग पाहूं.

**मै०**—त्या जटिलाच्या चित्राखालीं तुझा एक पद्यमय लेख आहे.

**पा०**—दादा, तुझी अगदीं कडेकोट तयारी दिसते आहे सगळ्याच गोष्टींची ! बरं तर तें पद्य म्हणून दाखवितोस का ?

**मै०**—हो. असें आहे तें पद्य.

[ राग पिलू, ताल धुमाळी. ]

स्वप्नांत येउनी तरुणा, त्वां केली मजवरि करुणा ॥ प्रियकरा ॥
हरिलेंसि मदन्तःकरणा, धरितसें तुझ्या मी चरणा ॥ ,,
अर्पिली तुला तनु रमणा, तुजविण ही लभ्य न कवणा ॥ ,,
किंकरी, सक्त तुजवरी, हिजासि तूं वरीं, भाकिते करुणा ॥ ,,
हिम–गिरिची कन्या दीना ! ॥ ,,

ही 'हिमगिरिची दीना कन्या' काय म्हणत आहे आलं का लक्ष्यांत ताई !

**पा०**—पण दादा ! हा प्रीति–लेख माझ्या हातचा असला तरी माझ्याच संबंधाचा कशावरून ? दुसऱ्याच्या लेखाची नक्कल नाहीं का कुणाला करतां येत ?

**मै०**—ताई ! खूप शक्कल लढविलीस !

**पा०**—अरे ! उघड आहे. हिमवानाच्या कन्या थोड्या का आहेत ? गंगा, सिंधु, ब्रह्मपुत्रा अशा किती तरी आहेत ! त्यांच्या जीवनावर आपलं जीवन चालविणारे किती तरी मुनिकुमार सांपडतील ? त्यांपैकीं एखादीनं एखाद्या मुनि-कुमाराला तो लिहिला नसेल कशावरून ?

**मै०**—आणि मग त्या गंगेनें, सिंधूनें किंवा ब्रह्मपुत्रिकेनें त्याची नक्कल कर-ण्याकरितां तो आपल्या पंडिता भगिनीकडे पाठवून दिला, असंच किनई तुझं म्हणणं ! आणि त्या तरुण जटिलाची तसबीर ! ती अशीच कुठून तरी आली असल नाहीं का ताई ! काय सांगतेस हें ! अग दुसऱ्याचा एकवार नुसता चेहरा पाहून त्यांच्या अंतःकरणांतील गोष्टींचा छडा लावणारे आम्ही ! आमच्या पासून कोण काय चोरूं शकणार ? ताई ! खरंच सांग हें काय गारुड आहे तें !

**पा०**—दादा, या प्रणयरहस्याच्या कथा ! तरुणतरुणींच्या आयुष्यांत या एकवार तरी घडावयाच्याच. यांत तिऱ्हाइतांनीं फारसं मन घालूं नये हें बर. पण गडे दादा ! तूं माझा सख्खा वडील भाऊ, खराखुरा हितचिंतक व प्रेम करणारा आहेस. तुला मी मोकळ्या मनानं सगळं सांगतें. मी तुला विजयेप्रमा-णंच या बाबतींत विश्वासाचं स्थान समजतें. त्या जटाधारी तरुणाची तसबीर मींच काढिली व तो प्रेम–लेखही माझाच आहे. तुझा तर्क अगदीं खरा आहे, दादा !

**मै०**—बरं पण, तूं तो गृहस्थ कधीं व कोठें पाहिलास ?

**पा०**—ती मोठी चमत्कारिक कथा आहे. विजयेला मात्र ठाऊक आहे. आतां तुलाही सांगतें.

**मै०**—मला तर ती ऐकण्याविषयीं फारच उत्कंठा आहे.

**पा०**—बरं ऐक तर मग. सुमारें दीड महिना झाला असेल. एके दिवशीं रात्रीं मी नेहमींप्रमाणं मणिविलास वाड्यामध्यें माझ्या महालांत नेहमींप्रमाणं निजलें होतें. त्या दिवशीं उत्तर रात्रीं सुमारें चार वाजण्याच्या सुमारास मला एक स्वप्न पडलं. त्यांत दारावर कोणी थाप मारल्यासारखं मला वाटलं. द्वार-पालिकांतून कोणी तरी आली असेल असं वाटून मीं तें उघडलं. पहातें तों

माझ्या पुढे एक अत्यंत सुंदर जटाधारी मुनिकुमार उभा आहे ! दादा ! असा प्रसंग मजवर कधींच आला नव्हता ! मी अगदीं घाबरून गेलें. मला कांहींच सुचेनासं झालं. मी चित्रासारखी त्या तरुणापुढें उभी राहिलें. माझ्या मुखावाटे शब्दही निघेना! त्या जटिलानें माझी स्थिति अवलोकन करून मला एकदम मधुर वचनांनीं शांत केलं. तो म्हणाला, ' सुंदरी ! अगदीं भिऊं नको. तुझ्यासारख्या परम पवित्र राजकन्येच्या महालांत अशा भलत्यावेळीं भलत्या माणसाचा प्रवेश होणं शक्य नाहीं. मी योगबलानें तुला ही भेट देत आहें. तुला गूढ संदेश सांगण्याकरितां मी येथें आलों आहें. प्रिये ! तूं पूर्वजन्मीं दक्षप्रजापतीची कन्या होतीस; व तुझं नांव सती असं होतं. माझं नांव भव. मला शिव असंही म्हणतात. मी तुझा तेव्हांचा पति होतों. तुझ्या पित्यानें यज्ञ केला. तेव्हां त्यानें तुझा व माझाही अपमान केला. तो सहन न होऊन तूं त्याच्या यज्ञकुंडांत आपल्या देहाची आहुति देऊन मोकळी झालीस ! मी मात्र तुझ्या विरहानें व्याकुळ होऊन पुनरपि दुसऱ्या स्त्रीचं पाणिग्रहण करणार नाहीं असा संकल्प करून या हिमाचलावर एकांत स्थलीं तपश्चर्या करीत आहें. हे प्रिये ! तूं परम पवित्र हिमवान् व त्याची पत्नी मेना यांच्या उदरीं पुन्हां जन्म घेतल्याचं वर्तमान मला कळलं. आतां तूं यौवनसंपन्न झाली आहेस व पितरांच्या आज्ञेनें माझ्याशीं विवाह करण्यास सर्वथा योग्य आहेस ! " इतकं बोलून तो तापस एकदम गुप्त झाला !

**मै०**—ताई ! खरोखरीच हा मोठा चमत्कार ! आणि हा स्वप्नाचा प्रकार पहांटेस झाला म्हणतेस नव्हे का ?

**पा०**—होय, अगदीं अरुणोदयाच्या सुमारास.

**मै०**—असल्या वेळेला पडलेलीं स्वप्नं खरीं ठरतात म्हणतात !

**पा०**—विजया अगदीं असंच म्हणाली.

**मै०**—ताई, मी आतांपर्यंत तुझी बरीच थट्टा केली हें बरं केलं नाहीं असं मला वाटतं. ही हकीकत ऐकून माझ्या मनाला अचंबा तर वाटलाच; पण एक प्रकारें आनंदही झाला. शिवाय या प्रकरणांत एक दोन गोष्टींचा उलगडाही झाला.

**पा०**—दादा! तुझ्या मनांत माझ्या कल्याणाशिवाय दुसरं काय येणार बरं ! मला तुझ्या बोलण्याचं कांहींच वाटलं नाहीं. कारण तुझा विनोदी स्वभाव

मला पुरा ठाऊक आहे. पण तूं आतां म्हणालास कीं एक दोन गोष्टींचा उलगडा झाला, तें काय ?

मै०—ताई, हें स्वप्न पाहिल्यापासून तुझ्या मनाची चलविचल झाली आहे नाहीं ? तिचं प्रतिबिंब तुझ्या चेहऱ्यावर बरंच उमटलेलं दिसतं. आईच्या देखील ही गोष्ट लक्ष्यांत आलेली दिसते. आज तूं बाबांचं काम विसरलीस हा देखील त्याचाच परिणाम असावा.

पा०—हें खरं आहे दादा ! पण बाबांच्या रागाची मला अजून भीति वाटते

मै०—त्याविषयीं आतां तुला काळजी नको. ती कामगिरी मजकडे लागली; आणि तिचा मोबदला तर तूं अगोदरच पूर्णपणें मला देऊन टाकला आहेस. अशा स्थितींत तर तुझं हें काम मला केलंच पाहिजे !

पा०—दादा ! तुला त्या स्वप्नानें फार आनंद वाटला यामुळें मला मोठा धीर आला हो !

मै०—तसबिरीवरून तर तो तपस्वी तारुण्य व सौंदर्य यांचा रमणीय संगमच दिसत आहे! पति तरुण व सुंदर मिळणं ही आनंदाचीच गोष्ट आहे; नव्हे का ?

पा० पण त्याच्या कुलाची, शीलाची, वैभवाची वगैरे कांहींच माहिती आपल्याला नाहीं ! त्या तरुणाच्या वचनावर एकदम सर्वस्वी विश्वास ठेवणं योग्य होईल का ? त्यांतून हा सगळा स्वप्नाचाच प्रकार. पण तसा महानुभाव पुरुष सहसा दगा देईल असं माझ्या मनाला वाटत नाहीं बाई ! त्याचे शेवटचे शब्द कसे अर्थपूर्ण व विश्वास उत्पन्न करणारे आहेत पाहिलंस ना ? "पितरांच्या आज्ञेनें माझ्याशीं विवाह करण्याला सर्वथा योग्य आहेस," हे ते शब्द ! अहाहा ! या बहुमोल शब्दांनीं प्रीतीच्या मार्गांतील कंटक साफ उपटून टाकिले आहेत.

मै०—ताई ! ही गोष्ट सध्या गुप्तच ठेवावी! पुढं काय होतं तें पाहूं. स्वप्नांत पाहिलेल्या साधूचं चित्र तूं काढिलं आहेस तें नीट जपून ठेव. त्याच्या चेहेरेपट्टीचा जटाधारी तपस्वी हुडकून काढण्याचा मी गुप्तपणें प्रयत्न करितों. बाकी हा योग आला तर निदान सौंदर्य व तारुण्य यांच्या बाबतींत तरी कांहीं नांव ठेवावयाला जागा नाहीं हो !

पा०—( लज्जेनें ) तुझं म्हणणं बरोबर आहे ! ही बातमी मात्र गुप्तच ठेवली पाहिजे हो !

**मै०**—अर्थात्. बरं पण. तें दुसरं चित्र कुणाचं हें राहिलंच विचारायचं !

**पा०**—का दादा, त्याविषयीं बारकाईनं आपण होऊन शोध करतो आहेस !

**मै०**—अग रसिकाला सौंदर्य कुठंहि असलं तरी प्रियच असतं.

**पा०**—आणि हा नियम फक्त पुरुषांनाच लागू वाटतं ?

**मै०**—असं कोण म्हणतो ? तसं केलं तर तुझ्यासारख्या चतुर व रसिक विदुषीचा अपमान नाहीं का होणार ? तुझ्या त्या मदनलेखानें मजवर मोठा उपकार करून ठेविला आहे; म्हणून त्या चित्रांतली स्त्री कोण असं विचारलं.

**पा०**—तुझं बोलणं मोठं पकडीचं दिसतं बाबा ! तुला कांहीं साधं बोलतां येत नाहीं ! त्या चित्रावरील पद्यानें तुझ्यावर उपकार कसा केला तें सांग पाहूं ?

**मै०**—अग ! त्यावरून उघड झालं कीं, त्या जटिलाच्या प्रेमाचा विषय ती स्त्री नसून माझ्या पुढं असलेलं सचेतन चित्रच त्याच्या प्रणयाचं स्थान आहे !

**पा०**—अस्सं अस्सं ! आलं लक्ष्यांत ! पण गडे, दादा, खरंच सांग मनापासून, त्या चित्रांतली मुलगी तुला पसंत पडली कां ?

**मै०**—कोणत्या दृष्टीनें ?

**पा०**—तूं कोणत्या दृष्टीनें आतांपर्यंत तिच्याकडे पाहिलंस ?

**मै०**—एक चित्र या दृष्टीनें.

**पा०**—बरं मग, त्या दृष्टीनें तरी तें कसं वाटलं ?

**मै०**—त्यांत कोणताही दोष नाहीं हाच मोठा दोष आहे ! मग ती चित्रकाराची चुकी कीं ब्रह्मदेवाची हें मात्र सांगतां येत नाहीं ! पण याच दोषामुळें तीं दोषाकराप्रमाणें नयनांना आनंद देणारी आहे !

**पा०**—तें चित्र अजून तुझ्या डोळ्यांसमोर आहे ?

**मै०**—डोळ्यांपलीकडं गेलं; पण मनाच्या बरंच जवळ आहे असं वाटतं !

**पा०**— बरं तर मग मी तें आतां आणवितें. थोडा थांब. कोण आहे तिकडे ! बकुलिके, अग बकुलिके ! ( बकुलिका येते. तिला ) आत्तां चित्रशाळेंत जा. तेथें माझ्या पेटींत दोन चित्रें गुंडाळून ठेवलेलीं आहेत तीं तशींच घेऊन ये पाहूं चटकन् !

**बकुला०**—जी सरकार ( निघून जाते )

**मैनाक**—( स्वतांशीं ) वा:, मनांतली गोष्ट अनायासें घडून आली ! ( विकार दाबून ) ताई, चित्रकला मोठी उपकारक खरीच. पण—

**पा०**—'पण' काय बाबा ! माझ्यावर तसाच तुझ्यावरही तिनें उपकारच केला आहे ! मग ' पण ' कशाकरितां हा ?

**मै०**—चित्रकला काल व स्थल यांतील अंतर तोडून टाकणारी आहे. हा तिच्यांतला मोठा गुण आहे खरा. पण ती अपकार करणारीही आहे तशीच. स्थलकालांचं विस्मरण व्हावं अशी ज्याला इच्छा असेल त्याचा तर ती प्राणच घेईल मला वाटतं !

**पा०**—माणसानं नेहमीं वस्तूच्या उपयोगाकडे पाहावं.

**मै०**—हेंही खरंच. ( इतक्यांत बकुलावलिका चित्रें घेऊन येते )

**ब०**—सरकार ! हीं तीं चित्रें. ( चित्रें देऊन निघून जाते. )

**मै०**—( स्वताशीं ) या वेळेस बकुलावलिकेनें मोठी कामगिरी केली यांत संशय नाहीं. ( उघड ) ताई ! मला तें चित्र पाहण्याची जितकी उत्सुकता त्यापेक्षां तें मला दाखविण्याची तुझी उत्कंठा अधिक आहे असं मला वाटतं !

**पा०**—( प्रश्नाचं उत्तर न देतां, मुलीचं चित्र उलगडून ) दादा ! हें पाहि-लंस का चित्र !

**मै०**—( स्वताशीं ) आपले मनोविकार हिला समजूं नयेत म्हणून हिच्या समोर न बसतां बाजूलाच बसावं हें बरं. ( तसा मुकाट्यानें बसतो )

**पा०**—कां बोलत नाहींस दादा ? इतक्यांतच चित्रानें तुला मुकं बनविलं वाटतं !

**मै०**—होय. तें मला मुकं बनवून तुला वाचाळ करणार असा रंग दिसतो !

**पा०**—या चित्रांतला प्रत्येक अवयव किती नामी रेखाटला आहे !

**मै०**—तो माझ्या नेत्रांवर आघात करून मला अंधळा करून सोडणार असं दिसतं !

**पा०**—दादा ! हें चित्र त्या मुलीनें स्वतां आपल्या हातानें काढिलें बरं का ?

**मै०**—आत्मसंयमनांत व एकाग्रतेत तिची बरीच प्रगति झालेली दिसते !

**पा०**—हें भाल किती तरी विशाल !

**मै०**—विधीला क्रीडा करावयाला मलं मोठं पटांगण मिळालं म्हणवयाचं !

**पा०**—कटि-प्रदेश तर जवळ जवळ दिसतच नाहीं !

**मै०**—चित्रकलेनें स्थलांतर बुजवून त्याला सावरून धरलेलं दिसतं !

**पा०**—हे डोळे किती तरी पाणीदार आहेत !

**मै०**— एवढं पाणी पाहिजेच, नाहीं तर हुकमाप्रमाणें तें बाहेर कसं पडणार !

**पा०**— आपल्या हृदयावरून हिनें पदर किती तरी मर्यादेनं घेतला आहे पहा ! याला म्हणावं कुलीनपणा !

**मै०**— पतिराजापुढें वारंवार पदर पसरण्याची पाळी यावयाचीच ! तेव्हां मर्यादेच्या पदरानें थोडं अमर्याद व्हावं हें योग्यच आहे !

**पा०**— हें कुंकू पाहिलं का ? अरुंधती-नक्षत्रासारखं टिकली-वजा नाहीं हो ! मंगळासारखं चांगलं मोठ्ठं ठसठसीत आहे. चक्क कोसावरून पाहून घ्यावं !

**मै०**— सौभाग्याची पताकाच ही! सगळा अनुरागाचा रंग यांतच भरलेला दिसतो!

**पा०**— नाक कसं धरधरीत आहे, जशी कांहीं चाफेकळी !

**मै०**— तें मुठींत धरण्याचे वारंवार प्रसंग यायचे. तेव्हां तें धरधरीत असलेलंच विशेष सोईचं ! विधीची ही योजना दूरदृष्टीची आहे यांत कांहीं संशय नाहीं !

**पा०**— हा केशपाश पहा किती दाट आहे ! नव्हे,हा अंधकारसमूहच वाटतो. याला मागें सारून हिचा मुखचंद्रमा कसा वर येत आहे पहा !

**मै०**— अंधकार व प्रकाश यांचं हें सान्निध्य अपूर्व आहे !

**पा०**— हीं कानावरचीं कर्णिकाराचीं फुलं पाहिलींस का ?

**मै०**— यांना आपल्या वर्णाची मोठीच घमेंड ! या बाईच्या कानाशीं लागून तिलाही घमेंडखोर बनविण्याचा त्यांचा विचार दिसतो आहे ! आधींच बायका अशिक्षितपटु, त्यांत त्यांना कर्णपिशाच सहाय ! मग काय विचारतां ?

**पा०**— हे दंत व अधर परस्परांस किती शोभवीत आहेत ?

**मै०**— द्विज व अस्पृश्य यांचा हा मनोहर संगमच म्हणावयाचा !

**पा०**— हिच्या बाहुवल्लरी किती कोमल व लवचीक दिसत आहेत पहा !

**मै०**— खरोखर त्यांच्या पाशांत गुरफटणारा प्राणी तत्काल मुक्तावस्थेचा अनुभव मिळवील !

**पा०**— या भाग्यवतीसाठीं देवानें कोण वर निर्माण केला असेल तो असो !

**मै०**— त्याची कल्पना न करावी हें बरं. त्याचा निश्चय झाला म्हणजे चित्रांतली सगळी मौज गेली !

**पा०**— ( स्वतांशीं ) याच्या मनाची थोडी परीक्षा पहावी तर आतां. ( उघड ) दादा ! या मुलीनं आपल्या मनानं कुणा एकाला वरलं आहे असं ऐकण्यांत आहे !

मै०– ( विषादानें व निराशेनें ) अस्सं ! मग एवढं वर्णन करण्याची कशाला तसदी घेतलीस ?

पा०– ( आपल्याशीं ) आतां स्वारी जरा आली ठिकाणावर ! ( उघड ) पण कुणाला वरलं आहे हें निश्चित कुठं आहे ? त्या वराचं वर्णन मात्र मला ठाऊक आहे.

मै०– ( आशेनें व उत्कंठेनें ) ताई, तें सांग पाहूं तर मग.

पा०– त्या वराच्या फक्त नांवाचंच तें वर्णन आहे.

मै०– मग फारच चांगलं. सांग पाहूं काय तें.

पा०– त्याच्या नांवांत ब्रह्मदेव, स्वर्ग व अहंभाव आहे. तसंच—

मै०– ( स्वतांशीं ) अहंभाव माझ्याशीं थोडा जुळतो खरा ! (उघड) काय ! ब्रह्मदेव,स्वर्ग व अहंकार त्या नांवांत आहेत ! आश्चर्य आहे ! त्यांशिवाय आणखीही त्यांत कांहीं आहेच वाटतं !

पा०– होय ! स्त्रियांच्या मुखांत खुलून दिसणारा 'न'कार नांवाचा अलंकार त्या अहंकाराच्या जोडीला आहे !

मै०– मोठाच चमत्कार !

पा०– अरे ! एवढ्यानंच संपलं नाहीं ! रसिकांची आवडती सारिका त्याच्या नांवांत जाऊन बसल्यामुळं तें नांव मोठं मोहक झालं आहे. अशा प्रकारचा वर तिनें मनानें वरला आहे, समजलास ? काढ पाहूं हुडकून कोण तो?

मै०—ताई ! हें मोठंच कोडं पुढें टाकलंस ! हें मला उलगडणं केवळ अशक्य आहे !

पा०—दादा ! तुझ्यासारख्या शिकलेल्या कोटिबाज रसिकाला हें कोडं वाटावं हें मलाही मोठं कोडंच आहे !

मै०—ब्रह्मदेव, स्वर्ग, अहंकार, नकारालंकार आणि सारिका हें प्रशस्त पंचायतन ज्या नांवांत ऐसपैस बसलं आहे तें नांव म्हणजे ब्रह्मांडाएवढं अगडबंब असलं पाहिजे ! तो एक महामन्त्रच असला पाहिजे !

पा०—आणि तुझ्या सारख्या कुशल मांत्रिकाला तो उलगडलाच पाहिजे !

मै०—ताई ! थट्टा पुरे कर आतां !

पा०—दादा ! त्या मुलीचं वर्णन मी करीत होतें, तेव्हां प्रत्येक वेळीं तूं तिची कशी थट्टा केलीस आठवतं का ? मीं त्याबद्दल तुला अक्षर सुद्धां बोलले नाहीं !

आतां तुझ्या कोटिबाजपणाची व विद्वत्तेची कसोटी आहे ! तिला उतरलास तर खरा !

मै०—खरोखर त्या चित्रांतल्या मुलींची मी फार थट्टा केली ! त्याबद्दल मला आतां वाईट वाटतं. पण त्यामुळं ह्या माझी थट्टा होण्याचा मात्र प्रसंग आला. बरं पण ताई ! ज्या नांवांत ब्रह्मदेवासारखीं प्रचंड प्रस्थ बसलीं आहेत, तें नांव तरी किती अक्षरांचें आहे ? सांग पाहूं.

पा०—( हंसून ) हें त्या मुलीलाच विचारलं पाहिजे, मी काय सांगणार बाई!

मै०—ताई ! तुला तें खचित माहीत आहे! उगाच माझा अंत नको पाहूं गडे!

पा०—मग कबूल कर अगोदर, कीं माझी मति खुंटली !

मै०—हो खुंटली, खुंटली, खुंटली ! त्रिवार खुंटली, झालं आतां !

पा०—मग जिनं तुझ्या कल्पनाशक्तीवर ताण केली तिला तूं स्वीकारशील ना ?

मै०—होय खचित !

पा०—मागें फिरणार नाहींस ना ? ही चित्रांतली मुलगी तुला कबूल आहे ? विचार कर. ही मुलगी मोठी कोटीबाज आहे. कोटिबाजाला कोटिबाजच बायको मिळाली पाहिजे ! नाहीं का दादा !

मै०—ताई ! तुला प्रिय असलेली व तूं शिफारस केलेली वस्तु मला मान्य झालीच पाहिजे. पण असल्या कोटीबाज जोडप्यांच्या कोट्या एकमेकांना बोंचल्या नाहींत म्हणजे ठीक !

पा०—मग सांग तर तुझं नांव काय तें !

मै०—म्हणजे ! माझं नांव मैनाक ! अन् दुसरं काय ?

पा०—मग यांतच ब्रह्मदेव वगैरे सर्व मंडळी बसली आहे !

मै०—( स्वतांशीं ) हें कोडं न सुटलं तरी मैनाक हें नांव एवढं महत्त्वाचं आहे यांतच मला आनंद आहे ! ( उघड ) कांहीं अक्कल चालत नाहीं बोवा !

पा०—बरं. पहा, मी हें कोडं आत्तां सोडवितें दादा ! मैनाक-नांवांतला ‘क’ म्हणजे ब्रह्मदेव बरं का !

मै०—(हंसून)आमच्या अभ्यासक्रमांत एकाक्षरी संस्कृत कोश मुलींच नव्हता. नाहीं तर हें मीं तेव्हांच ताडिलं असतं !

पा०—त्या नांवांत ‘ नाक ’ असा शब्द आहे. हा दोन अक्षरांचा असल्यामुळें तुझ्या परिचयाचा असला पाहिजे ! याचा अर्थ स्वर्ग !

**मै०**——नाक हा शब्द तर चांगला ठाऊक आहे ! पण त्याचा परिचय मात्र इहलोकांत घडणारा नाहीं !

**पा०**—मैनाक या शब्दाच्या मध्यें ‘ ना ’ हें नकारार्थी अक्षर आहे. स्त्रियांच्या मुखांत शोभणारा हा अलंकार आहे म्हणतात !

**मै०**—हं हं ! ‘ नकारोऽलंकारः स्त्रीणाम् ’ असं कुठेसं वचन आहे खरं ! मनांतून हव्या असणाऱ्या प्रत्येक गोष्टीला ‘ नको नको ’ म्हणण्याचा स्त्रियांचा स्वभाव आहे खरा !

**पा०**—मैनाकाचं पहिलं अक्षर ‘ मै ’ याचा अर्थ मी, अर्थात् अहं हा भाव, म्हणजे अहंकार !

**मै०**—शाबास ताई ! तुझ्या व्युत्पत्तिशास्त्राची व कल्पकतेची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच !

**पा०**—मैनाक यांतलीं पहिलीं दोन अक्षरें ‘ मैना.’ हा एक शब्द असून याचा अर्थ सारिका आहे. कां सुटलं कां नाहीं कोडं ?

**मै०** सुटलं खरं ! अगदीं कबूल ! पण ताई ! त्या कन्येनं मला मनानं वरिलं, तें कसं सांग पाहूं.

**पा०**—दादा ! नागलोकांत वीरसेन नांवाचा राजा आहे. तो बाबांचा परम मित्र. तो कांहीं दिवसांमागें बाबांना भेटावयाला आला होता. तेव्हां केवळ कौतुकास्तव त्यानें बाबांपासून बाबांची व तुझी अशा दोन तसबिरी नेल्या. तुझं चित्र पाहून त्याची कन्या भुवनसुंदरी मोहित झाली. तिनं आपलं स्वताचं चित्र तुझ्या दृष्टीस पडावं म्हणून माझ्याकडे पाठविलं व त्याच्या बरोबर मोठ्या मर्यादेनें व चातुर्यानें निरोपही पाठविला आहे कीं, माझे प्राण मीं युवराज मैनाक यांच्या चरणीं समर्पण केले आहेत, हा निश्चय समजावा. आपण उभयतांचं कल्याण करण्यास समर्थ आहां.

**मै०**—ही मुलगी बहिरंगाप्रमाणें अंतरंगानेंही सुंदर असली पाहिजे. किती थोरपणानें व चातुर्यानें हिनें निरोप पाठविला आहे ! अहाहा ! ताई ! माझ्या करितां तूं केवढी तसदी घेतलीस ही ! मी हे तुझे उपकार कधींही विसरणार नाहीं. या रहस्याची परिस्फुटता मात्र होतां कामा नये हो !

**पा०**—अर्थातच नाहीं. मग ही मुलगी तुला कबूल ना ?

**मै०**—ताई ! तुझ्या इच्छेच्या बाहेर मी नाहीं ! मात्र तुझ्या विवाहाच्या

पूर्वी हें माझं वचन मी पुरं करणार नाहीं !

**पा०**—माझा तर दादा, सगळाच स्वप्नवृत्तांत आहे !

**मै०**—माझा देखील मला तसाच वाटत आहे !

**पा०**—तुझ्याविषयीं मला शंका येत नाहीं.

**मै०**—तुझं मन माझ्या विषयीं प्रेमळ म्हणून माझं सगळंच तुला चांगलं दिसतं, दुसरं काय ? तुझं नांव मात्र तुझ्या गुणांच्या विरुद्ध धर्माचं आहे. पार्वती म्हणजे पर्वताची कन्या, अर्थात् कठिण हृदयाची, असा अर्थ ध्वनित होतो; व तो सहृदयास खरोखरीच शल्यासारखा वाटतो !

**पा०**—अरे नांवांत काय आहे ? आणि शिवाय तूं म्हणतोस तेंही फारसं खरं नाहीं. कारण, पर्वत जरी बाहेरून कठिण दिसले, तरी त्यांचं अंतरंग एकसारखं द्रवत असतं. अशा सारख्याची मी मुलगी आहे यांत कांहीं वावगं नाहीं.

**मै०**—बरं ताई ! मी आतां बाबांकडे जातों. तुझ्याविषयीं त्यांच्या मनांत कांहीं असलं तर काढून टाकतों. पण आजचीं रहस्यें गुप्त ठेवायचीं हो !

**पा०**—अगदीं बरोबर ! मीही आतां स्नान करून देवतार्चन करितें.

(राग–सारंग, ताल–केरवा)

रवि तापवि ह्या अवनी सकला ॥ धृ०॥
मोर विश्रांत तरुतलीं, अलि कुसुमिं,
शुक पंजरीं याचि सलिला ॥ १ ॥

[ जातात. पडदा पडतो. ]

---

## प्रवेश तिसरा.

( स्थळ मरकतमंदिर; पात्रें मेनाराणी व हिमवान् राजा )

[ नाच संपल्यावर ]

**हि०**—प्रिये, आपला संसार किती रमणीय व सुखमय आहे बरं ? ईश्वराची ही मोठीच कृपा आहे. आपण पूर्वजन्मीं खचित मोठं पुण्य पुण्य केलं असलं पाहिजे. त्याचं हें फल अनुभवीत आहों. आपणांसारखे भाग्यवान् या दुनियेंत विरळ सांपडतील.

मे०—यांत काय संशय !

हि०—सर्व भरतखंडांत सर्वांत उच्च असें स्थान मला लाभलं आहे. त्या उच्च स्थानावरील उच्च सिंहासनावर मी अधिष्ठित झालों आहें. या उच्चस्थानाला नीच मनोवृत्तीचा संपर्क परमेश्वराच्या कृपेनें अद्यापि झालेला नाहीं ! हें केवढं भाग्य !

मे०—ही मोठी स्पृहणीय गोष्ट आहे.

हि०—अशा राजसत्तेच्या जोडीला देवानें मला तारुण्य, आरोग्य व विवेक-शक्ति दिली आहे हा परमेश्वराचा दुसरा उपकार आहे !

मे०—अगदीं खरं आहे !

हि०—वैराजनामक पितरांची तुझ्यासारखी मानसकन्या मला गृहिणी मिळाली ही गोष्ट काय सामान्य आहे ?

मे०—( लज्जा व विनय दर्शवून ) हें म्हणणं मात्र प्रेममूलक आहे ! माझ्या माहेरचीं माणसं तर उलट असं म्हणत असतात कीं मेनकेचं मोठं भाग्य म्हणून तिला हिकुडल्यासारखे पति लाभले ! खरं पाहिलं तर इकडच्या चरणसेवेनंच मी पवित्र व कृतार्थ झालें !

हि०—किती तरी मधुर हें तुझं शील ! तें कुलवधूचा अलंकारच आहे ! दवाचा आणखी प्रसाद आपल्यावर आहे तो हा कीं आपल्या प्रणयाला अत्यंत शोभादायक अशीं फळं लाभलीं ! मैनाक व पार्वती यांच्यासारखीं अपत्यं त्रिभुवनांत मिळणार नाहींत ! हे आपले बहिश्चर प्राण विलास करतांना पाहून माझ्या आनंदाला वावरायाला हिमगिरि-प्रांत पुरत नाहीं !

मे०—परमेश्वरानें हीं बाळकं सुखांत ठेवावीं हेंच त्याजपाशीं मागणं आहे.

हि०—माझ्या प्रजांना सर्व सुखं प्राप्त होत आहेत ही तर मोठ्या संतोषाचीच गोष्ट आहे. परंतु अखिल भरतवर्षांतील मुमुक्षु, योगी, संन्यासी, परमहंस इत्यादिकांना माझा दिव्य, पवित्र, शांत व एकांत प्रदेश परमार्थ साधून देतो यामुळें तर माझ्या मनाला अपरिमित हर्ष वाटत आहे.

मे०—आपलं राज्य म्हणजे खरोखर दुसरा स्वर्गच आहे.

हि०—प्रिये ! या सर्व गोष्टींना शोभा आणणारी आणखी एक गोष्ट आहे, ती आली कां तुझ्या लक्ष्यांत ?

मे०—ती कोणती बरं ?

हि० – ज्याच्या कृपेनं हें सर्व प्राप्त झालं त्या परमेश्वराच्या सेवेची आवडही मला सुदैवानं आहे.

मे०—ती तशीच सदैव कायम राहो!

हि०—खरोखर मग आपल्या सुखाला पारावारच नाहीं! वैकुंठ, नंदनवन, सत्यलोक इत्यादि पवित्र नांवें आपण ऐकतों. पण त्यांच्या ऐश्वर्याचा अनुभव प्रत्यक्ष याच भूमीवर घेत आहों! नव्हे का? (मेना कांहींच उत्तर देत नाहीं असें पाहून) प्रिये! कां? उत्तर कां देत नाहींस! आतांपर्यंत योग्य भाषण केलंस. आतां येथेंच कां मुग्धपणा स्वीकारलास? बोल, बोल.

मे० - आतांपर्यंत सगळं दुधासारखं झालं. पण त्यांत साकर मात्र पडावयाची राहिली आहे. दुधांत साकर पडल्यावर मात्र अधिक कांहीं राहिलं नाहीं खरं?

हि०—सुंदरि! अशी गोष्ट कोणती सांग बरं.

मे०—ती माझ्या तोंडून वदविण्याचा हेतु दिसतो! इकडे जशी काय ठाऊकच नाहीं!

हि०—प्राणेश्वरि! खरोखर ती माझ्या लक्ष्यांत येत नाहीं!

मे०—मुलगी हें परक्याचं धन आहे हें का इकड सांगायला पाहिजे कुणीं?

हि०—हें तर आम्हांला ठाऊकच आहे. पुढें काय?

मे०—पुढं काय? तें ज्याचं त्याजकडे पोचतं नको का करावयाला?

हि०—मग तुझं म्हणणं काय? स्पष्ट बोल.

मे०—आपल्या ताईला आतां लवकर उजवून टाकावं म्हणत्यें. म्हणजे डोक्यावरचं ओझं खालीं उतरल्यासारखं होईल.

हि०—काय? माझी ताई आणि डोक्यावरचं ओझं! काय ही तुझी कल्पना! असल्या रत्नाचं ओझं मी मोठ्या भूषणानं मस्तकावर मिरवीन!

मे०—पण चार लोक काय म्हणतात तिकडं नको का पहावयाला? आपण श्रीमंत पडलों. राजे व अधिकारी पडलों. म्हणून कुणी तोंडावर नांव ठेवायला धजत नाहीं, इतकंच. पण पाठीमागें पुष्कळ कुजबुज चालते हो! आम्हां बायकांना चार चौघींत जाण्याचे प्रसंग येतात व मान खालीं घालावी लागते. पुरुषांना नाहीं कांहीं त्याचं वाटत मोठंसं!

हि०—प्रिये! तुझ्या शहाणपणाला या वेडगळ विचारांनीं खरोखर कमीपणा आणला आहे!

मे०--मीं सगळं वेड्य सारखं बोलत्यें असं का इकडचं म्हणणं ! बरं, तसं कां होईना ?

हि०—यांत काय संशय ! शिवाय असल्या भाषणानं पर्यायानं तुम्हीं आह्मांस अविचारीही ठरविलं ! जशी कांहीं ताईची काळजी सगळी तुम्हांला ! मला कांहींच नाहीं ! लग्न म्हणजे काय बाजारांतली भाजी होय! त्याचा कांहीं विचारच नको ! मला तर वाटतं कीं लग्नासारखी दुसरी कोणतीच गोष्ट संसारांत महत्त्वाची नाहीं. मुलगी उपवर झाली म्हणून तिला वाटेल तिथं का ढकलायची? आमची ताई तशी राहिली तरी पुरवली. तिला भलत्याच ठिकाणीं अविचारानें आम्ही कधींही लोटणार नाहीं!

मे०--(अम्मळ दूर होऊन) अग बाई ! मी बोललें तें काय? व त्याचा एवढा राग तो काय म्हणून? इकडला तसा माझाही हक्क ताईवर आहे,अशा वेळ्या समजानं दोन शब्द सुचवायला गेलें तों हें भलतंच झालं बाई ! बरं तर, बोलल्यें त्याची क्षमा करावी. पुन्हां नाहीं मी बोलणार !

हि०--प्रिये ! हें काय ? मी कांहीं रागावलों नाहीं. तूंही रागावूं नकोस. तुला मीं आजपर्यंत एका शब्दानं तरी दुखविलं कां ? अग; तुझ्या पवित्र उदरीं ताईनें जन्म घेतला. यावरून तुझा तिच्यावर हक्क उघड उघड आहे ! तुझं अप्रतिम सौंदर्य तसेंच तुझे उदात्त मनोधर्म तिच्यांत उतरल्यामुळं तर तिला मोठेपण आलेलं आहे ! सुंदरि, सौंदर्यगुणशालिनी ताईच्या लग्नाविषयीं तुला काळजी पडावी हें आश्चर्य आहे ! उगीच वेड्या बायांच्या नादीं लागून भलभलते विचार मनांत आणणं योग्य नव्हे. मग तुझ्यांत व सामान्य स्त्रियांत अंतर तें काय ?

मे०—लोकनिंदा ऐकणं व सहन करणं मोठं कठिण जातं.

हि०--पण ती निंदा योग्य किंवा अयोग्य याचा विचार नको का करावयाला ? शिवाय लोक म्हणजे तरी कोण, हेंही आहेच. आपण योग्य मार्गानें जात आहों ही भावनाच आपलं समाधान करण्यास पुरे आहे.

मे०--इकडच्या पुढं मी काय व किती बोलणार ? पण ताई आतां लहान आहे कां ? स्वतांच सांगायचं होतं.

हि०—लहान व मोठी हे शब्द सापेक्ष आहेत. गतवर्षापेक्षां या वर्षी, कालच्या पेक्षां आज, मोठी, हें खरं आहे. पण याचा अर्थ ती लग्नाच्या मर्यादेच्या पलीकडे गेली असा खाचितच नव्हे.

मे०—लग्नाची तरी मर्यादा लोकच ठरविणार ना ?

**हि०**—कोण लोक ? बाजारबुणगं ! या गोष्टी शाहाण्यांनीं व निस्पृह समाज-हितचिंतक शास्त्रकारांनीं ठरवावयाच्या असतात.

**मे०**—तिच्या वयाप्रमाणं तिच्यांत किती तरी फरक पडत चालला आहे ! आतां तिला मुलगी नाहीं कुणी म्हणत. मोठी बाई समजतात !

**हि०**—मग यांत तिचा काय अपराध ? व तुमचा तरी काय दोष ? हें मला समजत नाहीं. तिचं बाल्य जाऊन तिला यौवन प्राप्त झालं आहे, तेव्हां यौवनाची छाया तिच्यावर साहजिकच पडणार. हा वयोधर्म आहे.

**मे०**—माझं म्हणणं इतकंच कीं, आपण स्वस्थ बसूं नये. कांहीं तरी खटपट करावी.

**हि०**—पार्वतीचें कुल,शील, तारुण्य, सौंदर्य,व गुणसंपत्ति तिच्याकरितां खटपट करतील. या हिमवानाला हें काम करावयाला नको आहे.

**मे०**—स्वयंवराचा आपला हेतु प्रसिद्ध केल्यास त्यांत काय कमीपणा आहे ?

**हि०**—पार्वतीच्या गुणांवर लुब्ध होऊन वरांनीं तिला मागणी करावी अशी माझी इच्छा आहे व शिष्टाचारही असाच आहे. मुलीला घेऊन वराच्या दारोदार हिंडण्याकरितां हा हिमवान् जन्माला आला नाहीं. मुलगी जन्माला येणें हा बापाचा अपराध होय? मुलगी तर उभयकुलांचा उद्धार करणारी आहे. ती वीरांची जन्मभूमि, धर्माचं क्षेत्र, मर्यादेचं माहेरघर, विनयाचं विश्रंभस्थान, शीलाचं विलासभवन,प्रेमाचं उद्यान व कारुण्याचं निधान आहे. मुलीशिवाय वरांचं चालत असल्यास त्यांनीं खुशाल चालवून घ्यावं !

**मे०**—इकडच्या म्हणण्यांत पुष्कळ अर्थ आहे हें आतां माझ्या लक्षांत आलं. पण म्हणतें, ताईचं लग्न या डोळयांनीं पाहिलं म्हणजे मला धन्यता वाटेल !

**हि०**—मग त्याकरितां परमेश्वरापाशीं दीर्घ आयुष्य माग. ताईच्या लग्नाची हुल्लड कशाला ? आणि तुझं वय असं काय झालं आहे कीं ताईचं लग्न पाहावयाला आपल्याला मिळणार नाहीं अशी तुला धास्ती वाटावी. प्रिये ! आणखी दहा वीस वर्षे तरी तुला कांहींच भीति नाहीं, नव्हे का ? पण सुंदरि ! तूं म्हणतेस तसाही योग देवाच्या दयेनें लवकर येईल. ताईच्या पतीची योजना तिला जन्माला घालण्यापूर्वीच विधीनें करून ठेविली आहे. आपणांस ती दिसत नाहीं इतकंच.उगाच चार अडाणी बाया किंवा लोक बोलतात तिकडं लक्ष्य देऊं नकोस. सर्व तुझ्या मनाजोगं होईल, काळजी नको अगदीं.

मे०—मला बोलायला कांहीं ठेवलंच नाहीं आतां !

( दौवारिक प्रवेश करून )

दौ०—( मुजरा करून ) महाराज, देवर्षि नारद–मुनींची स्वारी हिमाचला-वर इतक्यांतच उतरली आहे.

हि०—मग हें तर आनंदाचं पर्व आलं ! ठीक आहे. उपाध्याय सोमदेवभट्ट अग्निशाळेंत असतील त्यांना जाऊन सांग कीं, मुनिमहाराजांना सामोरे जा, त्याचं योग्य स्वागत करा व अर्घ्यादिकांनीं त्यांची पूजा करा. मी अतिथिगृहांत त्यांच्या दर्शनाची वाट पहात बसतों. तिकडे त्यांना घेऊन या म्हणावं.

दौ०—जी सरकार ( निघून जातो )

हि०—चल प्रिये ! ( निघून जातात. पडदा पडतो. )

---

## प्रवेश चवथा.

( नारद व सोमदेवभट्ट )

नारद—अहो उपाध्याय ! खरोखर हा हिमालयप्रदेश किती रम्य व पवित्र आहे ! मी सर्व-लोकांत संचार करणारा आहें. पण असलं सौंदर्य अन्यत्र कुठं अवलोकनांत येत नाहीं ! पुकष्ळ वेळां मनांत येतं कीं, येथंच राहून भगवन्नाम–संकीर्तन करीत बसावं. नुसतं या प्रदेशांत राहावयाला मिळणं ही देखील भाग्याची गोष्ट आहे; मग ज्याला या प्रदेशाचं राज्य लाभलं त्या गिरिराज हिमवानाचं भाग्य काय वर्णन करावं ! हा नगेंद्र निर्माण करण्यांत विधीनं आपलं चातुर्य-सर्वस्व खर्ची घातलं असं वाटतं. पहा.

( राग बिहाग, ताल दीपचंदी )

सृष्टिदेविची विहारभूमिच शांतिकुंज दिसतो, अहाहा !
परमहंस मुनि तापस यांचा दिव्याश्रम गमतो, अहाहा ! ॥ धृ० ॥
नंदनवनिं जायाचा सुखकर सोपानचि बनतो, अहाहा !
शशांक दिनमणि तारामंडळ मौलिवरी धरितो ! अहाहा ! ॥ १ ॥

आज सहज मनांत आलं कीं, त्या महाभाग्यवान् हिमवानाला भेटावं. बरं तर, चला त्या राजर्षीकडे.

सो०—असं इकडून यावयाचं, मुनिवर्य ! महाराज या समोरच्या अतिथिमंदिरांत आपल्या दर्शनाची उत्कंठेनं वाट पहात आहेत. ( बोट दाखवून ) ते पहा आमचे महाराज आपली पत्नी व कन्या यांसह आपल्या चरणांचं स्वागत करण्याला उत्सुक झाले आहेत. [ अतिथिमंदिरांत उभयतां प्रवेश करितात. सोमदेव पुढे होऊन राजास ] महाराज ! देवर्षींचं पूजन यथाविधि केलं. त्यांना घेऊन आलों आहें.

( राजा, राणी व पार्वती उभे राहतात व मुनींना वंदन करितात. हिमवान् मुनींना उच्च आसन देतो. मुनि त्यावर बसतात, मग तिघे यथोचित बसल्यावर )

हि०—अहो मुनिवर्य ! आज आपण आम्हांस दर्शन देऊन अनुगृहीत व पुनीत केलं यामुळें आम्हांस पराकाष्ठेचा आनंद वाटत आहे. यदृच्छेनं आगमन झालं किंवा हेतुपूर्वक !

ना०—अगदीं यदृच्छेनं. तुझा हा प्रदेश इतका शांत, पवित्र व उच्च आहे कीं, आमच्यासारख्या भगवदुपासकांना येथेंच हरिनाम गात बसावंसं वाटतं. तूं खरोखरी धन्य आहेस. कारण तुला या प्रदेशाचं प्रभुत्व लाभलं आहे ! हें स्थान परमार्थाची जन्मभूमि, भूमीवरील स्वर्ग, सृष्टिदेवतेचा क्रीडागिरि, लक्ष्मीचा विलासदर्पण, व देवतांचं विहारस्थल होय. मनोवृत्तीचा परमेश्वराच्या ठिकाणीं उपरम होण्यास ही पुण्यभूमि फार योग्य आहे. अस्तु, राजा ! सकल प्रजाजनांचं कुशल आहे ना ?

हि०—होय महाराज ! आपल्या प्रसादानं.

ना०—या प्रदेशावरील तपस्व्यांच्या धर्मक्रिया ठीक चालल्या आहेत ना ? धर्मार्थकाममोक्ष या पुरुषार्थांविषयीं जागरूक आहेस ना ? तुझा गृहस्थाश्रम योग्य रीतीनें चालला आहे ना ?

हि०—मुनिवर्या,आपल्यासारख्यांच्या कृपेनें सर्व कांहीं बरोबर चाललं आहे.

ना०—राजा, ही तुझी धर्मपत्नी आणि ही कन्या, नव्हे का ?

हि०—होय महाराज !

ना०—तुझ्या पत्नीप्रमाणेंच तुझी कन्याही मोठी सुलक्षण व भाग्यवान् दिसते आहे !

हि०—मुनिवर्यांचा दृष्टिपात झाल्यावर कोण अभागी राहणार आहे ?

ना०—राजा, हिचं नांव काय ?

हि०—पार्वती, महाराज !

ना०—तुझ्या वैभवाला अनुरूप अशी ही कन्या आहे. ही तुझ्या कुलाचा उद्धार करील. हिला ' भव ' नांवाचा पति मिळेल.

हि०—[ गहिंवरून कृतज्ञतेनें ] या आशीर्वादानें आम्ही धन्य झालों !

ना०—हा वर तुझ्या राज्यांतच राजधानीजवळ एका निर्जन व एकांत तपोवनांत तपश्चर्या करीत आहे. वर सामान्यांपैकीं नाहीं. तो देवाधिदेव असून त्रैलोक्यवंदनीय आहे. आमची स्वारी केव्हां केव्हां त्याच्या दर्शनाकरितां त्याच्याकडे जात असते.

हि०—माझं मोठं भाग्य उदयाला आलं म्हणावयाचं. त्या यतिवर्यांचा शोध करून त्याचं दर्शन अवश्य घेतलं पाहिजे.

ना०—या विवाहानें सगळ्या जगाचं कल्याण होणार आहे, राजा ! व तो योगही लवकरच आहे.

हि०— ही तर अमृतवृष्टि झाली !

ना०—राजा, तुझी परमेश्वरभक्ति, साधुनिष्ठा, व प्रजावात्सल्य पाहून मला परम समाधान झालं. तुझ्या कुलावर भगवान् वासुदेव सदैव प्रसन्न असो !

हि०—मुनिवर्या, तथास्तु. मी धन्य झालों, कृतकृत्य झालों.

ना०—बरं तर मग. येतों आतां. [ सर्व मुनिवर्यांस नमस्कार करितात. मुनि व उपाध्याय निघून जातात ].

हि०—( मेनेस ) आज तर परमेश्वराच्या प्रसादाची नुसती वृष्टि होत आहे प्रिये !

मे०—खरंच बाई ! कल्पनेच्या पलीकडे झालं हें !

हि०—चांगल्या गोष्टींची देखील एखादेवेळीं परंपरा लागते ती अशी बरं का ! नारदांचं आगमन हा पहिला लाभ, त्यांचा आपणांस आशीर्वाद हा दुसरा लाभ, आणि ताईला वर मिळाला हा तिसरा लाभ ! लाभांची ही पर्वणीच म्हणावयाची !

मे०—ताईला वर मिळाला म्हणजे प्रत्यक्ष पतिच मिळाला असं समजावयाला हरकत नाहीं. केवढं माझ्या पोरीचें व आपलं भाग्य !

हि०—( पार्वतीकडे पाहून ) ताई ! आतां तुझी काळजी करणं नको आम्हांला ! परमेश्वरानें तुझं गाऱ्हाणं एकलं म्हणावयाचं. तुझं म्हणण्यापेक्षां तुझ्या आईचंच म्हटलं पाहिजे. ( दोघी लाजून खालीं पाहतात. मेनेला ) कां प्रिये !

मी म्हणतों तें खरं कीं नाहीं ? (पार्वतीला) कां ताई! कसं काय? (पार्वती लाजते)

मे०—होय. देवानं माझ गाऱ्हाणं ऐकलं खरं! पण हें थोडसं इकडच्या विरुद्धच झालं म्हणावयाचं.

हि०—तें कसं प्रिये!

मे०—जामात आपल्याकडे न येतां जामाताच्या दर्शनाला जाण्याची इकडची तयारी झाली आहे!

हि०—अग हा अलौकिक व्यवहार आहे! लौकिक व्यवहारांत मीं म्हटल्याप्रमाणंच सर्व घडून येणार!

मे०— मला काय त्याशीं करावयाचं! माझ्या ताईला त्रैलोक्यवंद्य पति मिळाला यामुळें मी धन्य झालें बाई!

हि०—अग! सर्व जगत् धन्य झालं म्हण. नारदांचं वचन असत्य व्हावयाचं नाहीं.

मे०—पण त्या वराचं कुल, नातगोत, वय इत्यादिकांविषयीं मुनिवर्य कांहींच बोलले नाहींत हें कसं ?

हि०—अग! थोर लोक फार बोलत नसतात! त्यांच्या थोड्या भाषणांत पुष्कळ अर्थ असतो; समजलीस? आतां आपल्याला काळजी नको. समर्थानीं आपणांवर अनुग्रह केला आहे. आणखी काय पाहिजे? चला, आतां त्या यतीश्वराचा शोध लावूं व त्याचें दर्शन घेऊं. (पार्वतीला) ताई! तूंही जया–विजयांना घेऊन त्याचं दर्शन घे. एवढंच नव्हे, तर सख्यांना बरोबर घेऊन त्याची रोज सकाळीं सेवा करीत जा; म्हणजे त्याच्या अनुग्रहाचा योग लवकर येईल. (मेनेला) प्रिये! आजचा फारच आनंदाचा दिवस आहे. वाड्यांत व नगरांत उत्सव झाला पाहिजे. खरोखर मी केवढा भाग्यवान् आहें!

(राग पूर्वी, ता० पंजाबी)

बघ, नसे मम सुखाला पारावार ॥ धृ० ॥
संतती गुणखनि, शीलयुत कांता
राज्य, वैभव, कृपा त्या देवाची फार!

[ जातात. पडदा पडतो. ]

**पहिला अंक समाप्त.**

———

# अंक दुसरा

## विष्कंभक

( बकुलिका व वासंतिका प्रवेश करितात. )

ब०—अग वासंतिके ! इतक्या लगबगीनं कुठं चाललीस बाई !

वा०—बाई बकुलिके ! ताईसाहेबांची आज्ञा झाली आहे कीं रंगशाळेंतलं माझ्या पेटीतलं चित्र मला क्रीडोद्यानांत लवकर आणून दे. म्हणून मी तें तिकडं पोंचविण्याकरितां चाललें आहें. तूं ग कुठं निघालीस ?

ब०—ताईसाहेबांनीं मलाही सांगितलं होतं कीं, बकुलिके ! जयाविजयांना मी क्रीडोद्यानांत बोलाविलं आहे म्हणून सांग. मी तें काम करून राणीसाहेबांच्या महालाकडे जात आहें.

वा०—अग ! आजकाल राजवाड्यांत आनंदी-आनंद चालला आहे म्हणतात. तुला कांहीं बातमी नाहीं वाटतं ? मी बाहेर नजरबागेंत असतें. तरी माझ्या कानावर थोडथोड्या बातम्या येतात. तूं तर खुद्द राजवाड्यांत आहेस, आणि तुला कांहींच वार्ता नाहीं ! अगदीं समुद्रांत पडून कोरडी !

ब०—अग असं कसं होईल ? मला तर सगळी त्रित्तं बातमी आहे. नाहीं कशी ?

वा०—बरं तर ती मला थोडक्यांत सांग पाहूं.

ब०—अग ताईसाहेबांच्या लग्नाची वाटाघाट चालली आहे जोरांत !

वा०—तरीच ताईसाहेब आतांशा नजरबागेकडे फारशा येत नाहींत, व त्यांच्या मैत्रिणी जयाविजया याही बऱ्याच दिवसांत दिसल्या नाहींत. त्या तिघीजणी हल्लीं बहुतेक वेळ क्रीडोद्यानांत घालवितात म्हणून समजतं.

ब०—राणीसाहेब तर मोठ्या खुषींत आहेत. ताईसाहेबांचं कोडकौतुक सारखं चाललं असतं !

वा०—योग्यच आहे. ताईसाहेबांवर महाराणीसाहेबांचं तसंच महाराजांचंही मोठं प्रेम आहे.

ब०—आणि ताईसाहेबांचं वागणं तरी किती थोरपणाचं बाई !

वा०—बरं पण. जांवई ताईसाहेबांच्याच तोलाचा मिळाला असेल नव्हे ?

व०—तें कांहीं बाई नक्की कळत नाहीं. थोडासा विचित्रच प्रकार दिसतोय !

वा०—म्हणजे ! मग तो ऐकूंच दे तर मग. पण त्वकर सांग बाई ! मला घाई आहे.

व०—अग तुला ठाऊक नाहीं का ? परवां ते नारदमुनि महाराजांवर दर्शनाचा अनुग्रह करण्याकरितां आले होते.

वा०—बरं मग, त्यांच्या गळ्यांत ताईसाहेबांना बांधण्याचा विचार ठरला कीं काय ?

व० – इश्श मेलं ! भलतच् काय बोलतेस ग ! अग ते नैष्ठिक ब्रह्मचारी ! ते का संसाराच्या फंदांत पडणार ? आणि शिवाय त्यांचं वय तरी का आहे लग्नाचं ! त्यांनीं उलट पार्वतीला वर दिला कीं, तुला ' हर ' पती मिळेल व तुझं कल्याण होईल.

वा०—हा कुठला काढला वर ! त्याचं नातगोत, कुळशीळ कांहीं ठाऊक आहे का ?

व०—त्याची कांहींच माहिती नाहीं.

वा०—बरं, वैभव कांहीं तरी ? कुठला राजाबिजा आहे कीं काय ?

व०—तसं कांहीं दिसत नाहीं बाई !

वा०—आणि राणीसाहेब आणि महाराज यांस तें स्थल पसंत पडलं ?

व०—नारदमुनीसारख्या महानुभाव पुण्यप्रभाव देवर्षींचा तो प्रसाद म्हणून त्यांनीं संतोषपूर्वक त्याचा स्वीकार केला.

वा०—मोट्ठं नवल आहे ! आणि ताईसाहेबांना हें सगळं कबूल !

व०—त्यांच्या चर्येवरून तर त्यांनाही आनंद झाल्यासारखाच दिसत आहे.

वा०—बरं. तो वर उद्योग तरी काय करतो व असतो कुठें ?

व०—अग, या हिमालयाच्या एकांत प्रदेशांत तपश्चर्या करीत आहे म्हणतात तो !

वा०—जें जें ऐकावं तें नवलच ! ताईसाहेबांसारखं रत्न मिळाल्यावर त्याची तपश्चर्या सफल झाली म्हणावयाची !

व०—अग, एवढ्यानं काय झालं ? खुद्द राणीसाहेब व महाराज सुद्धां त्या तपस्व्याचं दर्शन घेऊन आले म्हणून ऐकलें. तेव्हांपासून त्यांना भावी जांवयाचं फारच कौतुक वाटतं आहे म्हणतात !

**वा०**—समळाच चमत्कार !

**ब०**—एवढयावरच कुठं भागलय ? त्यांनीं ताईसाहेबांना त्याची शुश्रूषा करण्याची आज्ञा केली आहे! व त्याप्रमाणें त्या रोज सकाळीं जयाविजयांना बरोबर घेऊन त्याच्या तपोवनांत जाऊन त्याची परिचर्या करूं लागल्या देखील !

**वा०**--तूं तर नवलावर नवल सांगते आहेस बाई ! लग्नाच्या अगोदर म्हणे पतीची सेवा ! असं कांहीं कुठं ऐकलं देखिल नाहीं बाई ! का थट्टाच चालविली आहेस सगळी !

**ब०**—अग भलतंच् ! हा थट्टेचा का विषय आहे ?

**वा०**—ताईसाहेब सेवा करतात त्या बैराग्याची ! अन् ती कशी बाई !

**ब०**—ती कशी म्हणजे ! त्याच्या पूजेचीं फुलं आणून ठेवायचीं. वेदीचं सडासंमार्जन करून ठेवायचं. देवतांच्या अभिषेकाकरितां पुष्करणिचं पाणी आणून ठेवायचं. अग्निपूजेकरितां दर्भ, समिधा वगैरे आणून ठेवायच्या. शिवाय छाट्या, लंगोट्या वगैरे वस्त्रं धुऊन वाळत टाकावयाचीं. हीच सेवा, दुसरं काय ?

**वा०**—अग, ताईसाहेबांसारखी बायको मिळाल्यावर तरी हा तपश्चर्या सोडून गृहस्थ नाहीं का होणार? असा वर व अशी वधू साऱ्या जगांत सांपडणार नाहींत ! वराचं कांहींच पाहिलं नाहीं हें कसं बाई ?

**ब०**—अग, नारदांच्या वचनावर त्यांचा पुरा विश्वास आहे.

**वा०**—पण राणीसाहेब कशा वळल्या ? त्यांना तर मुलीची काळजी सर्वांपेक्षां जास्त पाहिजे.

**ब०**—त्या कांहीं सामान्य स्त्रियांतल्या नाहींत. शिवाय महाराजांच्या मर्जीबाहेर त्या कधींच वागत नाहींत.

**वा०**--मला तर बाई, या लग्नाचा अर्थच समजत नाहीं ! आपल्या ताईसाहेबांचं कल्याण होवो एवढीच इच्छा आहे. प्रभु ती सफल करो !

**ब०**—माझी देखील बाई तशीच इच्छा आहे. एकंदरींत मोठ्यांचे व्यवहार मोठेच. आपल्या सारख्यांना तर ते गूढच ! बरं. सगळी मौज आतां दिसेलच. चला जाऊं या.

[ जातात. पडदा पडतो. ]

## प्रवेश पहिला.

[ स्थलः-क्रीडोद्यान; पात्रें पार्वती, जया व विजया. ]

**पा०**--त्या तरुण ऋषिकुमाराच्या स्वप्नाची हकीकत अगदीं खरी होऊं पाहात आहे ! केवढा चमत्कार हा बाई !

**वि०**--सखि ! मीं तुला तेव्हांच सांगितलं होतं कीं असलीं स्वप्नं हजार हिश्शांनीं खोटीं ठरत नाहींत. नारदमुनींच्या वरानें तर त्यावर खरेपणाचं शिक्का-मोर्तब ठोकलं आहे.

**पा०**--त्या तारुण्याच्या पहिल्याच दर्शनानं बाबांवर व आईवर केवढा अनु-कूल परिणाम झाला ! यावरून त्या तरुणांत कांहीं तरी अलौकिक असलं पाहिजे, नव्हे का ?

**वि०**--यांत काय संशय ? त्याच्या शरीरावर तपाचं तेज कसं झळकतं आहे व विद्येच्या प्रकाशाची तरी केवढी झळाळी मारिते आहे !

**ज०**--आणि वय लहान असून गंभीरपणा केवढा !

**वि०**--विद्या मोटी असून विनय तरी किती !

**ज०**--तप कडक असून वृत्तींत सौम्यपणा कोण !

**वि०**--तारुण्याचा भर असून इंद्रियदमन केवढं जबरदस्त !

**ज०**--कौपीन हीच संपत्ति असून राजराजेश्वराचं वैभव जणूं भोगतो आहे !

**वि०**--सौंदर्यांत देखील पार्वतीवर ताण आहे ! पार्वतीला यापुढं या बाबतींत गर्वाचं कारण राहिलं नाहीं !

**पा०**--तुम्ही म्हणतां तें सगळं खरंच आहे. पण बाबांनीं त्या तापसाची सेवा करण्याविषयीं मला आज्ञा केली, यांत त्यांचा कांहीं तरी हेतु असेल नव्हे ?

**वि०**--अर्थात्. शिवाय आम्ही दोघींनीं तुझ्याबरोबर असावं अशीही त्यांनीं तजवीज केली. हिच्यांत देखील त्यांची दीर्घ दृष्टि व व्यवहारचातुर्य हीं दिसून येतात !

**ज०**--अग यांत काय शंका आहे ? वराचा स्वभाव कसा आहे, चालरीत कशी आहे, आवडनिवड कोणत्या प्रकारची आहे. संवयी काय आहेत, सहचर कोण असतात, दिनचर्या कशी असते, वगैरे सर्व कळावं म्हणून ही महाराजांनीं युक्ति योजली असावी असं मला वाटतं !

**पा०**-- आणि वडील माणसांनीं असं धूर्तपणानें वागणं योग्य नाहीं का ?

**वि०**--अगदीं योग्य.

पा०––आपण आज इतके दिवस त्या तापसाची सेवा करीत आहों, पण त्याच्या वर्तनांत मर्यादेचा अतिक्रम तिळमात्र तरी दिसला का?

ज०––छे! एकदा सुद्धां नाहीं. आणि सरळपणा तरी किती! भृकुटी सरळ, कटाक्ष सरळ, भाषण सरळ, सगळंच सरळ!

वि०––तारुण्यांतील नागमोडी व्यवहार त्यांत कधींच दिसला नाहीं बाई!

ज०––बरं, या पार्वतीबरोबर तिच्या सख्यांचं लोढणं कशाला? असंही त्याला कधीं वाटलं नाहीं!

पा०––सख्यानों, तुम्हीं पाहिलंच असल. त्या महानुभावाचं आपणां तिघी-जणींवर सारखंच लक्ष व त्यांविषयीं सारखाच आदर!

वि०––थोर ते थोरच!

ज०––एकदा बेलाचीं पानं मला अगदीं थोडीं मिळालीं. तेव्हां तीं त्यांच्या पुढं कशीं करावीं या पंचायतींत मी पडलें. इतक्यांत स्वारी तें ओळखून प्रस-न्नतेनें म्हणाली, ‘ बाई जये! देवाला थोडं देखील पुरतं बरं! मात्र तें भक्तीनं दिलं म्हणजे झालं. आण इकडे ती परडी पाहूं!’

वि०––खरंच. मला देखील ते शब्द चांगले आठवतात. तेवढेच शब्द त्यांच्या मुखांतले ऐकले मीं बाई! पण तेवढयावरून त्यांचा स्वर मधुर, गंभीर व स्निग्ध असावा असा तर्क केला.

ज०––आपली सखी पार्वती किती तरी वेळा पूजेच्या वेळीं त्याच्या जवळ उभी असते! पण तिच्याकडे देखील त्याचं वर डोळा करून पाहणं नाहीं! सगळं मुक्याचं व्रत!

वि०––गडे पार्वती! हें मुक्याचं व्रत पुढं सतत असंच चालावयाचं कीं काय?

पा०––किती तरी थट्टा ही!

( राग काफी, ता० दीपचंदी )

स्वागता मुनिमूर्ती, मधुरा,
प्रत्यक्ष दिसे अधिकची रुचिरा ॥ धृ० ॥
वस्तुस्थिति ती आणि कल्पना,
भेद तयांतिल व्यक्त मम मना;
पटतो काय तुम्हांला!
शंका यांत न लवहा सजला. ॥१॥ स्वागता०॥

ज०—कल्पनेंतलं चित्र पुष्कळवेळां प्रत्यक्षापेक्षां अधिक भडकदार दिसतं. पण त्याच्या उलट या ठिकाणीं अनुभव आला बाई !

वि०– गडे पार्वती ! त्या तापसाचं तूं जें चित्र काढिलं होतं त्याच्या किती तरी पटीनं त्याचं प्रत्यक्ष दर्शन रम्य आहे !

पा०—( स्मरण झाल्यासारखं करून ) अग खरंच ! वासंतिकेला तें चित्र इकडे घेऊन ये म्हणून मीं सांगितलं होतं. अजून ती कशी येत नाहीं !

( वासंतिका प्रवेश करून )

वा०—बाईसाहेब, हें सरकारनीं मागितलेलं चित्र. ( चित्र पुढें करिते. )

पा०—अग इतक्यांतच तुझं स्मरण केलं होतं. बरं अगदीं वेळेवर आणलंस. बरं, जा. ( जाते. )

पा०—विजये, अग जये ! हें चित्र पहा. स्वप्नांत एकदाच दर्शन झाल्यावर हें काढिलं आहे हो ! याच्यांत आतां पुष्कळच फेरफार करावे लागतील नाहीं ?

वि०—असं तर खरंच.

ज०—आणि तो प्रत्येक बाबींत करावा लागणार. स्थूलमानानें एकंदरींत ओळख पटते यांत कांहीं संशय नाहीं. गडे पार्वती ! तुझ्या मनाची पकड मोठी विलक्षण आहे बाई ! मला तरी बाई एकदा पाहून असं चित्र नाहीं काढतां येणार ?

पा०—पहिला मोठा फरक म्हणजे वयाचा दिसतो नाहीं बरं ! या चित्रांत तारुण्य स्पष्ट आहे. पण प्रत्यक्षांत त्याचा ऐन भर आहे.

वि०—पहिली तर अगदीं महत्त्वाची व मख्खीचीच गोष्ट सांगितलीस बाई !

ज०—दुसरा उघड उघड दिसणारा फरक सांगूं का मीं ?

पा० सांग तर. तुझं तरी अवलोकन किती आहे तें समजेल.

ज०—अग, त्या चित्रांत त्या तरुणाचे हात तूं लहान काढलेले दिसतात. बाकी त्याचे दोहोंचे चार हात झाल्यावर एकंदरींत हिशेब ठीक जुळेल !

वि०—अग खरंच ! तो आजानुबाहु आहे. हें मोठ्या भाग्याचं लक्षण आहे हो!

ज०—योग्यच आहे. शत्रूचा पराभव व प्रियेचं आलिंगन हीं दोन्हीं कामं या बाहुपाशाकडेसच आहेत !

पा०—( लक्ष्य न दिलेसं दाखवून )

[ राग झिंजोटी, ता० दादरा. ]

कंठींची स्फटिक-माला नाहीं ही साधली,
अंगुलिची अरुण-कांती त्यांत नसे बिंबली,
रचना ही कुंतलांची थोडीशी बिघडली,
मुखलक्ष्मी अधिक वाटे गंभीरा उतरली ! ।। कंठींची ।।

ज०--डोळे मात्र हुबेहूब साधले आहेत बरं का ! चित्र काढणारणीनं त्याला आपल्याकडेसच पाहावयाला लावलं आहे ही त्यांत आणखी मौज आहे !

पा०--दया, शांति, साधुता इत्यादि गुण मुद्रेवर चांगले प्रतिबिंबित झाले आहेत.

पा०--आणि याचा प्रत्यक्ष अनुभव आलाच आहे. पहिले दिवशीं आपल्याला त्याची केवढी भीति वाटली होती ! पण ती अगदीं अनाठायीं होती असं ठरलं. नारदांचा वर व शिवाचं प्रत्यक्ष दर्शन यामुळें माझ्या मनाला सर्व गोष्टी पटत चालल्या आहेत व हाच माझा पूर्वजन्मींचा पति अशी भावना दृढ होत चालली आहे. मीं याला मनानं वरिलं आहे. या निश्चयापासून मी कधींही अणुमात्रसुद्धां ढळणार नाहीं.

वि०--गडे, तुझं कल्याण होवो ! तुझ्या इच्छेप्रमाणं सर्व गोष्टी घडून येवोत! राणीसाहेब व महाराज यांची तुला पूर्ण अनुकूलता आहे, ही केवढी भाग्याची गोष्ट आहे ! हीं सर्व शुभ चिन्हं आहेत. तुला कांहीं काळजी वाटूं देऊं नकोस.

ज०--आमची तुझी ताटातूट होईल ती आम्ही आनंदानें सहन करूं. पण तुझं कल्याण झालं म्हणजे आम्हीं मिळविलं बाई पार्वति !

पा०--तुमचं माझ्यावर खरं प्रेम आहे. त्याला योग्य अशीच तुमची इच्छा आहे, हें पाहून माझ्या मनाला किती तरी समाधान वाटतं आहे !

वि०--मला वाटतं, हा विवाहाचा योग महाराजांनीं लवकर जुळवून आणावा, हें बरं.

पा०--पण त्या तरुणाकडून कन्येकरितां रीतसर मागणी आल्याशिवाय बाबा असं करणार नाहींत.

वि०--मग हें व्हावं कसं ! तो तपस्वी देखील, ' मला तुमची कन्या द्या. ' असं म्हणेल असा रंग दिसत नाहीं. तो तर परमार्थामार्गं लागला आहे !

ज० –तरी पण ज्या अर्थी त्यानें आपल्या सेवेचा स्वीकार केला आहे त्या अर्थी तो पार्वतीवर अनुग्रह केल्याखेरीज राहाणार नाहीं असं मला खचित वाटतं.

पा०--( राग कालंगडा, ता० धुमाळी. )

चिन्हें नसती बाह्य वरी तरि अंतरिं सम विश्वास असे,
त्या योगानें सखयानों बहु धीर तयाला वाटतसे.
तोच कांत मम, मंगल तोची, सर्वस्वचि मम तो गमतो,
तोच जीवनाधार, जीव हा तत्पद्-कमलीं अलि रमतो !

तेव्हां अशीच मनापासून त्यांची सेवा करीत राहूं. त्यांत काय सोक्षमोक्ष होईल तो होईल. आतां संध्याकाळ होत आली. चला, वाड्यांत जाऊं या.

[ जातात. पडदा पडतो. ]

---

## प्रवेश दुसरा.

( स्थळ–शिवाचें तपोवन; पात्रें–शृंगी व भृंगी. )

शृं०—ए भृंगी ! बैस जरा. थोडी गंमत सांगतों ये.

भृं०—अरे मुनिवर्यांना कटकट होईल. गडबड उपयोगी नाहीं.

शृं०– अरे छी ! त्यांची समाधि लागली आहे. दोन घंटे पाहिजे आहेत ती उतरायला.

भृं०—मग कांहींच हरकत नाहीं. कसली गंमत म्हणतोस ?

शृं०—अरे अलीकडे गंमतीवर गमती चालल्या आहेत बाबा ! मी येथें आश्रमाच्या द्वारावर असल्यानें मला सगळी बित्तं बातमी असते.

भृं०—खरंच. मी फक्त सकाळसंध्याकाळ फुलं तोडून आणतों व रात्रीचा पहारा करतों. मला जगांतली वार्ताच लागत नाहीं कांहीं बोवा !

शृं०—अरे पण अगोदर थंडाईचा एक पेला तर बडवूं या ! मग दुसरी बात ! आज मसाला काय चमचमीत घातला आहे ! नुसता वासच काय बढीया आहे !

भृं० – मग वासावरच आमची समजूत करण्याचा विचार आहे वाटतं !

शृं०—छे छे ! असं कधीं झालं आहे का ? हा पहा लोटा तयार करून ठेविला आहे ! मी तुझी वाटच पहात होतों. ही विजया आपलं सौभाग्य आहे सौभाग्य ! हिच्या चुंबनाशिवाय रंग येत नाहीं.

भृं०—( लोट्यांतील विजयेकडे पाहून ) वसुंधरेच्या शालूप्रमाणें हा हिचा रंग कसा हिरवागार दिसतो आहे पहा ! ओठापासून पोटापर्यंत गारीगार करून सोडणारी ही अमृतवल्ली आहे !

शृं० —अरे हें भूतलावरील अमृतच !

भृं० —स्वर्गांतील अमृताकरितां देवदैत्यांचा झगडा झाला तसा प्रकार हिच्या संबंधानें अद्यापि सुरू झाला नाहीं ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे !

शृं०—आणि शंभूसारख्यानें हिचा आदर केला म्हणून हिला शांभवी असं ऐटदार व अगडबंब नांव मिळालं आहे ! त्यामुळं हिच्या उपासकांना देखील एक प्रकारची प्रतिष्ठाच वाटत आहे !

भृं०—पण वारुणीनें शुक्राचार्याला फशी पाडलं तसं विजयेनं अद्याप केलं नाहीं हो !

शृं०—आणि म्हणूनच वारुणीच्या उपासकांना शाप मिळाला !

भृं० – विजयेच्या भक्तांवर असा कधीं प्रसंग यावयाचा नाहीं हो !

शृं०— भलतंच ! उलटं मी म्हणतों तिचं माहात्म्य व प्रस्थ वाढतच जाईल !

भृं० — चंद्रासारखा भाऊ, लक्ष्मीसारखी बहीण, शुक्रासारखा पुरस्कर्ता, असं असून वारुणीनं आपलं नांव आपल्या गुणानं घालवलं ! या विजयेचा पराक्रम मात्र अगदीं कायम आहे. तिनं आपल्या नांवाची खरोखर सार्थकता केली. मन इतकं चंचल आहे ना ? पण तें एकाग्र करावयाला विजयेसारखं रामबाण साधन नाहीं !

शृं०—आणि बुद्धीचं स्फुरण आणि तरतरी तरी ती किती वाढविते ! मला नक्की आठवतं. फार जुनी गोष्ट आहे. लहानपणीं मला कितीदां घोकलं तरी पाठच येत नसे. पण शांभवीचा प्रसन्न कटाक्ष माझ्यावर पडल्याबरोबर दाहा दिवसांचे पाठ मी एका दिवसांत तयार करूं लागलों ! पण यामुळं माझ्या विद्वान् गुरुजींचा मात्र माझ्यावर थोडासा रोष झाला !

भृं०—तो कां बावा !

शृं०—त्यांचं विद्येचं भांडवल लवकर संपुष्टांत येऊं लागलं म्हणून !

भृं०—मोठ्या मनाचेच पंतोजी ते ! चेल्याची तयारी त्यांना पाहावेना ! वाहवा रे गुरुजी ! बरं तें राहो. विजयेचा आणखी एक गुण आहे. आंग, थंड

पडल्यास गरम करणं व गरम झाल्यास थंड करणं असा तिचा दुहेरी उपयोग आहे. निदान मला तरी असा अनुभव आहे.

शृं०—स्मरणशक्तिवर तर ही फारच वस्ताद ! व्यासांनीं विजयापुराण लिहिलं असतं म्हणजे केवढं काम झालं असतं ! लोकांना इतिहासपुराणांचं वारंवार विस्मरण होण्याचा प्रसंग मग आला नसता !

भृं०—विजया पचनशक्ति तरी किती वाढविते ! लाडवांच्या तीन विसकड्या तर अस्मादिक हा हा म्हणतां उडवितात !

शृं०—होय ! पुढं येण्याचा मात्र अवकाश ! वरं तें राहूं दे. अगोदर पेल्यावर हात तर मारूं या. ( दोन पेले तयार करून एक आपण हातांत घेतो व दुसरा भृंगीच्या हातांत देतो. दोघे पेले तोंडाशीं नेऊन " बं भोलानाथ ! बं भोलानाथ ! जय मृत्युंजय ! जय मृत्युंजय!" असें ओरडून ते झोकतात. )

भृं० भट्टी खाशी साधली आहे बोवा ! काय खुमारी लागते आहे मसाल्याची !

शृं०—अरे, हिच्यावर मुनिराज देखील बहोत खुष आहेत ! आणि म्हणूनच त्यांची माझ्यावर मोठी मर्जी आहे.हा विजयेचा माझ्यावर उपकारच आहे मोठा !

भृं०—मग महाराज काय बुटीच्या रंगांतच दंग असतात वाटतं !

शृं०—छी:, ते अगदीं बेतानं व एकवेळच घेतात.

भृं०—मोठंच इंद्रियदमन आहे ! ( आपल्या पेल्याकडे बोट दाखवून ) ओत पाहूं आणखी थोडीशी यांत. हेंही पचनेंद्रियाचं दमनच आहे. जठराग्नीची पूजाच ही ! हें आपलं अग्निहोत्र करा अगदीं अखंड चाललय पण ! ( पुन्हा दोघे पेले पितात व 'बं भोलानाथ ! बं भोलानाथ !' असें ओरडतात. )

शृं०—कां आतां बेत बसला ना ठीक !

भृं०—आत्तां थोडा मजा येत चालला ! रंग पुढंच आहे अजून ! आतां सांग तुझी गंमत पाहूं.

शृं०—अरे ती फार गुप्त आहे गुप्त !

भृं०—मग येथें कोण आहे तिसरं ती ऐकायला ?

शृं०—अरे त्याचा काय नियम ? निर्जीवाला देखील कान व वाचा फुटतात ह्मणतात ! तुझ्या कानांत सांगतों हवी तर.

भृं०—बरं. तसं कर. हरकत नाहीं.

शृं०—[ भृंगीच्या कानांत ] अरे महाराजांचं लग्न ठरतं आहे लग्न !

भृं०—[ मोठ्यानें ] महाराजांचं लग्न ठरतं आहे होय !

शृं० – अरे ही गोष्ट गुप्त आहे ह्मणून तुला सांगितलं होतं ना ! केवढ्यानं ओरडून तूं जाहीर केलीस ही ! हे विजयेचे उपासक केव्हां केव्हां अस्सा अजागळपणा करितात ! हें खरोखर तिला मोठं लांछन आहे बुवा !

भृं०—चुकलं खरं गड्या ! पण आपण दोघंच आहों इथें. वार्ता कांहीं षट्कर्णी झाली नाहीं अजून ! पण मी ह्मणतों मुनिवर्यांच्या मनांत ही गोष्ट आली तरी कशी ?

शृं०—अरे ! आलीकडे हिमवानाची मुलगी पार्वती आपल्या सख्या जया व विजया यांना बरोबर घेऊन महाराजांची सेवा करावयाला येत असते रोज सकाळीं !

भृं०—महाराज तर कुमारींकडे पहात देखील नाहीं ह्मणतात. मग हें कसं ?

शृं०—शिव पार्वतीवर प्रसन्न आहेत असं स्पष्ट दिसतं आहे; आणि त्या मुलींच्या परस्पराशीं थट्टा चालतात त्यांवरून मीं असा तर्क बांधला आहे.

भृं०—तुझा तर्क अगदीं खरा ठरो बाबा ! आपल्या पथ्यावरच गोष्ट आहे ती. काय समजलास ?

शृं०—ती कशी बाबा !

भृं० – अरे लग्नांत 'मिष्टान्नमितरे जनाः !' आपल्या सारख्यांची पुख्यांची चंगळ उडणार ! मग कधींचा मुहूर्त आहे ? शुभं च शीघ्रं च.

शृं०—तें कांहीं नक्की कळत नाहीं. येईल आपोआपच बाहेर सगळं.

भृं०—अरे पण एक गोष्ट मोठी चमत्कारिक दिसते आहे ! पार्वती पडली राजकन्या व महाराज तर तपस्वी ! तेव्हां, मी ह्मणतों, यांचं जुळायचं कसं ?

शृं०—होय खरं आहे. महाराजांनीं तरी राजा झालं पाहिजे, किंवा पार्वतीनं तरी जोगीण बनलं पाहिजे ! तिसरा मार्ग नाहीं !

भृं०—पण त्या जोडप्याचं कसं चालेल याची उठाठेव आपल्याला कशाला ? हा योग मात्र ठीक आहे. हिमवान् मोठा वैभवशाली आहे. लग्न मोठं घनचक्कर होणार यांत शंकाच नाहीं. एक महिनाभर तरी घृतकुल्या मधुकुल्या यांना पूर येईल बोवा !

शृं०—त्या पूरांत आपल्यासारखे भिक्षुक तरंगत राहतील, गटंगळ्या खातील कदाचित् वाहूनही जातील, गड्या !

भृं०—अरे मी ह्मणतों प्राणालाही मुकले तरी हरकत नाहीं. प्राण हे जन्मोजन्मीं आहेतच ! पण परान्नाचा कपिलापष्ठीचा योग मात्र दुर्लभ आहे ! काय समजलास ?

शृं०—अगदीं खरं आहे बोवा, तुझं ह्मणणं.

भृं०–आणि त्या जया–विजयाही, म्हटलं,लग्नाच्या असतील ?

शृं०—होय. मग काय म्हणणं आहे तुझं ?

भृं०—दुसरं काय असायचं आहे ! मी म्हणतों, तुझं लग्न व्हावयाचंच आहे, आणि–( लाजतो आणि हांसतो. )

शृं०–' माझंही व्हावयाचं ' असं ह्मण कीं पुढं ! लाजायला काय झालं ? पण विजयेच्या रंगांत आपले हे ढंग चालले आहेत असं वाटतं ! अरे,त्या थोरा मोठ्यांच्या मुली ! आणि आपण तर कफल्लक! तेव्हां ही कल्पना देखील शक्य नाहीं !

भृं०–तें मात्र सांगू नको ! कारण स्त्रीचं चरित्र व पुरुषाचं भाग्य मनुष्याला तर नाहींच पण देवाला देखील कळत नाहीं म्हणतात !

शृं०–तुझ्या मनोरथाची धांव फार लांब चालली आहे अं !

भृं०—अरे ! यांत काय आहे ? धन्याबरोबर चाकरांचीं लग्नं जुळलीं तर त्यांत वाईट काय ? उलटं धनिणीला आपल्या कुटुंबांची चांगली सोबत होइल. या तपोवनांत पार्वती एकटी राहील कशी ?

शृं०—मोठा कल्पक दिसतोस बोवा ! बाकी त्या जया–विजयाही मोठ्या गोड पोरी आहेत हो !

भृं०—मी तर विजया या नांवावरच खूष आहे ! कारण आमचं उपास्यदैवताचं नांव पडलं तें !

शृं०—अरे, तीही तुझ्या नांवावर बहाल आहे !

भृं०—म्हणजे ? तें कसं बुवा !

शृं०—एकदा तिनें मला विचारलं, कायरे शृंगी ! तुझ्याबरोबर केव्हां केव्हां तो दुसरा मुलगा असतो तो कोण रे ? मीं सांगितलं तो माझा मित्र आहे, त्याचं नांव भृंगी ! मग ती हंसून म्हणाली, शृंगीला भृंगी मिळाला, किती तरी नांव गोड आहे हें !

भृं०—नुसत्या नांवांचीं लग्न होत असतीं तर मीं हें लग्न तेव्हांच लावून टाकलं असतं ! खचित सांगतों.

शृं०—मग गुडघ्याला बाशिंग बांधण्याचा विचार आहे वाटतं ! ती जयाही कांहीं कमी थट्टेखोर नाहीं. ती माझ्याशीं किती तरी थट्टा करीत असते !

भृं०—मग तुझ्यावर जय मिळवून तिनें आपलं नांव यथार्थ केलं वाटतं !

शृं०—माझ्या गुणांवर ती लुब्ध झालेली दिसते खरी !

भृं०—आणि रूपावर तरी आषक कां न व्हावी ? तुझा चेहरा कांहीं अगदींच बेढब आहे असं नाहीं. बराच ढबदार आहे. निदान माझ्यापेक्षां तरी तूं निःसंशय अधिक सुंदर आहेस.

शृं०—यांत कांहींच संशय नाहीं ! कुणीही आपल्याला पाहिल्याबरोबर मारुतीच्या वंशांतले आपण आहों, निदान त्याच्या अगदीं जवळचे नातेवाईक आहों हें बिनचूक चटकन् सांगेल !

भृं०—गड्या थट्टेवर घालवूं नकोस. तूं थट्टेखोर, जयाही थट्टेखोर. तुमचा ज़ोडा खचित शोभेल हें वाटेवरचा पोर देखील सांगेल.

शृं०—आणि कल्पनाच करावयाची तर मी असं म्हणतों कीं विजयेची माळ तुझ्या गळ्यांत पडली तर काय वाईट ?

भृं०—एका विजयेची पडलीच आहे. तिची सवत दुसरी विजया नको व्हायला ! दोघींच्या कटकटींत माझं कंडण व्हावयाचं ' एकीचा प्रसाद आहे तेवढा पुरा आहे बाबा ! हे आपले मनोरथ वाढत चालले हो !

शृं०—हाही विजयेचाच प्रभाव !

भृं०—बरं, या महाराजांच्या लग्नांत आपण वराकडचे वऱ्हाडी व मानकरी आहोंत आं ! आपण मान चोपून घेणार !

शृं०—व्याही समर्थच आहेत. तेही तुम्हांला मान चोपून देतील !

भृं०—जांवयाला रुसविण्याचं काम तुझ्या हातांत आहे गड्या ! ही संधि दवडूं नकोस ! नाहीं तर साळे भोळे जामात नुसत्या भस्मावर किंवा रुद्राक्षावरच समजावयाचे !

शृं०—बरी आठवण केलीस ! याची तरतूद आगाऊच करून ठेविली पाहिजे हो ! आयत्या वेळीं डाव फसावयाचा नाहीं तर !

भृं०—मला वाटतं जावयांनीं आपलं गांवढळ वाहन नंदीबैल टाकून

देऊन त्याच्या ऐवजीं ऐरावतासारखा हत्ती सासऱ्या जवळ मागावा !

शृं०—छी ! छी ! असलं लचांड नाहीं कामाचं हो ! कारण त्याची व्यवस्था ठेवण्याचं लफडं आपल्याच गळ्यांत पडावयाचं ! आहे हेंच काम आपणास उरकत नाहीं. मग हें असलं विकत श्राद्ध व सव्यापसव्य कशाला ? ज्यांत जांवयाचा व आपला असा दुहेरी फायदा असं कांहीं तरी मागणं मागितलं पाहिजे.

भृं०—खरंच ! शिवाच्या अंगावर सर्पभूषणें फार आहेत. तीं आम्हांला तर भिववितातच पण आपल्या धन्याला देखील एखाद्या वेळीं दगा द्यायचीं हो ! शिवाय पार्वती इकडे आल्यावर तिला देखील त्यांपासून भयच आहे. म्हणून म्हणतों या सर्वांचा योग्य बंदोबस्त करणारा गरुड वैकुंठाहून कैलासावर आणून ठेवावा, असं मागणं मागावं.

शृं०—अरे वेड्या ! सर्पांचा बंदोबस्त कसाही होईल. ती कांहीं मोठीशी बाब नाहीं. देव प्रसन्न झाला तर त्याजपाशीं ताकपीठ कां मागायचं ! मागायला तरी अक्कल लागते बाबा ! मला वाटतं, कैलास–प्रांताचं राज्य शिवानीं हिमवानापाशीं मागावं. त्यांत सगळं कांहीं आलं मग.

भृं०—अरे होय रे होय ! मग महाराजांचा मुख्य मंत्री तूं आं ! हें ठरलंच. आणि मी कोण होणार सांग पाहूं ?

शृं०—उघड आहे तें. तुझ्या सारख्या पराक्रमी पुरुषाला सेनापति होणंच योग्य आहे.

भृं०—( हातावर टाळी देऊन ) तेंच मी ह्मणत होतों, अगदीं तेंच ! तूं पण कसं अगदीं बिनचूक ओळखलंस ! मग जुळलाच सगळा बेत ! महाराज व राणीसाहेब आपल्या महालांत कांहीं का गोंधळ घालीनात मग ! काय समजलास ? बरं. मंत्री झाल्यावर राज्यांत पहिली सुधारणा तूं कोणती करशील सांग पाहूं ?

शृं०—कोणती म्हणजे ! एवढी देखील तुला कल्पना करतां येत नाहीं ! ऐक तर मग, अस्मादिक काय करणार तें. विजयेकरतां सगळ्या राज्यांतलीं रानें राखून ठेवीन, प्रत्येक घरीं विजयेचा एक तरी भक्त असलाच पाहिजे असा कायदा करीन, विजयेच्या भक्तांकरितां रस्तोरस्तीं विजयापानाचे अड्डे स्थापीन, मोठमोठ्या विजयाभक्तांना मोठ्या हुद्याच्या व मानाच्या जागा देईन. यामुळें

महाराजांच्या तिजोरींत पैसा व प्रजेच्या पदरांत विजयाप्रसाद यथास्थित पडेल ! तूं सांग पाहूं, सेनापति झालास म्हणजे काय करशील तें ?

भृं०–विजयेच्या सेवनानें लोक एकचित्त झाले म्हणजे राज्यांत दंग्याधोप्याचं कारणच राहिलं नाहीं. मग माझ्या तलवारीला म्यानाच्या बाहेर डोकावण्याचं काम नाहीं. तिनेंही ताणून झोंप काढावयाला हरकत नहीं. ( इतक्यांत पडद्या-पलीकडे अशी सूचना होते:– हे प्रमथादि गणानों ! योगीश्वर मृत्युंजय यांचा समाधि उतरण्याचा समय अगदीं जवळ आला आहे, तेव्हां सर्वांनीं आपआपल्या कामांत सावध राहावें:—हे शब्द ऐकून दोघेही चपापतात )

शृं० –अरे भृंगी ! लग्नाचा सोहोळा पुष्कळ झाला आतां बाबा ! राज्यकार-भारही बस्स झाला ! ही ऐकलीस का नंदिकेश्वराची आज्ञा ?

भृं०––पळा पळा तर मग आतां ! नंदीच्या तडाक्यांत सांपडलों तर माझं कल्पनेतलं सेनापत्य देखील येथंच गळून पडावयाचं !

( पळत जातात. पडदा पडतो. )

---

## प्रवेश तिसरा.

( स्थल–हिमालयावरील शिवाश्रम; पात्रें–पार्वती व शिव )

**पार्वती**—( आत्मगत ) मुलीच्या जन्माला जे पापग्रह असतील ते वेगळेच; पण साधारणपणें मुलीच्या पाठीस लागणारा जबरदस्त पापग्रह म्हणजे लोकग्रह होय यांत शंका नाहीं. मुलगी जन्माला आली म्हणजे लोक नाकें मुरडतात. प्रत्यक्ष आईबापांना देखील थोडं वाईटच वाटतं ! मुलीचा जन्म म्हणजे खरोखर एक दिव्यच आहे ! पण माझ्या नशीबानं मी या नियमाला अगदीं अपवाद ठरल्यें.

( राग जंगला, ताल धुमाळी )

सजवरती करिति पहा सगळे प्रेम किती ॥ धृ० ॥
जननी–प्रेमा नसेचि सीमा । बाबा करिती प्रीति निरुपमा ।
कौतुक दादा करि, जन होई मुदित अती ॥ १॥

माझं बाळपण बाबांच्या घरीं अतिसुखांत गेलं, हल्लीं यौवनही मी तिथेंच मोठ्या आनंदांत घालवीत आहें. मला काळजी हा पदार्थच ठाऊक नाहीं. अपमा-नाची मला कल्पना सुद्धां नाहीं. आईच्या व बाबांच्या प्रेमळ व शीतल छत्रा-

खालीं मी सुखानें राहात आहें. हें माझं माहेर किती निष्पाप, निष्कलंक, प्रेममय, उदात्त व उल्लास देणारं आहे बरं ! देवा ! खरोखरी मी स्वर्गसुखांत लोळतें आहें. सगळ्या जगांतल्या मुली माझ्यासारख्याच सुखी झाल्या तर माझा आनंद गगनांत मावणार नाहीं !

लग्न ही गोष्ट मुलीच्या आयुष्यांत क्रांति करून सोडणारी आहे. मी हल्लीं त्या संक्रमणस्थितींत आहें. या वेळेला माझ्या मनाची कशी स्थिति झाली आहे पहा,

( राग जिल्हा खमाज, ताल पंजाबी )

मम मन चंचल पहा जाहलें, त्यासी न कांहीं आजि कळे ।। ध्रु० ।।
मुनिचें मुळीं न मानस समजे, खचित न गूढ मनाला उमजे,
काय करूं अशा कठिण समयिं मी, लवहि हें मजसी मग नाकळे १

मी व जयाविजयांनीं त्यास पहिल्या दिवशीं वंदन केलं तेव्हां त्यानं आमचीं नांवं विचारण्यापलीकडे व नमस्कार स्वीकारण्यापलीकडे कांहींच भाषण वगैरे केलं नाहीं.मग प्रणयाची गोष्ट दूरच ! आजपर्यंत त्या तरुणाची आपण सेवा केली. पण पहिल्या दिवसाच्या पलीकडे त्याचं पाऊल नाहीं ! हा काय बरं प्रकार ! बरं; माझ्यासारख्या कुलीन मुलीनं त्याच्याशीं आपण होऊन बोलावयाचं धाडस तरी कसं करावं ! व तसं करणं योग्य होईल काय ? माझ्यावर त्या यतीचं खरं प्रेम तरी आहे किंवा नाहीं याचीच बाई मला नीट कल्पना होत नाहीं ! विजयेला देखील अशीच शंका येत आहे.

( दिंडी, राग लीलांबरी, ता. दादरा )

तरुण–तरुणींच्या कथा–प्रसंगाला
रंग आणिति वक्रोक्ति भृकुटि–लीला ।
वक्र वीक्षण, परिहास, मंद हास.
दिसे तापस यांविषयिं परि उदास ! ।।

असं इथं सगळंच थंड दिसतं आहे बाई ! यावरून समजावं तरी काय मेलं ! विजयेनें सुचविल्याप्रमाणें त्या यतीची एकांतांत गांठ घ्यावी व थोडी परीक्षा पाहावी हाच उत्तम मार्ग दिसतो. असं केलं म्हणजे माझ्या मनाची तळमळ तरी एकदाची दूर होईल. पण ( विचार करून ) यामध्यें मर्यादेचा तर भंग नाहींना होणार ? [ थांबून ] छीः, ही शंकाच नको.

( राग देसकार, ता. दादरा )

नच मर्यादा भंगे पहा आजी ॥ ध्रृ० ॥
प्राणांचा या जो धनी तच्चित्ता ओळखाया !
दिसत नसे युक्ती दुजी ॥ १ ॥

कदाचित् यांत अतिप्रसंग असलाच तर तो परक्याच्या थोडाच दृष्टीस पडणार आहे ! तर मग आतां त्याच्या पर्णकुटिकेकडेसच जावं. ( कांहीं पावलं टाकून ) पहा, ती दिसावयाला लागलीच ! दारावर शृंगी उभा आहे वाटतं. [ निरखून ] होय तोच आहे. याच्याबरोबर यतिवर्यांना आंत निरोप पाठवावा तर मग. [ जवळ जाऊन ] अरे शृंगी !

शृं०—बाईसाहेब, काय आज्ञा आहे ?

पा०—यतिवर्यांना आंत जाऊन कळीव कीं पार्वती आली आहे दर्शनाला.

शृं०—होय बाईसाहेब, ( आंत जाऊन शिवास ) महाराज ! बाहेर पार्वतीबाई आल्या आहेत. आपलं दर्शन घेऊं इच्छितात.

शि०—असं ? एकट्याच कीं दुसरं कुणी आहे बरोबर ?

शृं०—एकट्याच, महाराज.

शि०—बरं आहे. येऊं दे आंत.

शृं०—आज्ञा महाराज. ( बाहेर जातो व पार्वतीला ) बाईसाहेब, महाराजांनीं आंत बोलावलं आहे. चला, या माझ्या मागें. [ तो पुढें, पार्वती मागें असं चालतात. शिवाजवळ जातांच पार्वतीला पुढें करून शृंगी निघून जातो. ]

पा०–( शिवास ) आर्या, वंदन करितें ही पार्वती.

शि०—पार्वती ! तुझं कल्याण होवो ! आज तूं एकटी आणि या ऐन उन्हाच्या वेळीं कशी आलीस? घर्मांबूचं जाळं तुझ्या मुखकमलावर पसरलेलं दिसतं आहे ! तूं खर्चात फार थकून गेली आहेस. म्हणून म्हणतों, अंमळ विश्रांति घे. बैस तिथें आसनावर.

पा०–(स्वगत) स्वारी थोडी खुषींत दिसते आहे ! (उघड) या आपल्या मधुर शब्दांनींच मला पूर्ण विश्रांति मिळाली. माझा शीण अगदीं नाहींसा झाला !

शिव—माझ्या या वैभवाला तुझ्यासारखी अल्पसंतुष्ट पत्नी मिळणार ही फार चांगली गोष्ट आहे !

**पा०**–( स्वताशीं ) हें तर मोठें खुबीचं भाषण आहे ! ( उघड ) मला पदरांत घेणं झाल्यावर मी स्वतंत्र असणार तरी कशी ? नदी सागराला मिळाली म्हणजे सागरच झाली. ती पुढें नदीच्या रूपानं राहतच नाहीं. नव्हे का ? मग अल्पसंतोषाची भाषाच शक्य नाहीं, मला वाटतं.

**शिव**–( स्वताशीं ) हिनें तर कोटिक्रम करून मला कुंठित केलं ! ( उघड ) बरं. तूं आज एकटी येण्याचं साहस कसं केलंस ?

**पा०** सगळ्या जगाचा रक्षण करणारा जवळ असल्यावर मग मला भीति कसली व त्यांत साहस तें काय ?

**शिव**–आणि या अशा भर उन्हांत कशी आलीस ?

**पा०** –याचा दोष आपल्याकडेसच आहे.

**शिव**–तो कसा !

**पा०**– आपण दोषाकराला देखील डोक्यावर बसवितां मग माझ्यासारखीला आपण नुसतं दर्शन देखील का नाहीं देणार असल्या वेळीं !

**शिव**–( स्मित करून ) पार्वती ! थोडी विश्रांति घे म्हणजे अंमळ बरं वाटेल.

**पा०**–आपल्या डोक्यावर बसणारी शीतल गंगा व रम्य चंद्रकला यांनीं मला विश्रांति देण्याचं काम चालविलं आहे कीं ! आपणांस त्याची काळजी नसावी !

**शिव**–( स्वताशीं ) हें भाषण उपरोधिक दिसतं आहे ! [ उघड ] पूर्णचंद्रानें तुझ्या मुखाविषयीं पक्षपात दाखविला आहे व तुझ्या स्मितानें गंगेच्या शुभ्र व विमल तरंगांचा मदभंग केला आहे !

**पा०**—[ स्वगत ] माझ्या मर्मावर उत्तर आहे बरोबर ! ( उघड ) आपणांस थोडं विचारावंसं वाटतं आज्ञा असावी.

**शिव**–आज्ञा ! हा तर अनुग्रह होणार आहे आमच्यावर !

**पा०**–[ स्वगत ] आतां बाई मनाला बराच धीर आला ! ( उघड ) आपण मला स्वप्नांत एकदां भेट दिलेली आठवत असेल ?

**शिव**–[ स्वगत ] थोडी थट्टा करून पहावी. [ उघड ] स्वप्नं खरीं असतात थोडींच !

**पा०**–[ स्वगत ] अग बाई ! हें काय मी ऐकतें आहें ? ( उघड ) महाराज ! आपण अपरात्रीं या कुलीन कन्येच्या अंत:पुरांत प्रवेश केला होता, नव्हे ?

**शिव**-[ स्वगत ] अंतःकरणांत म्हटलं तर अधिक खरं होईल ! ( उघड ) आमच्यासारख्या यतींना ही गोष्ट वर्ज्य आहे.

**पा०**-[ विस्मयानें व विषादानें ] आपला व माझा पूर्वजन्मींचा संबंधही आपण सांगितला, असं मला पक्कं स्मरतं.

**शिव**—हा काय चमत्कार असेल तो असो !

**पा०**—[ स्वगत ] यांना सगळी स्वप्नकथा सांगून पहावी. ( उघड ) तूं पूर्वजन्मीं दक्ष-प्रजापतीची कन्या होतीस. तुझं नांव सती होतं. मी भव या नांवानें श्रुत होतों. तूं माझी पत्नी झालीस. तुझ्या पित्यानें आपला उभयतांचा अपमान केला म्हणून तूं त्याच्या यज्ञकुंडांत स्वतांच्या प्राणांची आहुती दिलीस, असंही आपण त्यावेळीं म्हणालां.

**शि०** चालूं दे. आम्ही ऐकतों आहों.

**पा०**—( स्वगत ) अजूनही साशंकवृत्ति दिसत आहेत ! ( उघड ) मग पुढं आपण म्हटलं कीं तीच तूं सती आतां पार्वतीरूपानें हिमवानाच्या घरीं मेनेच्या उदरीं जन्मलीस !

**शि०**— ही कथा आश्चर्यकारक आहे ! बरं पुढें.

**पा०**—शेवटीं आपण म्हणालां, आतां आई-बापांच्या अनुमतीनें तूं माझ्याशीं विवाह करण्यास सर्वथा योग्य आहेस.

**शि०** वा:, सगळंच अद्भुत दिसतं आहे !

**पा०**-आणखी आपण असंही बोललां कीं पार्वति! तुझ्याशिवाय मी दुसऱ्या कोणत्याही कन्येचं पाणिग्रहण करणार नाहीं !

**शि०**-काय तरी स्वप्न हें ! अन् तुला हें सगळं खरं वाटलं !

**पा०**-कां नाहीं वाटणार ? आपल्यासारखे महानुभाव स्वप्नांत देखील खोटं बोलत नाहींत !

**शि०**—पण स्वप्नच जर मिथ्या तर त्यांत भाषण तरी कसं संभवतं ?

**पा०**—( रागावून ) या स्वप्नवृत्तांताचा आपल्याशीं कांहींच संबंध नाहीं तर मग ?

**शि०**-[ स्वगत ] आतां हातघाईवर प्रकरण आलेलं दिसतं. बरं पाहूं पुढें काय होतं तें ! [उघड] जी गोष्टच काल्पनिक तिचा संबंध तरी कुणाशीं कसा जुळणार ?

पा०—मग भगवान् नारदमुनींनीं येऊन ' भव तुझा पति होणार, ' असं सांगितलं तेंही खोटंच असलं पाहिजे !

शि०—नारदांनीं सांगितलं नाहीं कोण म्हणतो ?

पा०—मग, त्यांनीं सांगितलं तसं होणार नाहीं असं का आपलं म्हणणं !

शि०—मोठ्यांच्या वचनाच्या भानगडींत माझ्यासारख्या यतीनें न पडावें हें बरं.

पा०—मग, मुनिवचनावर विश्वास ठेवून माझे बाबा वागले, मींही आपणांस मनानें वरिलं व आपला अनुग्रह व्हावा म्हणून आपली सेवा आरंभिली. हें सगळं व्यर्थच एकूण ?

शि०—याचा दोष माझ्याकडे कसा ?

पा० [ निराशेनें रागावून ] बरं आहे मुनिवर्या ! तूं माझा स्वीकार कर अथवा करूं नकोस. तुला मीं मनानें वरिलं आहे. हा देह तुला अर्पण केला आहे. यावर तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाचा हक्क नाहीं. तूं जर त्याचा त्याग केलास तर मींही उग्र तपश्चर्या करून त्याचा नाश करणार आहे.जन्मोजन्मीं तुझ्यासारखा पति मिळो हीच त्या परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.बरें आहे,ही हिमनगकन्या तुला शेवटलाच प्रणाम करीत आहे ! [नमस्कार करून झटकन् जाऊं लागते! तिला थांबवून]

शि०—अबब ! पार्वती, केवढा कोप हा ! आणि तोही अगदीं निष्कारण !

(राग–अडाणा, ताल झंपा.)

प्रिये ! शांत हो. सांडिलें काय ? तुज ये
केवढा कोप हा शैलतनये ! ॥ धृ० ॥
राग तव कारणाविण कसा पेटला ।
मृदुल परिहास मीं सहज केला ।
सोडिं भीती अतां, दाविं अनुरक्तता,
मनिं धरीं शांतता, त्वरित सखये ॥ प्रिये० ॥

पा०— आपण येथून तेथून कानावर हात ठेवला तेव्हां माणसानं मेलं समजावं तरी काय ? ही कोण प्राण घेणारी थट्टा !

शि०—पार्वति ! मला आपलं वाटलं थोडी मौज करावी, एवढंच. पण आतां समजून चुकलं कीं असं करण्याची अगदीं सोय नाहीं ! तूं तर अगदीं

जीव देण्यापर्यंत पाळी आणलीस ! बाकी बायकांचे जीव असे किती वेळां जात असतील व कितीक वेळां येत असतील कुणाला ठाऊक !

**पा०**—अजूनही थट्टाच ! आतां मला इकडचा स्वभाव थोडासा कळला हे बरंच झालं ! पुढं कसं वागावयाचं याची शिकवणच मिळाली म्हणावयाची !

**शि०**—आजचं तुझं उग्र स्वरूप पाहिलं तेव्हां माझ्या लागलंच मनांत आलं कीं तुझं पार्वती हें नांव बदलून टाकून दुसरं तुझ्या स्वभावाला योग्य असं तुझं नांव ठेवावं !

**पा०**—पण तें पाणिग्रहणानंतर; आतां नाहीं बरं का !

**शि०**—नंतरच म्हणतों. सांगू का तें नांव ?

**पा०**—तें आपण सुचवायचं नाहीं व घ्यावयाचंही नाहीं !

**शि०**—अग तें लोकांदेखत घ्यायचं नाहीं इतकंच ! त्याला जिव्हेवर बसणं जरी कठीण वाटलं तरी ध्यानीं, मनीं तें सदैव उभं राहणारच !

**पा०**—असं नांव तरी कोणतं शोधून काढलं आहे बाई !

**शि०**—तुझ्या रागावरून तें तयार केलं !

**पा०**—हा माझा बहुमानच झाला असं म्हणत्यें. कोणतं तें नांव ?

**शि०**—तें नांव ' चण्डिका ! ' नांव गोड असून सार्थ आहे !

**पा०**—आपण मला कांहींही म्हटलं तरी आपणांस विरूपाक्ष, त्र्यंबक, रुद्र, उग्र, भीम, या नांवांनीं न ओळखतां मी शिव हर, स्मरहर, ईश्वर, शंकर, चंद्रशेखर, मृत्युंजय या मंगल व गोड नांवानींच आपणांस ओळखीन व मान देईन !

**शि०**—अहाहा ! किती तरी गोड बोललीस ? यावरून तुझी मधुर प्रकृति पूर्ण कळून चुकली. तुला लोक पाहिजेत तर चंडिका म्हणोत, मी तुला उमा, अंबिका, गिरिजा, मंगला या कोमल नांवानींच प्रेमानें संबोधीन हो ! आतां शांत हो. परमेश्वर तुझे मनोरथ पूर्ण करो !

**पा०**—प्रत्यक्ष परमेश्वरच मला आशीर्वाद देत आहे ! तो विफल होणें शक्य नाहीं.

( राग ललत; ताल त्रिवट )

सरली चिंता ! जन्म, अहह ! मम सफल हा झाला ॥ धृ० ॥

वरद ईश करि धन्य बहु मला । सीमा नच मम सौख्याला ॥ १ ॥

**शि०**—( स्वगत ) हिनें मला 'परमेश्वर' या शब्दांत पकडलं खरं ! (उघड)

( राग पिलू, ताल धुमाळी )

सोडोनि तपन या क्षितिवलया, जाइ पहा कीं हा विलया ॥ धृ० ॥
संध्या-वंदन-समय पातला, जाईं लवकरि निजठाया ॥ १ ॥

**पा०**-(हर्षानें कटाक्ष-पूर्वक) मुनिवर्या ! वंदन करितें. (जाते. पडदा पडतो.)

अंक दुसरा समाप्त.

ग्रंथालय ठाणे २२६

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

( स्थल:—भद्रमुख-राजधानींतील राजमहाल. पात्रें:—सिंहासनावर बसलेला तारकासुर; यथोचित आसनांवर बसलेली अमात्य विकटोदर, सेनापति महिषासुर, खाजगी कारभारी रहस्यपाल वगैरे दरबारी मंडळी. नाचा नंतर )

**तारकासुर**—विकटोदरा, हा तारकासुर केवढा भाग्यवान् आहे ! यानें त्रैलोक्य पादाक्रांत करून टाकिलं आहे. आतां जिंकावयास कांहीं राहिलं नाहीं म्हणून याच्या मनाला केवढा विषाद वाटत आहे !

**विकटोदर**—महाराजांसारख्या अत्युच्च महानुभावाचे मनोरथही गगनचुंबीच असावयाचे ! त्यांच्या महत्त्वाकांक्षेला मर्यादा ठाऊक नसावी हें योग्यच आहे!

**तारकासुर**—या त्रैलोक्यांत फक्त तीन ठिकाणीं मात्र माझा किरीट नम्र होणार. ज्याच्या वरप्रसादानें मी त्रिभुवनाचा सम्राट झालों तो भगवान् विधाता हंसवाहन हिरण्यगर्भ याला प्रथम वंदनीय असणार !

वि०—यामध्यें आपल्या कृतज्ञतेचं अधिक अभिनंदन करावं किंवा विवात्याच्या औदार्याची अधिक तारीफ करावी याचा निर्णय करणं कठिण आहे.

ता०—दुसरं अभिनंदनाला योग्य स्थान म्हणजे भगवान् चंद्रमौली अंबिकानाथ याचं चरणकमल.

वि०—हें तर मंगलाचं मंगल ! यापेक्षां नमनाला अधिक योग्य असं दुसरं स्थान कोठून असणार !

ता०—तिसरं मस्तक वांकविण्याचं ठिकाण श्रीरमारमण भगवान् शेषशायी.

वि०—वाहवा ! महाराजांनीं सत्त्वरजस्तमांचीं अधिष्ठानेंच गांठलीं म्हणावयाचीं !

ता०—इतर सर्वांनीं आपापले रत्नकिरीट माझ्या चरणकमलधूलींत नम्र केले पाहिजेत !

वि०—आपला प्रताप हें त्यांना करावयाला लावीलच !

ता०—आज माझं नांव अन्वर्थक झालं; नाहीं वरं !

वि०—यांत काय शंका ! आपल्या शिवाय आतां तारकत्व दुसऱ्या कोठेंहि राहिलंच नाहीं !

ता०—माझ्या पित्याचं नांव वज्रांग. त्यालाही माझ्या अतुल भुजबलानें व प्रतापानें चरितार्थताच आली आहे !

वि०—‘ पुत्रादिच्छेत्पराजयम् ’ या उक्तीची सफलता झाली खरी !

ता०—माझ्या मातेचं नांव वरांगी होतं, तेंही माझ्या योगानें कृतार्थ होऊन गेलं आहे !

वि०—स्त्रियांना वीरमाता होण्यांतच भूषण आहे, नाहींतर नांवाच्या वरांगी, शुभांगी, चार्वंगी का थोड्या पडल्या आहेत !

ता०—माझ्या प्रियेचं नांव जयन्तिका. अहाहा ! त्रैलोक्याला जिंकणाऱ्या या वीराच्या मनोभूमीवर जिनं आपलं साम्राज्य स्थापित केलं ती खरोखरीचीच जयन्तिका म्हटली पाहिजे !

वि०—महाराजांची विजयलक्ष्मी तिची परमप्रिय सपत्नी होवो !

ता०—सेनापते महिषासुर ! आतां युद्धाची व दिग्विजयाची धामधूम संपली आहे. त्यांत जिंकलेले देव, दैत्य, राजे, गंधर्व, ग्रह वगैरेंची नीट व्यवस्था लागली काय ? तसेंच मीं अपरिमित लक्ष्मी संपादन करून आणिली आहे,

तिच्यावरील चांचल्याचा आरोप माझ्या राज्यांत नाहींसा झाला पाहिजे !

**म०**—महाराज ! जिंकलेल्या वीरांना बंदोबस्तानें कैदेंत ठेविलें आहे. तसेंच पराक्रमानं वश केलेल्या लक्ष्मीला रक्षकांच्या खड्गधारासलिलांत निवासस्थान दिलें आहे !

**ता०**—तुझ्या चातुर्याची व दक्षतेची खरोखर तारीफ केली पाहिजे. पण त्या कैद्यांना नुसतं रिकामं कैदेंत ठेवून उपयोग नाहीं हो ! खायला काळ आणि भुईला भार ! त्यांना वेगळीं वेगळीं कामें नेमून द्या व तीं त्यांच्याकडून चोपून करून घ्या. ते रिकामे राहिले तर त्यांच्या डोक्यांत भलभलते विचार येतील हो ! व माझ्या विरुद्ध ते कदाचित् बंडाचा झेंडाहि उभारतील ! तेव्हां त्यांना सारखं गुंतवून ठेवा. त्यांना विचाराला वेळच देऊं नका. कामाखालीं त्यांना जेर करून सोडा !

**म०**—महाराज, त्याविषयीं काळजी नसावी. महाराजांच्या इच्छेप्रमाणें पूर्वींच योजना झाली आहे. पण तिच्याविरुद्ध कांहीं महत्त्वाचे अर्ज आले आहेत ते हुजूरच्या चरणीं निवेदन करावयाचे आहेत.

**ता०**—अहो ! या किरकोळ गोष्टींना आमच्यापाशीं वेळ तरी कुठें आहे ? आमचा सगळा वेळ महत्त्वाच्या कामांनीं आंखून गेला आहे. जेवायलासुद्धां आम्हांला फुरसद नाहीं. मग विश्रांतीची तर वार्ताच नको! आजच पहा आमच्या मागें किती तरी कामें आहेत तीं ! अरे रहस्यपाला, सांग पाहूं आजचा कार्यक्रम काय आहे तो. ऐकूं दे यांना एकदा; म्हणजे मी म्हणतों याची यांना थोडीशी कल्पना येईल.

**र०**—जी हुजूर! सांगतों, ऐकावं. देवेश्वराचे मदोन्मत्त ऐरावत वगैरे हत्ती युद्धांत पाडाव करून आणिले आहेत. त्यांच्या टक्करीचा खेळ आणखी एका घटकेनें आहे महाराज !

**ता०**—पुढं काय आहे ?

**र०**—महाराजानीं त्रैलोक्यावर विजय संपादन केला त्याच्या अभिनंदनार्थ महाराजांचे श्यालक नगराधिपति विकटतुंड त्यांच्याकडे महाराजांना जाफत आहे.

**ता०**—त्यानंतर ? बोल बोल, झट् झट् !

**र०** –'अखिल दैत्य-संघ–वारुणी-मंदिर' या संस्थेचा उद्धाटनविधि महाराजांच्या हस्तें व्हावयाचा आहे.

**ता०**—पुढें काय तें बोल लवकर.

**र०**—देवांच्या छळांतून मुक्त केल्याबद्दल असुर-समितीच्या मार्फत महाराजांना मानपत्रें.

**ता०**—संपलं सगळं ? का राहिलंच आहे कांहीं अजून !

**र०**—अद्यापि कांहीं कार्यक्रम आहे.

**ता०**—मग बोल तो झटकन् कसा !

**र०**-जी हुजूर ! मेनका, ऊर्वशी इत्यादि बंदींत टाकलेल्या अप्सरांचा नाच आहे; युद्धांत ज्यांनीं मोठी कामगिरी बजाविली त्यांना बक्षिसें वाटावयाचीं आहेत; जिंकलेल्या संपत्तीचं प्रदर्शन खुलं व्हावयाचं आहे; शिकारखान्यांतील जनावरांचे खेळ, ऐंद्रजालिक प्रयोग, प्रेक्षणीय दारूकाम, व शुक्राचार्यकृत 'तारकदिग्विजय' हें नवं नाटकहि व्हावयाचं आहे !

**ता०**—विकटोदरा, महिषासुरा, पाहिलात का आजचा कार्यक्रम ? किती तरी कामं हीं ! सम्राट् होणें कांहीं थट्टा नाहीं ! त्याच्यावर केवढी तरी जबाबदारी ! तिच्याखालीं तो वांकून जातो बिचारा ! तुमच्यासारख्यांना त्याची नुसती कल्पनासुद्धां नाहीं !

**वि०**--महाराज, राजांमध्यें भगवान् विष्णूचं तेज व वीर्य असतं असं म्हणतात तें अक्षरशः खरं आहे. नाहींतर एवढे कामाचे हिमालय आपण लीलेनें करांगुलीवर कसे धारण केले असते ?

**ता०**---बरं पण महिषासुरा, त्या अर्जदारांचं काय म्हणणं आहे तें थोडक्यांत सांग पाहूं ? एकदाची किटकीट काढून टाकूं या !

**म०**--होय सरकार. एक एक अर्जदाराचं म्हणणं सांगतों.

**ता०**—ठीक आहे. बोल.

**म०**--देवेंद्राची प्रार्थना अशी आहे कीं, आपणास आपल्या अमरावतींतच राहूं द्यावं व तेथून सरकारनीं आपली सेवा घ्यावी.

**ता०**-काहो अमात्य ! तुम्हांला कसं वाटतं ?

**वि०**- मला वाटतं, देवेंद्राचं म्हणणं कबूल करावें ! त्यांत दोन गोष्टी साधतात; एक तर आपलं त्यावरील वर्चस्व कायम राहतं. दुसरं असं कीं, त्याला स्वातंत्र्य दिल्याचं श्रेयही अनायासं सरकाराचे पदरांत पडतं.

**ता०**--होय, युक्ति ठीक आहे. पण देवेंद्रापासून सेवा कोणती करून घ्याव-

याची ? मला वाटतं त्याच्या नंदनवनांत अनेक कल्पवृक्ष आहेत. त्यांना फारच सुगंध फुलं येतात. त्या फुलांचे ताजे हार, तुरे, गजरे त्यानें तयार करून रोज आमच्या जनानखान्यांत पाठविण्याची व्यवस्था करावी. ही त्याला मान्य असेल तर द्या त्याला सोडून. त्या बिचाऱ्या शचीलाही जाऊं द्या त्याच्याबरोबर. उगाच येथें रडावयाला पीडा हवी कशाला ?

म०–बरं आहे महाराज! सूर्याची विनंती अशी आहे कीं, मला नित्य नियमानें उदयास्त साधावे लागतात; त्यांवर कालमान व साधूंचीं धार्मिक कृत्यं अवलंबून असतात. माझ्यावर सर्व सृष्टीचं जीवन आहे; तेव्हां माझी सुटका व्हावी.

ता०–त्याला सांगावं, तुझी सोय पाहण्याचं आम्हांस कारण नाहीं; तारकासुराच्या सोईकडे तुला लक्ष्य दिलं पाहिजे; तारकासुराच्या राज्यांत तूं दिमाखानें आपले तीव्र किरण कोठेंही पाडतां कामा नये; या राज्यांतील उद्यानांतल्या पुष्करणी आहेत त्यांतील कमलांचा योग्य रीतीनं विकास होईल अशा बेतानंच तूं आपला प्रकाश पाडिला पाहिजे; यापुढें चंड-किरण, तपन इत्यादि नांवं सोडून देऊन मंदकिरण, आल्हादन वगैरे नांवांस तूं पात्र झालं पाहिजे.

म०–जी सरकार! चंद्राचं म्हणणं आहे कीं, मी अगदीं निरुपद्रवी व परतेज:-प्रकाशित आहें. मी औषधींचें जीवन आहें व प्राणिमात्रास आनंद देणारा आहें. मजवर महाराजांची कृपादृष्टि असावी.

ता०–अस्सं काय ? त्याला चक्क सांग, आमच्या राज्यांत कृष्णपक्ष अजीबात बंद केला आहे. रोज पूर्णिमेचं चांदणं हवं आहे. तारकाच्या हृदयस्थ प्रेमसागराला त्यानं आपल्या पूर्णबिंबानं प्रतिदिवशीं भरती आणली पाहिजे.

म०––ठीक आहे. वसंतादि ऋतूंचं म्हणणें आहे कीं, आम्हांला क्रमाक्रमानें सृष्टीची सेवा विधीनें सांगितली आहे, तेव्हां तीं तीं कामें आम्हांस केलीं पाहिजेत.

ता०—वाहवा ! काय भाषा आहे ? गुलामाच्या तोंडांत मालकाची भाषा शोभत नाहीं ! त्या शिष्टांना सांगा, तारकासुर तुमच्या ब्रह्मदेवाचा ब्रह्मदेव झाला आहे. तुम्हीं सगळयांनीं एकाच वेळीं आपापलीं कामं इमानं इतबारं आमच्या राज्यांत बजावलीं पाहिजेत ! व आपापल्या विविध व विपुल पुष्पफल-संपत्तीनं या तारकासुराच्या राज्यास समृद्ध व अलंकृत केलं पाहिजे.

म०–जी सरकार ! बृहस्पति म्हणतो, मी ब्राह्मणश्रेष्ठ व सुरगुरु आहें. माझ्या योग्यतेचं काम मला मिळावं अशी इच्छा आहे.

ता०—हें बंड प्रस्थ आहे ! याची भाषाही जरा खोंचदारच आहे ! आली का तुमच्या लक्ष्यांत ? जरा बारकाईनें पहा, म्हणजे त्यांतली मख्खी समजेल. काय ह्मणतं आहे हें प्रकरण ? ' मी ब्राह्मणश्रेष्ठ व सुरगुरु आहें. मला माझ्या योग्यतेप्रमाणं काम द्यावं ! ' तुरुंगांत पडून देखील या ब्राह्मणाची बोलण्याची काय ऐट आहे पाहिलीत का ? काय म्हणे, ' मी सुरगुरु आहें ! ' केवढा दिमाख या भटाचा ! त्याला म्हणावं, तुझा धनीच मुळीं आमचा दास बनला आहे, तेव्हां तूं तर आमच्या दासाचा दास झालास ! आणि त्यांतूनही तूं आमच्या बंदीखान्यांतला कैदी आहेस ! तुझी मिजास व प्रतिष्ठा इथं चालायची नाहीं मुळींच ! ( थोडा विचार केल्यासारखं करून ) पण आमच्यासारख्या शूरांनीं या ब्राह्मणांना महत्त्व न देतां त्यांची कींव करावी हेंच बरं. बरं तर, द्या त्याला ' वारुणीविजय ' हा ग्रंथ लिहावयाला; आणि शुक्राचार्यांना विनंति करा कीं या बृहस्पतीवर चांगली नजर ठेवा व ग्रंथ मनाजोगता त्याच्याकडून करून घ्या !

मं०—जी सरकार ! वायु असें म्हणतो, मला सर्वत्र फिरावं लागतं.; मी जीवसृष्टीचा प्राण आहें. मला बंधांतून मुक्त करावं महाराजांनीं.

ता०—वायूचं तर आमच्या मंदिरांत व राज्यांत पुष्कळच काम आहे. त्याला म्हणावं तुझ्या म्हणण्याचा विचार करतां येत नाहीं. तूं नेहमीं मंद, सुगंध व शीतल होऊन आमची सेवा केली पाहिजे; आमच्या उद्यानांतील फुलांना व वेलींना हास्य व नृत्य शिकविण्याचं काम, मोठ्या कुशलतेनं, तुला केलं पाहिजे. आमच्या अंतःपुरांतील स्त्रिया प्रमदवनांत सहल करीत असतां त्यांच्या कुरळ केशांशीं किंवा पदराशीं केव्हांही अति-प्रसंग करतां कामा नये; रात्रंदिवस राज्यांतील मार्ग व मंदिरांतील वाटा साफसूफ करण्याचं काम तुझं आहे, आणि या सर्व कामांत तुला दक्ष राहिलं पाहिजे; असें त्याला स्पष्ट सांगा.

मं०—होय महाराज. शनिमंगलांचं काय करावयाचं ?

ता०—त्यांना देवतामंदिरांत शांतिपाठाला लावा. त्यांना हेंच काम योग्य !

मं०—जी हुजूर. देवांना व ब्राह्मणांना काय सांगावयाचं ?

ता०—त्यांना धर्माचार्यांकडे जाऊं द्या. ब्राह्मणांना रोज रुद्राभिषेक व गोवर्धनप्रदक्षिणा सांगा. विमानांत बसून मी संचार करूं लागलों म्हणजे देवांनीं माझ्या दोन्ही बाजूंला उभं राहून मला वंदन केलं पाहिजे, माझा जयजयकार केला पाहिजे व आकाशमार्ग साफ ठेविला पाहिजे, असं त्यांना कळवा.

म०—बरं आहे. देवतांनीं काय करावं?

ता०—आमच्या बागेतलीं फुलं रोजसकाळ तोडून तीं त्यांनीं देवतामंदिरांत नेऊन ठेवावीं. शिवाय रात्रीं पाळी-पाळीनं त्यानीं शयनागारांत आमचे विंझणवारे हलविले पाहिजेत. पण त्या विंझणवाऱ्यांना त्यांच्या नेत्रांतील उष्णोदकाचा किंवा उष्ण श्वासाचा संपर्क मात्र होऊं देतां कामा नये! असं त्यांना बजावून सांगा.

म०—ठीक आहे. गंधर्व व शेष यांना काम काय?

ता०—यांचं काम अर्थात् माझं यश गाण्याचं! त्यांना भाटाचं काम द्या; व शेषाला त्यांवर मुख्य नेमा. आमचं यश आतां त्याला सहस्रमुखांनीं गाण्याइतकं विशाल झालं आहे! आणि तें उच्चैःश्रवस् नांवाचं दिव्य अश्वरत्न लुटींत आणिलं आहे ना? तें आमच्या दिग्विजयाची पताका आहे बरं काय! आमच्या प्रासादाच्या पुढील पटांगणांत त्याचा एकसारखा थयथयाट चालू असला पाहिजे. त्याच्या खाण्यापिण्याची मात्र उत्तम व्यवस्था ठेवा हो!

म०—जी सरकार. ( सगळे मुजरा करून जातात. पडदा पडतो )

---

## प्रवेश दुसरा.

( स्थल—अमरावती— नीलमणिप्रासाद )

इंद्र–(स्वगत) तारकासुराचा मोठा भयंकर मानसिक रोग मला जडून राहिला आहे! मानसिक रोग धैर्य, विवेक, आत्मचिंतन इत्यादिकांनीं बरे होतात असें आजपर्यंत ऐकत आलों. पण या उपायांनीं माझा रोग मुळींच हटत नाहीं, याला काय करावं बरं? हा मला क्षणभरही चैन पडूं देत नाहीं. गाण्यांत सुख नाहीं; नंदनांत आराम नाहीं; शिकारींत प्रेम नाहीं; देवतार्चनांत शांति नाहीं; प्रेमसंभाषणांत रति नाहीं. मित्रसहवासांत गोडी नाहीं; असं कांहीं सगळं विचित्र झालं आहे! हें इंद्रपण दिसायला मोठ्या ऐश्वर्याचं. पण याच्या यातना फार कठीण! देवा, नको तें इंद्रपण व नको त्याची प्रतिष्ठा. माझ्यावर येणाऱ्या संकटांचं निवारण करण्याकरितां मीं माझ्यापाशीं मृदु व शीघ्र काम करणारीं अस्त्रं ठेविलीं आहेत. तसंच काम पडल्यास प्रचंड पर्वतांचा चुराडा उडविणारं असं अत्यंत तीव्र वज्रही माझ्यापाशीं बाळगलं आहे. यांनीं आजपर्यंत पुष्कळ कामं केलीं

पण प्रस्तुतच्या प्रसंगीं तीं अगदींच निरुपयोगी ठरून गेलीं आहेत! माझ्यासारख्या ऐश्वर्यशाली मानधन देवेश्वराला, दांतीं तृण धरून, तारकासारख्या उन्मत्त दैत्याची आराधना करण्याचा प्रसंग यावा, यापेक्षां अधिक मानहानीचा व खेदाचा प्रसंग तो कोणता असणार ? यापेक्षां मरण पतकरलं ! या कामीं बृहस्पतींचा सल्ला घेतला असता. पण तेही तारकाच्या बंदीखान्यांत कैदी होऊन पडले आहेत ! ब्रह्मदेवानें सुचविलेल्या उपायाखेरीज आतां दुसरी तोड दिसत नाहीं. शिवाचं लग्न कसं तरी जुळवून आणलं पाहिजे. पण, हें काम कांहीं सोपं नाहीं ! मेनकेला शिवाच्या आश्रमांतील बातमी काढून आणावयास पाठविल्याला बराच काळ लोटला. अद्यापि तीही परत यत नाहीं ! पित्याच्या आज्ञेवरून पार्वती शिवाची सेवा करीत आहे, हें वर्तमान आशा उत्पन्न करणारं आहे. कारण, पार्वतीचं सौंदर्य लोकोत्तर आहे. ती शिवाला मोहित करून विवाहपाशांत अडकवील असा तर्क आहे. पण शिवासारख्या अलौकिक पुरुषाची प्रकृति व कृती सुद्धां गूढ व अतर्क्य असतात ! तेव्हां काय सांगावं पुढं काय होतं तें ? ( विचार करून ) हो ! खरंच ! आमचा कामदेव मोठमोठ्या तपस्व्यांच्या समाधि भग्न करण्यास समर्थ आहे. या जगांतला त्याचा पराक्रम प्रत्येक प्राण्यास ठाऊक आहे. त्याच्या जोडीला त्याचा मित्र वसंत व कांहीं अप्सरा दिल्या म्हणजे कार्यभाग होईल असं वाटतं. ( बाजूला पाहून ) काय मेनका आली वाटतं ! ( प्रवेश करून ).

**मेनका**—( वंदन करून ) महाराजांचा जयजयकार असो !

**इं०**—कार्य-सिद्धि असेल तर खरा जयजयकार! मेनके, तुला ज्या कामावर पाठविलें होतें त्याचें काय झालें? तुझ्या मुखश्रीवरून तें सिद्ध झालं असावं असं वाटतं.

**मे०**—असं म्हटलं तरी चालेल; पण—

**इं०**—हा ' पण ' फार जिथें तिथें आडतो बोवा ! काय ? ' पण ' काय ?

**मे०**—काय सांगावं बाई !

**इं०**—असं कां म्हणतेस ?

**मे०**—महाराज, सगळी हकीकत मी सांगत्यें ती श्रवण करावी. तिच्यावरून मग काय तर्क होईल तो खरा.

**इं०**—ठीक; सांग तर हकीकत.

**मे०**—आपली आज्ञा घेऊन मी हिमगिरीच्या एका शृंगावर गेलें. तेथें शिवाचं

तपोवन दृष्टीस पडलं. त्यांतील देवदारु वृक्ष गंगेच्या प्रवाहानें निर्मल व पावन झालेले दिसले. कस्तूरीमृग इतस्ततः फिरत असल्यानें कस्तूरीचा परिमळ तपोवनांत चहूंकडे विखुरला होता. गंधर्वांच्या श्रवणमधुर आलापांनीं आश्रमभूमि नादावून गेली होती. नागकेशराच्या सुगंधि व सुंदर मंजरी कानावर ठेवलेले प्रमथादि गण तेथें भूर्जपत्रांचीं वल्कलं परिधान करून शिलातलावर स्वच्छंद बसलेले होते. बर्फाच्या मोठमोठ्या शिला आपल्या खुराग्रांनीं उखळीत व सिंहध्वनीलाही मागें सारणारी अशी स्निग्ध–गंभीर गर्जना करीत नंदिकेश्वर त्या ठिकाणीं उभा होता. अशा आश्रमांत अजिनांबर धारण केलेला, अंतरिंद्रियांचं नियमन करणारा, अष्टमूर्ति परमेश्वर भगवान् शंकर मीं पाहिला. आपल्या स्वतःच्याच मूर्तींपैकीं एक मूर्ति जो अग्नि त्यांत समिधा टाकून त्यानें तो प्रज्वलित केला होता. इतरांना त्यांच्या तपाचं फल देणारा असा तो भगवान् हर कांहीं तरी कामना मनांत धरून तप करीत होता असं दिसलं.

इं०—ही नुसती कथा देखील परम पावन व रम्य आहे ! पुढें.

मे०—तिरस्करिणीविद्येच्या सामर्थ्यानं मी अदृश्य राहून पुढील चमत्कार पाहूं लागलें.

इं०—हें योग्य केलं, यामुळें तेथील सर्व प्रकार तुला चांगल्या रीतीनें दिसला असेल !

मे०—होय.त्या मुनीच्या आश्रमासभोंवतीं एक लहानसं रमणीय उद्यान आहे. त्यांत लहान लहान पुष्पवाटिका व पुष्करणी आहेत. त्या बागेंत तीन मुली माझ्या दृष्टीस पडल्या. त्या जवळ जवळ सारख्या वयाच्या होत्या. त्या दूर्वांकुर, फुलें वगैरे पूजेची सामग्री परड्यांतून गोळा करीत होत्या व एकीकडे एकमेकींशीं विनोदही करीत होत्या.

इं०—मग त्यांतून तूं पार्वती कशी ओळखलीस ?

मे०—तिच्या अलौकिक सौंदर्यावरून व अनुभावावरून. शिवाय तिच्या सख्यांनीं तिला वारंवार ‘ गडे पार्वती ! ’ असें संबोधिलं त्यावरून तर तिच्या ओळखीविषयीं शंकाच राहिली नाहीं.

इं०—मेनके, तूं पार्वतीचं वर्णन करावं हें विशेष आहे.

मे०—महाराज, आम्हां बायकांना आपल्या सौंदर्याची मोठी घमेंड असते.

त्यांतून मी तर अप्सरा, आणि तीही सुरेंद्राच्या कृपेंतली, व विश्वामित्रासारख्या प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्याला मोहनी घालणारी ! पण खरोखरीं सांगत्यें:-

( राग हमीर, ता० एका. )

बघुनि विमल रुचिर मूर्ति या नयनीं, गमलि
मजासि लाज मानीं ॥ धृ० ॥
सगळ्या सौंदर्याची खनी, हिमनगकन्या धन्य जनीं ॥१॥

इं०—मेनके ! पार्वतीच्या सौंदर्याची तूं शिफारस करीत आहेस ही गोष्ट आमच्या पथ्यावरच पडली ! शिवाचं मन हरण करण्याचं सामर्थ्य तिच्यांत आहे तर मग ?

मे०—तें काय बाई सांगावं? हर हा तपस्वीही अलौकिकच आहे !

इं०—आपण कामदेवाला, वसंत बरोबर देऊन, शिवतपोभंग करावयाला पाठवूं. पार्वतीसारखं दिव्य अस्त्र त्याच्या हातांत पडल्यावर शिवाला त्यानं जिंकलंच समज. नुसत्या कोमल फुलांच्या धनुष्यानं ज्यानं त्रैलोक्य पादाक्रांत केलं त्याला हें काम अगदीं सुकर आहे, नव्हे का ?

मे०—ही कल्पना सुंदर आहे आणि सुसाध्यही आहे !

इं०—पण तुझी गोष्ट मध्येंच राहिली. सौंदर्याच्या गोष्टी देखील कशी भुरळ पाडतात पहा ! चालूं दे तुझी गोष्ट पुढें.

मे०—पुढें पार्वतीनं आपल्या सख्या जया व विजया यांसह शिवाच्या पर्णकुटिकेंत प्रवेश केला. तेथें तिघी त्याला वंदन करून उभ्या राहिल्या. शिवानें नुसती मान डोलवून त्यांचा सत्कार केला. मग एकीनें बेलफुलें, एकीनें दूर्वांकुर व एकीनें दर्भसमिधा असें पूजासाहित्य शिवापुढें ठेविलं. कांहीं वेळ ध्यानस्थ राहून शिवानें नेत्र उघडले व स्मितपूर्वक पार्वतीकडे पाहिलें !

इं०—हां ! आतां पुढें कांहीं तरी ऐकण्यासारखं आहेसं दिसतं ! ही प्रस्तावना दिसते आहे !

मे०—हा रंग पाहून जयाविजया चटकन् बाहेर पडल्या !

इं०—योग्यच केलं त्यांनीं. रंगाचा भंग कां करतील त्या ? पार्वतीच्याच सख्या त्या !

मे०—मग शिवांनीं नेत्रसंकेतानें पार्वतीला अंमळ जवळ येऊन बसण्यास सुचाविलं.

इं०— शाबास कामदेवा ! तुला कामगिरी सांगण्यापूर्वीच तुझा पराक्रम दिसूं लागला आहे !

मे०—तेव्हां पार्वती थोडी घोटाळयांत पडलेली दिसली. तिला थोडा कंप व घर्महि सुटलेला दिसला !

इं०—हें तर उघड उघड सात्विकभावाचं चिन्ह आहे ! बरं पुढं.

मे०—मग शिवांनीं आपला हात पुढें करून तिला आसनावर बसावयास सांगितलं.

इं०- एकेक पाऊल प्रकरण पुढंच चाललं आहे !

मे०—मग पार्वती आसनाच्या एका टोकावर मर्यादेनें बसली. शिवाकडे एकदा हास्य मुद्रेनें पाहून तिनें लाजेनें खालीं मान घातली !

इं०—हा बाणच मारला तिनं ! आपण पड घेऊन दुसऱ्यांना पाडण्याचं हें अबलांचं कसब अपूर्व आहे !

मे०—मग शिव म्हणाले, 'पार्वति ! तूं आलीस किनई म्हणजे आमची पूजा वगैरे सर्व लटपटतं ! खरंच सांगूं ? तुला पाहिलं म्हणजे तुझीच पूजा करावीशी वाटते पार्वति !

इं०—कामदेवा ! तुझं काम सुकर झालं ! मेनके ! आशावल्लीला अंकुर फुटूं लागले हो !

मे०—मग पार्वती चटकन् म्हणाली. 'इश्श मेलं ! हें काय भलतंच बोलायचं ! मला तर बाई इकडच्यावरून ओंवाळून टाकावं ! माझं कसलं रूप आणि कसलं पूजन मेलं !

इं०—कुलवधूनं बोलावं असंच ती बोलली.

मे०—मग शिवानें थोडं स्मित केलं व पार्वतीच्या कानांवर चंपकाची मंजरी ठेविली. त्यावर शिव कांहीं विनोद करणार इतक्यांत पार्वतीनें स्वतां गुंफलेली बकुळीची माळ पटकन् त्याच्या गळयांत घातली.

इं०—( उत्सुकतेनें ) मग पुढं त्यांचं बोलणं काय झालं !

मे०—शिव म्हणाले, " प्रिये, चंपककलिकेनें कानाशीं लागून कांहीं मंत्र

सांगितला वाटतं ! " त्यावर ती लागलीच म्हणाली, ' होय, बकुळीच्या माळेनें आपल्या गळ्यांत पडावं म्हणून !"

इं०---किती चातुर्याचीं भाषणं हीं ! बरं पुढं !

मे० - मग शिव अधिक प्रेमांत येऊन म्हणाले, 'हा गजरा तुझ्या वेणीवर फार शोभेल असं वाटतं. तो ठेऊं का तिथं ? त्यावर ती म्हणाली, ' कित्येक पुरुष बायकांना डोक्यावर नाचवितात, त्यांना तरी निदान वेणीवर गजऱ्याचा नाच आवडूं नये ! ' असं म्हणून तिनं शिवाचा हात अडवून धरिला !

इं०--हा आणिबाणीचाच प्रसंग ! पुढं कोणीं जिंकलं तें पाहूं !

मे०---हें चित्र खरोखरच प्रेक्षणीय होतं !

इं०---तें पाहण्याचं भाग्य तुला मात्र लाभलं खरं !

मे०---अशा स्थितींत.

( राग झिंझोटी, ता० त्रिताल. )

नेत्रें त्या शंकराचीं अनुरागें रंगलीं
गिरिजेच्या अरुणवर्णी अधरीं तैं विहरलीं,
ओष्ठाला मत्सराची जणुं बाधा जाहली !
लहरी त्या मंदमंद स्फुरणाची लागली !

इं०--हं ! आतां निकरावर आलं बरंच !

मे० — इतक्यांत नंदिकेश्वरानें सूचना केली कीं संध्यावंदनाची वेळ झाली ! त्या सरशी पार्वती बाहेर निघून आपल्या सख्यांसह घराकडे गेली.

इं०---अरेरे ! प्रत्यक्ष नंदीच तो ! त्याला बोल लावून काय उपयोग ! पण या सर्व प्रकारावरून एक गोष्ट सिद्ध होत आहे कीं, पार्वतीवर शिवाचं खरोखर प्रेम आहे.

मे०---यांत मला कांहीं शंका वाटत नाहीं.

इं०---मग आपली योजना सिद्ध होणार याविषयीं संदेह वाटत नाहीं. मघा सांगितल्याप्रमाण कामदेवाची या कामीं योजना करितों तर मग. तुम्हां अप्सरांनाहि त्याच्याबरोबर जावं लागेल. वसंत आपला मित्र कामदेव याचें साह्य करीलच ( पडद्याच्या बाजूला पाहून ) आलाच वाटतं कामदेव ! बरं तूं जा आतां. ( मेनका जाते. कामदेव येतो व शिवास वंदन करून )

**कामदेव**—महाराज! आज माझी आठवण महाराजांना झाली व मला बोलावणं पाठविलं! हा माझ्यावर अनुग्रह झाला असें मी समजतों.

**इंद्र**—कामदेवा! तुला विसरून कसं चालेल? तसं झालं तर सगळं जगच थंड पडावयाची पाळी यावयाची! तुझ्या सारखा पराक्रमी जगांत दुसरा सांपडणं शक्य नाहीं!

**काम०**—महाराज, हें आपल्या कृपेचं फल आहे.

**इंद्र**—कामदेवा! माझीं जिंकण्याचीं शस्त्रं दोन. एक वज्र व दुसरं तूं. पण तूं वज्रालाही मागें टाकणारा आहेस! तुझ्या सारखं मृदु असून परिणामकारी अस्त्रं मिळावयाचं नाहीं.

( राग आनंदभैरवी, ता० दीपचंदी )

शक्त कवण गुण वर्णाया तव सांग मला मदना ! ॥ ध्रु० ॥
थोर थोर अतिशूर धनुर्धर या भुवनीं होती ॥
परि तव अद्भुत लीला खचिताचि जनास भुलवीती ॥
वस्तु सांधिशी शरें ी स्त्री अस्त्री बनविशि रतिरमणा ॥१॥

**काम०**—यावरून महाराजांचा गुणैकपक्षपात मात्र सुव्यक्त होत आहे.

**इंद्र०**—सामान्य अग्नि भडकला म्हणजे त्याला शीतोदकानं शांत करितां येतो. पण कामाग्नि भडकला म्हणजे पुष्पहार, कमळाचीं पानं, चंद्रकिरण, चंदनाची उटी, इत्यादि शीतोपचारांनीं तो उलटा वृद्धिंगत होतो. अंगनांना लीला शिकावेणारा तूंच. तुझ्या बाधेवर मंत्र चालत नाहीं, औषध लागू पडत नाहीं, शांतिपाठ निरुपयोगी ठरतात! तूं प्रसन्न झालास तर झोपडी राजवाडा बनते, अंधकार प्रकाश होतो, भूमितळ पलंग वाटतं! पाषाण उशीसारखा मानवतो, कर्दम कस्तूरीतुल्य भासतो! तुझीं उपकरणं सगळींच मृदु! इक्षुकांडाचं धनुष्य, फुलांचे बाण व भृंगावलीची दोरी यानीं सर्व जग तूं जिंकतोस! तेव्हां खरा पराक्रमी तूंच यांत संशय नाहीं!

**काम०** - ( खुष होऊन ) महाराज! कांहीं कामगिरी असल्यास सांगावी. वसंत व अप्सरा यांचं मला साह्य झालं तर मला अजिंक्य कांहींच नाहीं.

**इंद्र०**—अरे! तारकासुर फार मातला आहे. त्यानें त्रैलोक्याला, दे माय धरणी ठाय, करून सोडलं आहे. त्याचा मृत्यु शिवाच्या पुत्राच्या हातून

व्हावयाचा आहे. तेव्हां पार्वतीशीं शिवाचा विवाह घडवून आणण्याचं काम तुला करावयाचं आहे.

**का०**—शिवाच्या समाधिचा भंग करून त्याचं मन चंचल करण्याचं काम माझ्याकडे लागलं. पण पार्वतीच त्याच्या प्रेमाचा विषय करणं मात्र कठिण आहे !

**इंद्र०**—त्याची काळजी नको. त्याविषयीं मी मेनकेकडून बातमी काढून आणिली आहे. हिमवानाच्या मनांत पार्वती शिवाला द्यावयाची आहे व त्या हेतूनें त्यानें पार्वतीला शिवाची सेवा करण्याची आज्ञा केली आहे. त्याप्रमाणें पार्वती शिवाच्या आश्रमांत रोज जाते व त्याची सेवा करते. शिवाचं प्रेम पार्वतीवर प्रेम जडल्याचं चिन्ह मेनका नुकतीच प्रत्यक्ष पाहून आली !

**काम०**—मग काम फत्तेच झालं समजा ! ( दिंडी )

कधिं न शिवली अपकीर्ति कामदेवा,
म्हणुनि त्याचा मनिं करिति वीर हेवा ॥
भुवन-सुंदर गिरिजास लाभण्यास
सहज जिंकिल शत-संख्य तो शिवास ! ॥

**इं०**—शाबास ! वीरोचित भाषण केलंस ! तारकासुराला मारण्याचं श्रेय तुझ्या पदरांत पडो ! व तुझी कीर्ति दिगंतीं जावो !

**का०**—मला एवढाच प्रसाद आपल्या मुखानं पाहिजे होता.

**इं०**—बरं तर, तत्काल उद्योगाला लाग कामदेवा! विलंब कामाचा नाहीं.

**काम०**—हा निघालोंच पहा ! वसंत व अप्सरा यांना बरोबर घेऊन परस्परें शिवाच्या आश्रमाकडेसच जातों. माझी प्रिया रति माझ्या भेटीविषयीं उत्कंठित असेल. पण तिची देखील भेट मी आतां घेत नाहीं. आपल्या कानावर आतां एकदम शिवपार्वतींच्या विवाहाचीच मंगल वार्ता येईल.

**इंद्र०**—वाहवा, मग काय पाहिजे ! ( साकी. )

अमर-वृंद मंदार-सुमांची, अमरी मोदाश्रूंची ।
द्विज आशिर्वचनांची तेवीं इतर धन्य--वाद्यांची ॥
वृष्टि तुझ्यावरती, करितिल हर्षुनि निजचित्तीं ॥ १ ॥

( जातात. पडदा पडतो. )

**अंक तिसरा समाप्त.**

# अंक चवथा

## प्रवेश पहिला.

( स्थळः—हिमालय-प्रदेशांतील कनखल-तीर्थ. पात्रें:—परमहंस निरंजनमुनि व त्यांचा शिष्य पद्मनाभ. )

**निरंजन०**—( स्वगत ) आज कित्येक तपें हिमगिरीच्या या परम पवित्र, शांत व एकांत प्रदेशांत मी परब्रह्माची उपासना करीत आहें. येथें सर्वदा शांति व आनंद नांदत आहेत. अमंगल कल्पनेचें येथें वारेंही नाहीं. असं असतां आज येथें हा काय विपरीत प्रकार दिसत आहे ! मध्याह्नसंध्येच्या वेळीं भागवान् सवित्याला अर्घ्य द्यावयाला उभा राहिलों तेव्हां केवढे उत्पात दिसूं लागले ! सूर्याचं बिंब एकदम म्लान दिसूं लागलं ! त्याच्या भोंवतीं मलं भक्कम खळं पडलं ! या कनखलतीर्थाच्या शीतल व अमृतमधुर उदकांतून वाफा वर येऊं लागल्या ! त्यांतील मासे तडफडून वर उसळून उड्या मारूं लागले ! पक्षिगण स्तब्ध झाला ! कमलिनींनीं माना खालीं टाकल्या ! पवन कोंडल्यासारखा होऊन श्वासोश्वास कष्टप्रद झाले ! वनस्पति निस्तेज झाल्या ! अग्निज्वाला अधोमुख जाऊं लागल्या ! भूमीला कंप सुटला ! तीर्थोदकानें भरलेला माझा कमंडलु वेदीवरून गडगडत खालीं आला ! दिशा धुळीनें धुंद झाल्या ! मधून मधून आकाशांतून रक्तबिंदु पडूं लागले ! गिधाडांचे कळप भक्ष्याकरितां गिरक्या मारूं लागले ! पाळीव हरणें भीतीनें गांगरून गेलीं ! गाई हंबरडे फोडूं लागल्या ! त्यांचे वत्स सैरावैरा पळूं लागले ! अशी सर्व सृष्टि उदास व भयाण दिसूं लागली ! खरोखर या उत्पातांवरून पुढें कांहीं तरी मोठा अनर्थ उद्भवणार हीच सूचना होत आहे. कोणातरी महापुरुषाचा कोप झाला असावा किंवा एखाद्या साध्वीवर परम संकट ओढवलं असावं, अथवा असंच कांहीं तरी दुसरं विलक्षण कारण घडून आलं असलं पाहिजे. म्हणूनच हीं दुश्चिन्हं दिसूं लागलीं ! माझं मन व्यग्र झालं आहे. समाधि लागत नाहीं तेव्हां पलीकडे कैवल्यधाममुनींचा आश्रम आहे, तिकडे आपल्या पद्मनाभ शिष्याला पाठवून बातमी आणावी हें बरं. ( हाक मारितो ) बाळा पद्मनाभा ! ( प्रवेश करून )

प०-- गुरुजी ! काय आज्ञा आहे ?

नि०-- बाळा, कैवल्यधामांच्या आश्रमाला जा; आणि आजच्या उत्पातांचं कारण त्यांना विचारून लवकर ये.

प०-- होय गुरुजी ( जातो )

नि०-- ( स्वगत ) आतां पद्मनाभ परत येईपर्यंत काय करावं वरं ? प्रभूचं मंगल नाम गात बसावं हें चांगलं. म्हणजे मन शांत व प्रसन्न होईल. देवा,

( चा० तों तननन वाजवि वेणु. त्रिताल )

मधु--मथना राधा-रमणा ।। गोविंदा पंकज-नयना ।।
मुनि-मानस-लीलासदना !! बलि-वर-बलि-दमना ।।
हृदयीं लांछन, करीं सु-दर्शन ।। धरिसि सतत मुनि-वंदित-
चरणा, अवना ।। १ ।।

( इतक्यांत पडद्यापलीकडे अशी वाणी होते:—हाय हाय! मृत्युंजयाच्या तृतीय नेत्रांतील अग्नीची धगधगीत ज्वाला कामदेवावर पडली व तो जळून भस्म झाला ! केवढा अनर्थ हा ! केवढा अनर्थ हा ! परमेश्वरा ! शांत हो, प्रसन्न हो !)

नि०--( ऐकून ) काय चमत्कार हा ! झाला सगळा उलगडा ! बाळा पद्मनाभाला उगाच शीण झाला. ( लांब पाहून ) अरे तो परत आलाच वाटतं ! ( जवळ येऊन )

प०—गुरुजी ! हा पद्मनाभ वंदन करितो.

नि०—बाळा ! तुला उगीच हेलपाटा पडला. अरे ! तूं निघून गेल्यावर आकाशवाणी झाली आणि सगळाच उलगडा झाला !

प० — आकाशवाणी ! ती काय ?

नि०—शिवाच्या नेत्राग्नीनें मदनाचा दाह केला म्हणून !

प० — मी कैवल्यधामांच्या आश्रमाला पोंचलों, तेव्हां ते उत्पातांचं कारणच आपल्या शिष्यांना सांगत होते. मी त्या शिष्यांत जाऊन बसलों व तें सर्व ऐकलं, मग मुनींना वंदन करून त्यांना विचारून परत आलों.

नि० — शाबास ! योग्य केलंस ! बरं शिष्यांना त्यांनीं काय सांगितलं !

प०—कैवल्यनाथ म्हणाले, " बाळांनो, आजच्या उत्पाताचं कारण मला समाधींत समजलं. तें मी तुम्हांला सांगतों ऐका. तारकासुर नांवाच्या दैत्यानें

त्रैलोक्याला फार पीडा दिली आहे. तिच्यापासून मुक्ति कशी होईल हें विचारण्याकरितां इंद्रप्रभृति देव ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेवानें त्यांस सांगितलें कीं, शिवाला पार्वतीपासून कुमार या नांवाचा एक पराक्रमी पुत्र व्हावयाचा आहे, तो तारकाचा वध करील. त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाच्याही हातून त्याचा मृत्यु नाहीं. तेव्हां इंद्रानें कामदेवाला आज्ञा केली कीं, शिवाला पार्वतीविषयीं मोह पाडून त्याला तिच्याशीं लग्न लावण्यास प्रवृत्त कर. तिकडे हिमवानानें नारदांच्या वचनावरून आपली मुलगी शिवाला देण्याचा संकल्प केला होता व पार्वतीला शिवाच्या तपोवनांत जाऊन त्याची सेवा करण्याची आज्ञा केली होती. त्याप्रमाणें ती नित्य त्याची परिचर्या करीत असे. ही गोष्ट कामदेवाच्या फार पथ्यावर पडली. शिवाचा तपोभंग करण्याची व त्याच्याकडून पार्वतीचं पाणिग्रहण करविण्याची घोर प्रतिज्ञा करून कामदेव आपला मित्र वसंत व मेनकादि अप्सरा बरोबर घेऊन इंद्रसभेंतून बाहेर पडला, तो तडक शिवाच्या तपोवनांत जाऊन दाखल झाला. त्या वेळीं शिव समाधींत होते. मदनानें वसंतऋतु निर्माण करून अप्सरांचें नृत्यगान चालविलं त्यामुळं त्या तपोवनाला क्रीडोद्यानाचं स्वरूप आलं. मदनानें आपल्या प्रभावानें सर्व तपोवन भारून टाकलं. शिवांची समाधि थोडी डळमळूं लागली. ते त्याचं कारण शोधूं लागले. इतक्यांत पार्वती पर्णकुटीच्या दाराशीं आल्याची खबर नंदिकेश्वरानें त्यांस दिली. शिवानीं तिला आंत येऊं देण्याविषयीं अनुमति दिली. पार्वतीनें आंत जाऊन शिवास वंदन केलें. या वेळीं शिव तिच्याविषयीं विशेष अनुरक्त दिसले. ते स्मित करून तिच्याकडे विशेष अभिप्रायानें कटाक्ष फेकूं लागले. ही संधि साधून मदनानें आपलें धनुष्य सज्ज करून तें आकर्ण ओढिलें. त्यानें शिवावर बरोबर शरसंधान केलें. तों शिवांचं मन फारच चंचल व उत्कंठित झालं. हा प्रकार आहे तरी काय असं वाटून ते चहूंकडे पाहूं लागले; तों कामदेवानें आपल्यावर शरसंधान केलेलं त्यांच्या दृष्टीस पडलं! हें पाहून शिवांला मनस्वी कोप आला. त्या आवेशांत त्यांनीं आपला तृतीय नेत्र उघडला. त्यासरशी त्यांतून एक अग्नीची धगधगीत ज्वाला बाहेर पडली! इतक्यांत अंतरिक्षामध्यें मरुद्गणानें मोठ्यानें ' क्रोधं प्रभो संहर संहर त्वम् ' अशी घोषणा केली. पण कसलं काय नी कसलं काय! ती ज्वाला जी सुटली ती एकदम मदनावर जाऊन कोसळली! मग काय! एका क्षणांत त्याचं भस्म होऊन

गेलं. या भयंकर प्रसंगानें पार्वती भयग्रस्त व निराश होऊन आपल्या पित्याच्या घराकडे चालती झाली ! बाळानों ! हा मृत्युंजयाचा कोप व त्यामुळें हा कामदेवाचा दाह बरं का ! मघां उत्पात-चिन्हं दिसलीं त्यांचें कारण हें." ही विस्मयकारक कथा ऐकून आम्ही चकित झालों.

**नि०**—ही मोठीच अद्भुत गोष्ट झाली यांत कांहीं शंका नाहीं.

**प०**—मुनिवर्यांनीं आपणांस नमस्कार सांगितले आहेत; व ही रुद्राक्षाची माळ आपणाकरितां माझ्यापाशीं दिली आहे. ( माळ पुढें करून ) गुरुजी, ही घ्यावी माळ.

**नि०**—अरे, हें मोठ्या लोभाचं चिन्हं आहे ! हेंच आम्हां तपस्व्यांचं सौभाग्य ! आम्ही व कैवल्यधाम अगदीं बरोबरीचे बरं का !

**प०**—गुरुजी; आपण उभयतांही मला सारखेच वंद्य आहां.

**नि०**—होय बाळा ! खरं बोललास. अस्तु. आतां सायंतन विधीची वेळ झाली. जाऊं या तर कनखल-तीर्थावर. [ जातात. पडदा पडतो. ]

---

## प्रवेश दुसरा.

( स्थळ:-हिमालयावरील तपोवन. पात्रें:—तापसवेषधारी पार्वती, मैनाक व विजया )

**पार्वती**—( आत्मगत ) धिक्कार असो या माझ्या सौंदर्याला ! माझे आईबाप याचं मोठं कौतुक करतात ! लोकही म्हणतात पार्वतीसारखी रूपवती त्रैलोक्यांत दुसरी नाहीं. पण या रूपाला काय जाळायचं आहे ! हा देह ज्याला मनानं अर्पण केला त्याला या रूपाचा कांहींच उपयोग झाला नाहीं. मग असल्या रूपाची प्रतिष्ठा काय ?

( राग भैरवी. ताल त्रिवट. )

गमतें तुच्छचि रूप मनाला ॥
जें न प्रियकर-मानस रिझवी व्यर्थ जन्म त्या आला ॥ध्रु.॥
प्रियावरुनियां टाकावें या ओंवाळुनि देहाला ॥ १ ॥

एकच देह काय ! असे कोट देह त्याच्यावरून ओंवाळून टाकावे ! आर्य स्त्रीचं खरं सौभाग्य म्हणजे पति. तिचा प्रतिष्ठादायक कुंकुमतिलक तोच. तिचं

सर्वस्व तोच. मेना व हिमवान् यांच्या मुलीनं मनानं एकवार वरिला तोच तिचा कायमचा वर. तिचा देह त्यालाच वाहिला असं समजावं. जो पूर्वजन्मीं तोच तिचा या जन्मींहि पति; व पुढें ही जन्मोजन्मीं तोच. स्त्री काय किंवा पुरुष काय तिच्या व त्याच्या प्रेमाला स्थान एकच; ही गोष्ट निश्चयात्मक आहे. त्या परम मंगल देवाधिदेवाला हा देह वाहिला आहे. त्याची प्राप्ति होई-पर्यंत मी येथें तप करीत राहणार. हा देह पूर्वी त्या प्रियतमाकरितां दक्ष-प्रजा-पतीच्या होमकुंडज्वालेस अर्पण केला. तसाच, प्रसंग आल्यास या जन्मीं-ही या क्षुद्र देहाचा नाश करण्याचा माझा निश्चय आहे. पतीच्या पूर्वी आलेलं मरण आम्हां आर्य कुलवधूंस पुत्रजन्ममहोत्सवाचा आनंद देणारं आहे. त्याचा मीं मोठ्या प्रेमानें व आदरानें स्वीकार करीन.

माझ्या प्रियतमानें मदनाचा दाह केला हा केवढा तरी अनर्थ झाला! अशी चहूं-कडे कल्पना आहे. यामुळें त्रैलोक्यांत जिकडे तिकडे हाहा-कार उडाला आहे! पण मदनाला असें शासन करण्यांत माझ्या प्रियाचा कांहीं तरी उदात्त हेतु असला पाहिजे. थोर विभूतींचा कोप-देखील प्रसाद करणारा असतो. मला वाटतं मदनाला मारून माझ्या वल्लभानें दोन कामं केलीं आहेत. एक तर या विलक्षण कृत्यानें त्यानें आपला अलौकिक इंद्रियनिग्रह जगजाहीर करून दाख-विला आहे; कारण, सगळ्या जगाला जिंकणाऱ्या मदनाला त्यानं जाळून भस्म केलं. दुसरं असं! हा कामदेव इंद्रियनिग्रहाचा प्रयत्न करणाऱ्या मुनींना दुर्निवार पीडा करून त्यांच्या मोक्षप्राप्तीच्या आड येत असतो. या संबधांत त्याला दहशत बसावी म्हणून असं कडक शासन माझ्या प्राणवल्लभानें त्यास केलं असावं. मदन हा जगाची उत्पत्ति करणारा असल्यामुळें त्याचा पूर्ण नाश कर-ण्याचं माझ्या प्रियतमाच्या मनांत कधींच येणं शक्य नाहीं. मदनाचा गर्व-परिहार करण्याच्या उद्देशानं माझ्या वल्लभानं त्याचं बहिरंग मात्र नष्ट केलं आहे. अर्थात् प्राणिमात्रांच्या हृदयातलं त्याचं स्थान कायमच आहे! अशा रीतीनें साऱ्या जगावर माझ्या प्रियानें उपकार केला आहे. (थोडा विचार करून) खरोखरी,

[ राग मालकंस, ताल दीपचंदी ]

जना गूढ आहे प्रियाची स्थिति। खरें तत्त्व जाणे, कळे त्यास तीं॥धृ.
अहा, मंगला सर्व त्याची कृती। दिसे या मनाला शुभा आकृति॥१॥

माझ्या सख्या जया व विजया तर यासंबंधानें माझी थट्टाच करतात ! मैनाक दादा त्यांच्याच माळकेंतला. बाबा व आई तर नारदांच्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवून आहेत; तथापि आईला असं वाटतं कीं, शिवप्राप्तीकरितां असं कष्टकारक तप मी करूं नये; पण बाबा अगदीं माझ्या मताचे आहेत. या गोष्टीमुळं मला केवढा तरी धीर आला आहे ! शिवाकरितां तप करून मीं देह झिजविला तरी त्यांना ती गोष्ट मान्य आहे. कारण त्यांची खात्री आहे कीं, शिव हा आपला जामात होईलच होईल व माझी तपश्चर्या सफल होईल.

सर्व जग माझं विवाहमंगल पाहण्यास उत्सुक झालं आहे. पण माझ्या भाग्यांत ही गोष्ट आहे का ? [ विचार करून ] असलीच पाहिजे. याविषयीं मला शंका तरी कां यावी ? नारदांचं वचन खोटं कसं होणार ? आप्तवाक्य कधीं खोटं ठरतं काय ? वेडे पार्वती ! ही शंका देखील तं मनांत आणू नको.

[ राग यमन, ताल धुमाळी. ]

देवा, तनु ही शिवा वाहिली । मम पति अगदीं तन्मय झाली ॥
त्याविण माझा कुणी न वाली । गोष्ट मना ही एकचि पटली ।धृ.॥
ही भवपत्नी जन्मा आली । रमणा पाहुनि अंतरिं धाली ।
त्याच्या पासुनि नसे निराळी । वृत्ति तदीया त्यांत निमाली ॥ १ ॥

हा देह त्या स्मरमथनाच्या पवित्र चरणकमलांवरच वहावयाचा ! देवा, माझा हा निश्चय अढळ राहूं दे. या जगांत माझ्या प्रियतमाच्या एकपत्नीव्रताचा दुंदुभी सारखा झडत राहो ! ही पार्वतीही तुझी जन्मोजन्मींची पत्नी व पतिव्रता स्त्री असं तिचं नांव पाठीमागं कायम होवो ! अशा मुलीला जन्म देणारे हिमवान् व मेना हे खरे भाग्यवान् होत, असा धन्यवाद सर्व लोकांच्या मुखांत उभा राहो ! एवढीच भगवंता ! तुला हात जोडून प्रार्थना आहे. [ हात जोडून उभी राहते. इतक्यांत प्रवेश करून ]

**मैनाक**—ताई, हें ग काय मांडलं आहेस तूं ?

**पा०**—हें तप अन् दुसरं काय दादा ? बरं, तूं या तपोवनांत येण्याचे श्रम कां बरं घेतलेस दादा ?

**मै०**—ज्याकरितां तूं घेतलेस त्याकरितांच मीं घेतले.

**पा०**—म्हणजे ? तुझ्या बोलण्याचा अर्थ मी नाहीं समजलें.

**मै०**—तूं कशाकरितां तप करीत आहेस ?

**पा०**—माझा प्रियतम शिव याच्या प्राप्तीकरितां !

**मै०**—मीही माझी प्रियतमा भुवन–सुंदरी हिला मिळविण्यकरितां.

**पा०**—अरे ! ती का न मिळती आहे ? या क्षणीं मिळेल, या क्षणीं !

**मै०**—मग शिव तरी का न मिळेसा आहे ? तो तुझा पति ठरलाच आहे. नारदांनीं त्याविषयीं खात्री दिली आहे. आज नाहीं उद्यां; पण तो मिळणारच नव्हे का?

**पा०**—सगळ्या भुवनांचं मथन करणारा कामदेव याला जाळून टाकून त्यानं आपलं इंद्रियांवरील प्रभुत्व स्थापित केलं आहे. अशाचं मन प्रसन्न करणं हें काम खडतर तपश्चर्येशिवाय अशक्य आहे. मी अगदीं अनन्यगतिक आहें, अशी त्या स्मरांतकाची खात्री पटली पाहिजे. याकरितां हा तपाचा मार्ग मीं स्वीकारिला आहे.

**मै०**—माझ्या सारख्याला त्यामुळें किती तरी दुःख वाटत आहे !

**पा०**—तें मलाही कबूल आहे, दादा ! पण परिणामीं ही गोष्ट सर्वांना आनंद देणारी आहे, यामुळें मीं तुझा, आईचा व जयाविजयांचा राग पतकरीत आहें. माझी खात्री आहे मी तुम्हां सर्वांना पुन्हां प्रसन्न करीन.

**मै०**—आमच्या विषयीं तूं एवढी कठोर कशीग झालीस ताई ! मागें मी तुला झगालों होतों, तुला पार्वती हें नांव कमीपणा आणणारं आहे म्हणून. पण आज तुझ्या कठोर वर्तनानें उलट बोलण्याची पाळी आणलीस तूं मजवर !

**पा०**—तूं कांहींही म्हण. मला त्या शिवा-शिवाय दुसरं कांहींच दिसत नाहीं. हा देह सुद्धां मला नकोसा झाला आहे. यापेक्षां अधिक काय सांगूं ? ध्यानीं, मनीं, जनीं, विजनीं, भोजनीं, स्वप्नीं, शयनीं, तो भरून राहिला आहे. हें तप मी अर्थात् केवळ स्वार्थकरितांच करीत आहें. तेव्हां माझ्या हिताकरतां तरी तूं याला आडवा येऊं नकोस म्हणत्यें.

**मै०**—माझ्यावर तुझं खरं प्रेम नाहीं वाटतं ?

**पा०**—हें काय विचारतोस ! तें आहेच आणि असलंच पाहिजे. पण त्या शिवाचा ज्या प्रेमावर हक्क आहे तें प्रेम मात्र दुसऱ्या कोणास न मिळूं देण्याचा माझा दृढ संकल्प आहे, इतकंच.

**मै०**—हें अगदीं योग्य ! पण याकरितां देहाला असे कष्ट देणं योग्य नव्हे. शिव का इतका पाषाणहृदयी आहे कीं जो आपल्या प्रणयिनीला आपल्या करितां असा तीव्र देहदंड करील !

**पा०**--पण त्याचं माझ्याशिवाय अडलं आहे कुठं ? तो इंद्रियांचा स्वामी असून परम वैराग्यसंपन्न आहे. त्याला संसाराची काय जरूरी ? त्रैलोक्य हिताकरितां त्यानें विवाह करण्याचं मनांत आणिलं आहे. स्वताच्या लाभाकरितां नाहीं ! ( विजया येते )

**मै०**— ही विजया आलीच बरं का ! (तिला) विजये ! तूं तरी या बाईला चार गोष्टी सांगून पहा.

**वि०**---दादा, आम्हीं आमची शर्थ केली आहे यापूर्वीच ! आपलीच पुण्याई घाला थोडीशी खर्ची !

**पा०** —ही का माझी थट्टा चालविलीस वाटतं विजये ! अग ! हा कांहीं थट्टेचा विषय नाहीं ! मी का तुमची वैरीण आहें ? आजपर्यंत एका तरी गोष्टींत मीं तुमच्या विरुद्ध वागलें का ?

**वि०**---म्हणूनच या गोष्टींत तुझा आग्रह पाहून आम्हांला नवल [illegible] व वाईटही वाटतं. आईसाहेबांनीं आज माझ्या बरोबर तुला पुन्हां एकदा निरोप पाठविला आहे कीं, माझे लाडके बाळे ! तूं शरीराचे हाल करूं नकोस, ते आमच्यानें पाहवत नाहींत आतां ! तूं घरीं ये. येथें देवतांचें [illegible]प्रमाणें आराधन कर, व इष्टप्राप्ति करून घे. तर, चल ना माझ्याबरोबर [illegible] गडे !

**पा०** - आईला माझा नमस्कार सांग. तिचे उपकार मी जन्मा [illegible] विसरणार नाहीं. तिला समजावून सांग कीं मी करतें आहें हे माझ्या [illegible] हिताचं नाहीं तर सगळ्यांच्याच हिताचं आहे.

**वि०**—तुझी बाई शर्थ झाली ! आम्ही काय निरोपाच्या धनी ! खरंच सांगतें पार्वती, राग नको येऊं देऊं हो ! लग्नाच्या पूर्वींपासूनच एवढा त्रास देणारा हा पति तूं पाहिलास याला ह्मणावं काय ? यावरून पुढं काय तुला सुख लागणार तें दिसतंच आहे ! तूं हा नाद अगदीं सोडून दे कसा ! तूं त्याला मनानं वरलं आहेस; ठीक आहे. असेल त्याला जरूर तर येईल आपरूख ! नाहीं तर बसूं दे त्याला समाधि शेकीत ! खरं पुसशील तर ताई, मला किनई, तुझं हें ठिकाण अगदीं अगदीं पसंत नाहीं. पहिल्या पहिल्यांदा वाटलं अंमळ बरं; पण आतां अनुभवानं माझं मत असं झालं आहे ! तुझ्यासारख्या शहाण्या, विचारी, कुलीन व लोकोत्तर सुंदरीनें असलं स्थळ पतकरावं हे किती तरी विचित्र आहे ! याबद्दल लोकांत तुझी नुसती थट्टा चालली आहे, थट्टा ! जिकडे जावं तिकडे हेंच ! सगळे

तुलाच नांवं ठेवतात ! बरं त्या जटाळ्याचं नशीब तरी बाई काय जोरावर ! हिमवान् महाराजांची कन्या त्याच्या घरीं लोटांगणं घालीत जात आहे ! दरिद्र्याच्या घरीं कामधेनु जाऊन उभी ! पण बाई, चमत्कार असा कीं तो घरीं चालून आलेल्या लक्ष्मीला लाथाडून देत आहे ! सगळंच त्याचं जगाविरहित बाई! गडे पार्वती, सोड हा नाद ! समजलीस का ?

पा०—विजये ! मला क्षमा कर. तुझं हें बोलणं माझ्यानं ऐकवत नाहीं. अग तुला खरोखर त्या पुरुषाचं स्वरूपच कळलं नाहीं. महात्म्याचीं चरित्रें प्राकृत लोकांना समजत नाहींत बरं ! माझ्या मनाची बालंबाल खात्री आहे कीं, वराच्या कामांत माझ्या हातून चूक बिलकुल झाली नाहीं. माझे बाबा एवढे पवित्र व मोठ्या कुळांतले; पण त्यांनाहि धन्य करण्याचं सामर्थ्य त्यांत आहे. पण तुझी दृष्टी वेगळी! माझी वेगळी !! तुझ्याकडे काय बोल व तुझ्याप्रमाणें ज्यांचं मत त्यांना तरी काय दोष द्यावयाचा !

वि०—बरं ताई ! आमचं आपलं सगळं अडाणीपणाचं ह्मणणं ! झालं ? तुझं कां खरं होईना ? तेंच खरं होवो ! व सगळ्यांच्या तोंडात साखर पडो ! मग नाहींच का तूं ऐकत ? मग माझं एक म्हणणं ऐकशील !

पा०—बोल काय तें.

वि०— तुझ्याजवळ या तपोवनांत मला व जयेला राहूं दे ना !

पा०—याला माझी मुळींच हरकत नाहीं. तुमच्या घरच्यांनीं परवानगी दिली तर माझं काय त्यांत बिघडतं ? मला उलट चांगली सोबत झाली !

वि०—अग, मीं घरीं आईला अगोदरच विचारून ठेविलं आहे. तिची हरकत नाहीं व बाबाहि म्हणाले जाऊं दे पोरींना तिकडे म्हणजे, तपोवनाचं सुख तरी समजेल त्यांना ! मग येतील आपसूख परत !

मै०—ताई, जयाविजयांची आई कां कबूल झाली आलं का तुझ्या ध्यानांत ?

पा०—नाहीं दादा ! सांग पाहूं त्याचं काय कारण तें.

मै०—विजयेचं लग्न त्या विजयसेनाशीं जुळवून ठेविलं आहे; पण तुझं झाल्याशिवाय तिचं करावयाचं नाहीं, असा तिच्या बापाचा निश्चय आहे. तुझी तपश्चर्या तिच्या आईच्या अगदीं पथ्यावर पडली आहे ! तुझं लग्न जितकं लवकर होईल तितकं तिला हवंच आहे. म्हणून ती इकडे मुली धाडायला कबूल झाली, उगाच नाहीं !

**पा०**–बरं, तिच्या आईचा तसा हेतु असला तरी त्यांत काय बिघडलं? माझ्या योगानें विजयेचं कल्याण होत असलं तर तें मलाही इष्टच आहे. आणि तुला तरी कां नसावं? (विजया खालीं मान घालून हंसते.)

**मै०**–अग मलाही इष्ट आहे! पण ही विजया कांहीं बोलते आहे का आतां! (विजयेला) कां विजये, खालीं मान घातलीस? बोल बोल. मी म्हणतों हें खरं कीं नाहीं! कशी चित्तम बातमी काढली पण!

**वि०**—दादा, तुम्हीही येथेंच रहा. म्हणजे तुम्हांलाही देव पावेल व तुम्ही-ही लवकरच चतुर्भुज व्हाल! काय समजलांत!

**मै०**—विजये! खरंच ती एक मजाच होईल मोठी! एकीची वराकरितां तपश्चर्या तर दुसऱ्याची बायकोकरितां समाधि! खासा रोजगार! पण तें राहो. मला बाबांकडे परत गेलं पाहिजे. माझ्या मागें कामं फार आहेत. पण तुम्ही दोघी मात्र ताईला सोडूं नका हो! तसा मी मधून मधून येईनच.

**वि०**—दादा! हें काय सांगावयाला हवं? आम्ही तिच्या जिवाच्या मैत्रिणी! तिच्याकरितां आम्ही प्राणदेखील द्यावयाला तयार होऊं!

**मै०**--तुमच्या प्रेमाला योग्य असंच बोललीस. बरें आहे ताई, विजये, येतों. तुमचं कल्याण होवो!

**पा**—-'तथास्तु' दादा! (मैनाक जातो) विजये! हा भगवान् अंबरमणि मध्यावर आला. आतां स्नानाची वेळ झाली. मी कांचनतीर्थावर जातें. वल्कलं, स्फटिकाची माळ, भस्म, मौंजी, अजिन, व्याघ्रचर्म, कमंडलु, पादुका इत्यादि उपकरणं व पूजेचं साहित्य पर्णकुटींत सज्ज असूं दे असं सांग मल्लिकेला.

**वि०**–होय, सांगतें.

[जातात. पडदा पडतो.]

---

## प्रवेश तिसरा.

(स्थल:–कैलासप्रांत; पात्रें:–शिव आणि पर्णाशन मुनि.)

**पर्णाशन**–नमो नमः शिवाय.

**शिव**–ॐ परब्रह्मणे नमः; पर्णाशना! नमस्कार. कसें काय आहे?

**प०**–फार मौज केलीस बाबा! अरे त्या कामदेवाला जाळून टाकिलेंस! आतां त्या विधात्याच्या सृष्टिकर्माचा उद्योग चालावा तरी कसा?

शि०:—अरे तुझ्यासारख्याला देखील त्याविषयीं अज्ञान असावें ? अरे मदनाचा देह मात्र जळाला ! प्राणिमात्राच्या हृदयांतील त्याचं स्थान कायमच आहे.

प०—असं असं ! मग लोकांनीं या बाबतींत उगाच हाकाटी चालविली आहे म्हणावयाची !

शि०—यांत काय संशय ! मदनाचे सर्व व्यापार चालूच आहेत. त्याचा देह नाहींसा झाल्यापासून त्याला अनंग हें नांव मिळालं एवढंच !

प०—पण बाबा, तुझ्या लग्नाचं काय झालं पुढं ? करणार कीं नाहीं मग ! आज पुष्कळ दिवस गर्जत आहे म्हणून विचारतों.

शि०—तें होणारच.

प०-मग हेंच अनंग जिवंत असल्याचं प्रत्यक्ष निदर्शन आहे.

शि०—अरे ! तारकासुराच्या वधाकरितां या संसारांत पडावयाचें आहे !

प०—तुझ्यासारख्या महानुभावाला हें योग्यच आहे. बरं मग लग्न करून करायचं तर मग त्या बिचाऱ्या पार्वतीचे एवढे हाल कां मांडले आहेस ?

शि०-हाल ते कसे ?

प०—अरे ! ती तुझ्याकरितां सगळं ऐश्वर्य सोडून तपोवनांत तपश्चर्येला बसली आहे !

शि० मग त्यांत काय आहे ? इथें आमच्या घरीं आल्यावर तिला तपाची नवीं तयारी करावयाला नको !

प०—शाबास बाबा ! खूप कल्पना तुझी ! मग आतां लग्न झालं म्हणजे भिक्षा, समाधि, यज्ञ, हींच का तुम्ही करीत राहणार ? कीं गृहस्थ बनून संसार थाटणार ?

शि०—अरे ! आमचं ऐश्वर्य काय आहे तुला ठाऊकच आहे. हें पाहून पार्वतीनें आम्हांला पाहिजे तर वरावं; नाहीं तर वरूं नये. माझ्या मनांत तिची एकदा पुरी परीक्षा पहावयाची आहे. बाकी तिचं माझ्यावर अढळ प्रेम आहे हें या पूर्वीच दिसून आलं आहे म्हणा ! पण एकदा उगीच विनोद करून पाहूं म्हणतों.

प०—पण मला वाटतं असं कठोरपणानं वागणं तुला योग्य नव्हे. अरे, तिच्या तपश्चर्येची तुला कांहीं तरी कल्पना आहे काय ? बाबा, आतां परीक्षा—बिरीक्षा घेण्याच्या नादीं पडूं नकोस. या दिव्यांत पटकन् ती रामच म्हणायची बाबा ! मग सगळाच ग्रंथ आटोपला !

**शि०**–तिच्या तपाची काय बातमी आहे सांग पाहूं ? ऐकूं दे ती मला.

**प०**– ती सुकुमार, रूपवती राजकुमारी गौरी आपल्या ताताची अनुज्ञा घेऊन तुझ्या प्राप्तीकरितां भयंकर तप करावें असें मनांत आणून हिमालयाच्या एका मयूरमंडित शृंगावर तपोवनांत जाऊन राहिली आहे !

**शि०**–बराच मनाचा निश्चय दिसतो आहे तिचा ! हिमवानानें तिला तप करण्याचं अनुमोदन दिलें ही आश्चर्याची गोष्ट आहे !

**प०**–आपल्यासारखा त्रैलोक्यपति जामात मिळत असतां कोण काय पत-करणार नाहीं ?

**शि०**–बरें पुढें ?

## ( कटाव )

**प०**–गिरिसुता तपाला बसली । व्रतचर्या काठिण्यचि असली ! ॥ धृ० ॥ मुक्ता-हारस्थानीं बाला । बसवी ती स्फटिकांची माला । दुकूल टाकुनि वरी वल्कला । रशना–स्थानीं मौंजि–मेखला । कंदुक–लीला–कुशल करांसी । शिकवी तोडावया कुशांसी । धरावयाला रुद्राक्षांसी । लावी हिमगिरि–बाला त्यांसी । अंगराग ती सुरभि त्यजिते । भस्म तनूवरि सकल चर्चिते । चरण–राग कज्जलहि वर्जिते । चपल इंद्रियांलागि तर्जिते । बाहुलतेची उशी करी ती । वेदीवरि उघड्यांताचि पडती । रुचिर कचांच्या जटा वळीती । अशी अनुसरे तपस्विरीती । हरिणींना निज कटाक्ष लीला । विलास अर्पी मृदु वल्लींला । नूतन कोमल वृक्ष–राजिला । पुत्रप्रेमें घाली सलिला । हरिणांना तृणधान्य चारिते । तृषा तयांची उदकें हरिते । पसरि अंगणीं विहंगमांतें । भक्षाया नीवार–कणांतें । तीर्थी करुनी स्नान सकाळीं । अर्ची सवित्या गिरीशबाळी । टाकि आहुती प्रदीप्त अनळीं । देवतांसही अर्पितसे बाळि । मग परमेश्वर–गायनिं दंग । गोळा होती तिथें कुरंग । पाहुनि भजनाचा तो रंग । येइ मुनींचा तेथें संघ । तो तच्चरणां वंदू लागे । धर्मवृद्ध त्यां वय नचि लागे । पाहुनि तिजला पातक भागे । सुरमुनि जाती भरुनि विरागें । कोणी कोणी अतिथी येती । फलपुष्पांनीं तरु त्यां पूजिति । हिंसक पशु वैरासि सांडिती । एकत्राचि संसार मांडिती । अशीं तपाचीं फलें विलसती । कष्ट भोगिते रात्रंदिन ती । गिरिजेची तनु कृश झाली । गिरिसुता तपाला बसली । व्रतचर्या० ॥१॥

अशा प्रकारें तिचं तपोवन परम पवित्र झालं आहे. एवढ्या तपानें मनोरथ-प्राप्ति होत नाहीं असं पाहून तिनें देहाकडेही न पाहतां अधिक तीव्र तपश्चर्या सुरू

केली आहे ! कंदुकक्रीडेनें जिला श्रम व्हावे, ती मुनीसारखी कष्टकारक तपश्चर्या करूं लागली आहे. खरोखर तिच्या शरीराला कांचनपद्माचीच उपमा योग्य आहे. कारण त्यांत पद्माचा मृदुपणा व सोन्याचा कठिणपणा असे दोन्ही धर्म दिसून येतात. ग्रीष्म-ऋतूमध्यें चहूं बाजूंनीं अग्नि पेटवून ती सुहास्यवदना सिंहकटि सूर्याकडे एक-सारखी दृष्टि देऊन उभी राहते ! आकाशांतून पडेल तें उदक व इंदूचे किरण यांवरच ती वृक्षलतिकेसारखी उपजीविका करिते ! पंचाग्नीनीं तप्त झालेली व वर्षाकालीं नवमेघांनीं सिक्त झालेली ती राजकुमारी सभोंवतालच्या भूमीबरोबर आपणही बाष्पोद्गार टाकिते ! आकाशांतील सलिलबिंदु प्रथम तिच्या पापण्यांवर सांचतात, तेथून अधर-प्रांतावर येतात, पुढें खालीं उच्च व कठिण पयोधरांवर आदळून त्याच्या अनेक छिन्न विछिन्न धारा बनतात व त्या उदरावलींत प्रविष्ट होऊन नाभींत अंतर्धान पावतात ! झाडांवरून आपोआप गळलेलीं पानं खाऊन राहणं म्हणजे तपाची पराकाष्ठा समजतात.पण पार्वती त्याच्याही पुढें गेली आहे ! तिनें पर्णाहारसुद्धां सोडला ! यावरून तिला अपर्णा हें नांव शोभण्यासारखं आहे ! याप्रमाणें त्या मृदूंगीचं देह कष्टविणारं घोर तप रात्रंदिवस सारखं चाललं आहे ! यापुढें मोठा तपस्वी तरी काय तप करणार ?

**शि०**—ही तर आमच्यावरही कडी केली पार्वतीनें !

**प०**—असं घोर तपं तुझ्या सारख्यानांच कदाचित् शक्य !

**शि०**—तर मग आतां विलंब करणं योग्य नाहीं.

**प०**—खचित नाहीं ! तिच्यावर सत्वर अनुग्रह कर.

**शि०**—बरें आहे. आतांच म्हटल्याप्रमाणें थोडा विनोद करून पार्वतीवर प्रसन्न होतों. ॐ नमो ब्रह्मणे ! ( जातात. पडदा पडतो.)

---

## प्रवेश चवथा

( स्थलः—पार्वतीचा आश्रम; पात्रें:-जटिल, पार्वती व विजया )

**जटिल**—( आपल्या शरीराकडे नीट पाहून ) मीं घेतलेलं हें सोंग नीट जुळलं ना सगळं ? नाहीं तर एकदम फजिती व्हावयाची ! त्या पर्णाशनाला ही नवी तयारी एकदा दाखविली असती म्हणजे बरें झालें असतें ! असो. त्यांत कांहीं मोठंसं बिघडलं नाहीं म्हणा. ( विचार करून ) पार्वतीची परीक्षा कशा

रीतीनें करावी वरं ! मला वाटतं पतिव्रता स्त्रीला चिडवायला एकच गोष्ट पुरे आहे. ती गोष्ट म्हणजे तिच्या तोंडावर तिच्या पतीची यथेच्छ निंदा करणें होय ! ती ऐकून जर ती खरी रागावली तर समजावं कीं अस्सल नाणं आहे ! असंच करावं तर मग..या पार्वतीचं शिवावर फार प्रेम आहे असं दिसतं. तेव्हां त्याचीच निंदा तिच्यापुढें करून पहावी! पण हा विनोद फार जपून केला पाहिजे. न जाणो, प्रकरण विकोपाला जायचं आणि भलतंच कांहीं व्हावयाचं ! तिनें माझें मन हिरावून नेलं आहे यांत तर संशयच नाहीं. पण मीं तिचं मन कितपत आपलंसं करून घेतलं आहे एवढंच कौतुकानें पहावयाचं आहे. [ आश्रम लागला असें पाहून ] अरे हा आश्रम लागलाच हिचा ! अहाहा ! हा किती तरी सुंदर आहे ! ( थोडें पुढें जाऊन ) ता पलीकडे लतांच्या जाळीमध्यें शिलातलावर ध्यानस्थ बसलेली कोण बरें असावी ! ( निरखून ) ही माझी प्रियतमाच यांत संशय नाहीं. हिनें हातांत रुद्रवीणा घेतली आहे. ही ईश्वराचं स्तवन करण्याच्या बेतांत दिसते. आपण येथं बाजला उभं राहून हिचं गीत ऐकावं आणि मग अवसर पाहून पुढं जावं हें बरं ( गीत ऐकत उभा राहतो. )

पा०— ( राग केदार, एकताल )

**शंभो ! गंगाधरा ! शंकरा ! दीना हिम-नग-बाला ।**
**तव पद-युगला तनु मन वाही, रक्षीं तिजसि दयाळा ॥ ध्रु०**
**चंद्रशेखरा, स्मरमथना, हा जीव नकोसा झाला ।**
**प्रसाद करूनी झडकरि सदया करिं या धन्य जनाला ॥ १ ॥**

**जटिल**—अहाहा! हिच्या स्वरूपाप्रमाणें हिचा कंठही फार मधुर आहे ! या गीतांत हिनें शिवालाच प्रणामांजलि अर्पण केला आहे. एवढंच नव्हे, तर तिनें आपलं सर्वस्वच त्याच्या पायांवर वाहिलं आहे ! हिचें माझ्यावर प्रेम आहेच यांत शंका नको. तथापि मनांत आणल्याप्रमाणें थोडा विनोद करून पाहावा. ( आश्रमद्वाराजवळ जाऊन मोठ्यानें ) कोणा आहे काय आश्रमांत ! हा मी अतिथि आलों आहें. ( हे शब्द ऐकून बाहेर येऊन )

**विजया**—कोण आहे ! कोण आलं आहे तिकडे आश्रमांत ?

**ज०**—हा मी अतिथि आहें. पार्वतीला भेटण्याकरितां येथें आलों आहें.

**वि०**—आपल्या नांवाचा अनुग्रह या दासीवर होईल काय ?

जo—( स्वगत ) अरे ! हें लचांड उपस्थित झालं बोवा ! पण हरकत नाहीं. हिला असं सांगावं तर मग. ( उघड ) माझं नांव विरूपाक्ष मुनि.

विo– मी आंत सखीला जाऊन कळवितें.

जo–ठीक आहे. ( स्वगत ) हेंच नांव सुचलं हें त्यांतल्या त्यांत ठीक झालं! ही विजया मोठी धूर्त दिसते आहे !

विo–( आंत जाऊन पार्वतीला ) ताईसाहेब ! बाहेर कुणी अतिथि आले आहेत. त्यांचं नांव विरूपाक्ष मुनि. त्यांच्या अंगावर कृष्णाजिन व हातांत पालाशदंड आहे. वेदाध्ययनाचें तेज त्यांच्या शरीरावर झळकत आहे. फार काय सांगूं ? ते ब्रह्मचर्याची साक्षात् मूर्तिच दिसतात !

पाo ( गडबडीनें ) अग विजये ! असल्या मुनींना बाहेर उभं करणं योग्य नव्हे. एकदमच आंत आणून त्यांचा सत्कार करावयाला हवा होता ! हें ग काय केलंस ! चल चल लवकर त्यांना सामोरे जाऊं. ( पुढें जाऊन मुनीला )

पाo–महाराज ! माझ्या सखीनें मोठा प्रमाद केला, त्याची क्षमा असावी. तिनें आपल्याला विनाकारण बाहेर उभं केलं ! मुनिवर्या ! आंत चलावयाचं !

जo–कांहीं हरकत नाहीं. बराच लांबून आलों, त्यामुळें थकलों. अग मनांत आलं येथें जवळच तुझा आश्रम आहे, यांत थोडी विश्रांति घ्यावी आणि मग पुढें जावं. तुझी भेट झाली हा लाभच झाला म्हणावयाचा. आनंद झाला. ( थोडें हुश्श करून ) किती तरी श्रम–परिहार झाला ! हें स्थान मोठं रम्य व शीतळ आहे !

पाo—मुनिवर्य ! उटजांत येऊन आतिथ्य घ्यावं अशी प्रार्थना आहे.

जo—बरें आहे. ( चालत चालत पर्णकुटिकेजवळ जातात. तेव्हां )

पाo–( आसनाकडे बोट करून ) महाराज ! या आसनावर बसावं. हें तीर्थोदक, हीं फळें, हीं पुष्पें यांचा स्वीकार करावा. ( असें म्हणून सत्कार-सामग्री पुढें करते. )

जo–आपणही उभयतां बसा. ( सर्व बसतात. उदक प्राशन करून व फुलांचा वास घेऊन ) अहाहा ! हें उदक अमृततुल्य आहे ! हीं फुलें तरी किती सुगंधि ! यांनीं माझा सगळा शीण दूर केला, पार्वती ! आतां फळें खाण्याचा आग्रह नको करूं. मला क्षुधा नाहीं.

( अंमळ विचार करून ) बरं पण पार्वती ! तुझं तप ठीक चाललं आहे ना ?

**पा०**–होय, आपल्या कृपेनें.

**ज०**–तपाला लागणारं दर्भ, समिधा वगैरे द्रव्य विपुल मिळतें ना ? सर्व धर्म-क्रिया यथास्थितपणें चालल्या आहेत ना ? तुझ्या डोळ्यापासून विलास शिकणारीं व तुझ्या हातांतून तृणधान्य भक्षण करणारीं हरिणें खुशाल आहेत ना ? तुझ्या अधरोष्ठाच्या लालीची स्पर्धा करणारी वेलींची पल्लवसंपत्ति विपुल आहे ना ?

**पा०**–आपल्या प्रसादानें सर्व कांहीं अनुकूल आहे.

**ज०**—श्रीगंगेच्या जगत्पावन ओघापेक्षांही तूंच आपल्या निर्मल चरित्रानें हिमवानास पवित्र करून टाकिलं आहेस !

**पा०**—ही माझी स्तुति अवास्तव आहे. माझ्या वडिलांचीच पुण्याई मोठी खरी !

**ज०**--तुझ्या तपश्चर्येवरून अर्थ व काम यांच्यापेक्षां तूं धर्मालाच मान अधिक देतेस असें दिसतें !

**पा०**--त्याची तशीच योग्यता आहे !

**ज०**—पार्वति ! तूं इतक्यांतच माझा मोठा सत्कार केलास, यावरून तूं मला परका समजत नाहींस हें उघड झालं. सात शब्द बोलून किंवा सात पावलं बरोबर चालून थोरांची मैत्री होते, असं शास्त्रकार सांगतात. तेव्हां तुझं व माझं साप्तपदीन सख्य झालं म्हणावयाचं !

**पा०**—थोरांचीं वचनं खोटीं होत नसतात, तीं नेहमीं सत्यच असतात.

**ज०** तर मग मला तुला थोडंसं विचारावं असं वाटतं. विचारूं कां ? मी ब्राह्मण आहें. त्यामुळें स्वभावत:च जिज्ञासु, चपल व धीट आहें. तूं शांत वृत्तीची आहेस ! म्हणून मला थोडंसं साहस करावसं वाटतं. जर तुझी हरकत नसेल तर माझ्या प्रश्नांचीं उत्तरं दे; एवढंच माझं म्हणणं आहे.(तिच्याकडे न्याहळून पाहून) तुझ्या चर्येवरून तुझी प्रश्न ऐकण्याची तयारी दिसत आहे. तेव्हां मी तुला थोडं विचारितोंच. हिरण्यगर्भाच्या कुळांत तुझं जन्म. सगळ्या त्रैलोक्यांतलं सौंदर्य तुझ्या ठिकाणीं एकवटलेलं. सगळ्या प्रकारचीं ऐश्वर्यं तुझ्या घरांत. वय ऐन तारुण्याचं, असं असतां हें तप कशासाठीं करीत आहेस ? तुझ्या सारख्या मानिनीचा कांहीं अपमान झाला असेल म्हणावा तर तें संभवत नाहीं. कारण, तुझ्या

पित्याच्या घरांत तुझा अपमान करावयाला धजेल कोण ? सर्पाच्या मस्तकावरील रत्नाला कोण हात घालूं शकेल ? या यौवनामध्यें तूं उत्तम आभरणं अंगावर घालावयाचीं तीं टाकून देऊन वृद्धपणाला शोभेल असें वल्कल नेसली आहेस, याला काय म्हणावं ? स्वर्गाची इच्छा तुला असणें केवळ अशक्य आहे. कारण, तुझ्या पित्याच्या प्रदेशावरच दिव्य देवभूमि आहेत ! बरं, पतीकरितां एवढा खटाटोप असेल तर तोही विनाकारणच ! कारण रत्नाला कांहीं ग्राहक शोधावे लागत नाहींत ! ग्राहकच रत्न शोधीत असतात ! पार्वति, तुझ्या या उष्ण श्वासांवरून तुझा भाव समजलों ! पण थोडा संशय माझ्या मनांत येत आहे; तो असा. अग, तुझं मन या जगांत जावं तरी कुणावर ! आणि यदाकदाचित् एकाद्यावर तें गेलंच तर तो तुला न मिळता कसा असणार ?

( राग कालंडा, ता० दीपचंदी. )

नचि दया लव तया वांछिसि, बाले ! ज्या तरुणा ।। ध्रु ।।
केविं तो रुचला गे तुजला ?
वैरि तव मज गमे जन्माला आला ।। १ ।।

हे गौरि ! आतां हें परमकष्टकारक व्रत तूं आणखी किती दिवस चालविणार आहेस ! मी ब्रह्मचर्यामध्यें मोठं तप करून पुण्य सांचविलं आहे त्यांतलं अर्धं तुला द्यावयाला तयार आहें. त्यानं तुला तुझा पति मिळवितां आला तर बरंच झालं. पण असा तो पति आहे तरी कोण हें जाणण्याची मात्र मला फारच उत्कंठा आहे पार्वति !

**पा०**—( स्वगत ) या मुनीचं भाषण मोठं मार्मिक व रसिकपणाचं दिसतं आहे ! पण याच्या प्रश्नाचं उत्तर मला कसं देतां येईल बाई ! विजयेला हें काम सांगावं हें बरं. ( असं म्हणून विजयेला जटिलाच्या प्रश्नाचं उत्तर देण्याविषयीं हळूच सुचविते ! )

**वि०**—महाराज ! मीच माझ्या सखीला विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देतें. ऐकावं. माझ्या सखीनं हें खडतर व्रत कां आरंभिलं आहे हें सांगतें. महा समर्थ दिक्पाल व इतर मोठमोठे वर हिच्या पाणिग्रहणाविषयीं उत्सुक होते. तथापि त्यांचा धिक्कार करून हिनें शिवालाच वरण्याचा दृढ संकल्प केला आहे. पण शिवानें कामदेवाचाच दाह केल्यामुळें केवळ सौंदर्यानें शिव प्रसन्न होणं कठिण आहे, असं समजून हिनें हें उग्र तप चालविलं आहे; व त्याची प्राप्ति होईपर्यंत

ही हें चालविणार आहे. मदनानें आपला बाण शिवावर रोखला. शिवानें नुसत्या हुंकारानें त्याचं निवारण केलं. पण पार्वतीला मदनबाणानें अतिशय व्याकुल करून सोडिलं आहे ! हिमवान् मोठा ऐश्वर्यशाली. त्यानें हिच्या मदनबाधेवर शेंकडों उपचार केले. पण व्यर्थ ! हिच्या संगीत-सख्या किन्नर-राजकन्या आहेत. जेव्हां ही माझी प्रियसखी शिवाविषयीं स्वतां पदें रचून तीं प्रेमानें व उत्कंठेनें गात बसते तेव्हां त्या गंधर्व--राजकन्यांना देखील दुःखाचा उमाळा येतो. एकादे दिवशीं पहाटेस एकदम झोंपेंत ही असं चावळते, ' हे प्रियतमा नीलकण्ठा ! कुठें रे मला सोडून जातोस तूं ? ' व शिव जवळ आहे अशा भ्रांतीनें त्याच्या गळयांत मिठी मारूं पाहते ! पण सगळी भ्रांतीच ती ! कुठचा शिव अन् कसलं काय ! हिनं त्या चंद्रमौलीचं चित्र काढलं आहे, त्याला ती थट्टेनं एकांतांत नेहमीं म्हणते,

( राग सोहनी, ताल गज्जल. )

' सर्व-गत तूं ' सुज्ञ वदती, कां न मग मज पाहसी ?
भजक-दुःखें हरिसि सारीं, पीडिसी कां दासिसी ? ॥ धृ० ॥
हृदयिं माझ्या प्राण-नाथा, मदन-हनना ! खेळसी
येइ येईं ! भेट देईं ! शांति वितरीं मज कशी ? ॥ १ ॥

तपाशिवाय शिवप्राप्तीचं दुसरं कांहीं साधन नाहीं असं पाहून आपल्या पित्याची आज्ञा घेऊन ही आम्हां सख्यांसह या तपोवनांत तपश्चर्या करण्याकरितां येऊन राहिली आहे. हिनें येथें स्वतां लावलेल्या व पाणी घातलेल्या लहान लहान झाडांना सुद्धां पल्लव, फुलं लाभलीं, पण इच्या तपश्चर्येला शिव-रूप फळ तर दूरच ! पण त्याचा मोहोर देखील अद्यापि दिसूं लागला नाहीं ! त्या देवदेवेश्वराला केव्हां बाई आमच्या बिचाऱ्या सखीची करुणा येईल ती येवो ! मुनिवर्या ही तपानें किती कृश झाली आहे पाहिली ना ? ( वरती आकाशाकडे पाहून व हात जोडून. )

( राग झिंजोटी, ताल गजल )

चंद्र-मौले ! सदय व्हावें शैल-कन्येवरि अतां ।
तिच्या नयनीं प्राण ठेले, तनू नष्टचि तत्त्वतां ॥ धृ० ॥
अंत अजुनी बघसि केसा, सखी सोडिल या जगा ।
वांचवाया हिला शंभो ! धांव वेगें धांव गा ॥ १ ॥

( पुन्हां मुनीला ) मुनिवर्या, आम्हांला हिची स्थिति पाहून पुष्कळदां रडं कोसळतं.पण हिला सुखी करण्याचं आमच्या हातांत कांहींच साधन नाहीं ! आम्ही त्या मृत्युंजयाची रोज रोज प्रार्थना करीत आहों कीं, बापा ! आमच्या सखीवर लवकर अनुग्रह कर. तरच तिचा प्राण वांचेल. त्या भगवंताला दया येईल तेव्हां खरी ! ( असें म्हणून डोळे पुसते. )

ज०—पार्वति! ही तुझी सखी सांगते आहे हें खरंच का ?

पा०—( स्फटिकमाला उजव्या हातांत घेऊन थोडा विचार केल्यासारखं दाखवून मोठ्या मर्यादेनें ) हे वेदसंपन्न मुनिवर्या ! होय. माझ्या सखीनें म्हटल्याप्रमाणें मी अत्युच्च स्थान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करीत आहें खरी; पण असल्या तपानं तें अचिंतनीय वैभव मला कुठून मिळणार ? पण इच्छेला काय ? वाटेल त्यानें वाटेल ती इच्छा करावी, तशांतलाच हा प्रकार आहे, दुसरं काय ?

ज०—आम्हांला तर तो महेश्वर चांगलाच ठाऊक आहे! त्याला वरण्याची इच्छा करितेस ! काय म्हणावं तुला ? किती तरी अमंगल तो ! ही गोष्ट मला तरी प्रशंसनीय वाटत नाहीं. तुझी इच्छा असल्या अयोग्य वरावर गेली याचंच मला नवल वाटतं आहे ! त्याच्या हातावर सर्प-कंकणं आहेत ! त्याचा स्पर्श तरी तुला सहन होईल काय ? कलहंस काढिलेला शालू व रक्तानें थबथबलेलं गजाजिन यांचा संयोग कधीं तरी आनंददायक वाटेल काय ? राजमहालांत पुष्पांच्या शय्येवर तूं लोळणारी, तुला केस विखुरलेल्या स्मशानभूमींत फिरण्याचा प्रसंग यावा काय ? तुझ्या शत्रूला तरी असला बीभत्स व करुण देखावा आवडेल का ? त्या पितृवनांत संचार करणाऱ्या त्र्यंबकानें तुला आलिंगन दिलं कीं तुझी चंदनाची उटी मात्र नाहींशी होईल व त्याचं चिताभस्म तुझ्या कोमल अंगाला व्यापून टाकील! यापेक्षां अधिक अप्रयोजक गोष्ट कोणती? बरं त्याच्याशीं तुझं लग्न झालं तर लग्नानंतर तुझी एक मोठीच कुचेष्टा होणार आहे ! तुला नेहमीं गजराजावर बसण्याची संवय. पण तुझी वरात नंदीबैलावर निघेल बरें ! तें पाहून शाहाणे लोक गालांतल्या गालांत हसतील ! या त्रिलोचनाच्या सहवासाच्या इच्छेमुळें या जगांत दोघींची मोठी अनुकंपनीय स्थिति झाली आहे. एक ती बिचारी चंद्रकला ! व दुसरी लोकांची नेत्रकौमुदी तूं ! हे बालमृगनयने ! या वरांत तूं पाहिलंस तरी काय ! रूप म्हणावं तर याला तीन डोळे! कुळ पाहावं तर याच्या आईबापांचा देखील पत्ता नाहीं !

संपत्ति म्हणावी तर ही स्वारी दिगंबर ! वरांतली एक तरी गोष्ट यांत आहे का ? सांग पाहूं. तेव्हां हा भलता विचार मनांत आणूं नकोस. तुझं लोकोत्तर सौंदर्य व वैभव कुणीकडे व तो कफल्लक, अमंगल व अकिंचन असा बैरागी कुणीकडे ! पिंपळावरचा मुंजा तो ! तुझ्यासारखी भुवनसुंदरी एकाद्या परम भाग्यशाली तरुणालाच मिळाली पाहिजे. नव्हे का ? पहा बोवा, विचार ! मला वाटलं तें स्पष्ट बोललों. आतां हें तुला न रुचलं—आणि तुझ्या मुद्रेवरून वाटतं कीं तें तुला आवडलं नसावं— पण खरं तें तुला सांगितलं. याची क्षमा कर.

**पा०**—( रागानें वक्र कटाक्ष फेंकून ) मुने ! तुला शिवाचं खरं स्वरूप कळलंच नाहीं; म्हणून तूं असं भाषण केलंस ? महात्म्यांचीं चरित्रं गूढ असतात. सामान्य लोकांस तीं कळत नाहींत. मूर्ख मात्र अशांची निंदा करितात. समजलास !

**ज०**—( स्वताशीं ) अरे ! हिनें मला तर मूर्खांच्याच कोटींत ढकललं एकदम ! ( उघड ) बरं; पुढें बोल तुला काय बोलावयाचं तें.

**पा०**— अरे ! ज्याला विपत्ति टाळावयाची आहे किंवा ऐश्वर्य संपादन करावयाचं आहे, तो मंगल वस्तूंच्या पाठीस लागतो. जो जगाचा रक्षण करणारा व स्वतां अगदीं निरिच्छ त्याला आशाळभूतांचीं मंगलं काय करावयाचीं ! तो अकिंचन असून संपन्न, त्रैलोक्यनाथ असून स्मशानवासी, रुद्र असून शिव ! त्या पिनाकपाणी भगवंताला खरं कोणीच ओळखत नाहीं, असं वाटतं ! अरे तो विश्वमूर्ति आहे. त्याच्या स्वरूपाची कल्पना काय होणार ? तो आभरणांनीं मंडित आहे, किंवा भुजंगांनीं वेष्टित आहे, अथवा गजाजिनानें आच्छादित आहे, वा दुकूल धारण करणारा आहे, किंवा कपालमाला घालणारा आहे, अथवा मस्तकावर इंदुकला मिरविणारा आहे, याचा काहीं नीट बोध होत नाहीं ! अमंगल चिताभस्म सुद्धां त्याच्या शरीराच्या स्पर्शानें पावन होतें व इतरांसही पवित्र करितें ! तांडव करीत असतां शिवाच्या अंगापासून खालीं भस्म पडतें, तें भस्म देव आपल्या रत्नकिरीटांवर भूषण म्हणून धारण करतात ! शिव बैलावर बसतो खरा. पण त्या बैलावर बसणाऱ्या शिवापुढें मदोन्मत्त ऐरावतावर बसणारा सुरेन्द्रसुद्धां नम्र होतो व त्याच्या चरणकमलावर आपला रत्नकिरीट वांकवून त्यावरील मंदार-पुष्पांनीं त्या महात्म्याचे पाय रंगवून सोडतो ! दोष देण्याच्या बुद्धीनें तूं शिवाविषयीं भाषण केलंस.

त्यांतली एक गोष्ट मात्र खरी आहे. पण त्याचं कारण असं. अरे ! जो विधात्याचा विधाता त्याचा विधाता न दिसल्यास त्याचा दोष कोणाकडे ? पण याचा वाद तरी कशाला ? तुझं म्हणणं आलं सगळं लक्षांत ! ( विजयेला ) अग विजये, याच्याकडे बघ एकदा !

( राग आडाणा, ताल त्रिताल )

विजये ! स्फुरत अधर जटिलाचा ।
कांहीं तरी हा बकेल बाई ! ॥ धृ० ॥
मंदमती हा निंदि शिवाला । बाटवि वाटे निज रसनेला ।
दुखवी माझ्या खिन्न मनाला । झडकरी याला हाकुनि देई !

थोरांची निंदा करणारा स्वतां तर पातकी असतोच; पण ती निंदा ऐकणारा देखील पातकाचा वांटेकरी होत असतो ! म्हणून म्हणत्यें, याला आतां बोलूं देऊं नकोस पुढं ! ( मुनीकडे पाहून ) काय ? तूं माझ्या प्रियतमाची आणखी निंदा करणार माझ्या तोंडावर ! तर मग मीच इथून जातें कशी ! ( असें म्हणून रागानें लाल होऊन झटक्यानें निघून जाऊं लागते. त्या गर्दींत तिचा पदर खालीं सरतो. हें पाहून शिव आपलं स्वरूप एकदम प्रकट करून भयचकित व कंपित पार्वतीला तिचा हात धरून )

शि०—प्रिये ! भिऊं नकोस, भिऊं नकोस ! हा शिव प्रसन्न आहे तुजवर !

( राग अडाणा, ताल, त्रिवट )

हिमाद्रि-कन्यके अये ! भिऊं नको. हा देखे मी प्रिय तव,
वद मजसि तव सकल हित सतत प्रियकर हा अहा ! ॥ धृ० ॥
तुजवरि बहु अजि मम अनुरागचि विलसत आहे,
हा शिव तव जीवित--नाथचि पहा ! ॥ १ ॥

पा०—( हंसून लज्जेनें व आनंदानें शिवाच्या चरणकमलास वंदन करून )
अहाहा ! ( राग भैरवी, ताल पंजाबी )

किति मी धन्य ! हिम-गिरि-सु-कन्या ॥ धृ० ॥
सकल जगाचा धनी, करी परमेश्वर प्रसादा,
मजसारखी नच दिसत जनिं अन्या ॥ १ ॥

( जातात. पडदा पडतो. )

**चवथा अंक समाप्त.**

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

( स्थल—शिवाचा आश्रम; पात्रें–शिव, वसिष्ठ व अरुंधती )

शि०—( हातांत पत्र धरून व त्याकडे पाहून स्वगत ) हें पत्र पार्वतीनें विजयेबरोबर मला पाठविलें आहे. यांत काय लिहिलं आहे पाहूं या. [ पत्र उघडून ] अरे ! हें पत्र पद्यात्मक दिसतं आहे. वाचूं तर या. ( वाचतो )

( राग भैरवी, ताल त्रिवट )

सखया ! प्राणविसाव्या ! ईशा !
कोणि तरी धाडूनि झडकरी कन्या याचिं गिरीशा ! ॥ धृ० ॥
कन्याभिक्षा शिष्टाचाराचि, पाळीं तो हृदयेशा ! ॥१॥

यांतील रचना जितकी मनोहर तितकीच यांतील कल्पनाही सुंदर व गोड आहे. माझ्या संबंधानें बाबांकडे मागणी घालण्याकरितां कोणी तरी धाडण्याची कृपा करा, असा याचा भावार्थ आहे. हें प्रियेचं म्हणणं अगदीं योग्य आहे. यावरून तिची मर्यादा, शिष्टाचार व पितृभक्ति हे गुण स्पष्ट दिसून येतात. यामुळें माझा पार्वतीविषयींचा ग्रह अधिकच अनुकूल झाला आहे. पण मी तर एकटा पडलों ! लग्नकार्याला कांहीं शिष्ट आप्तेष्ट पाहिजेत. मी स्वतां कन्येची याचना करणं तितकं बरं दिसणार नाहीं. तेव्हां हें काम कोणा तरी संभावित वडील माणसांकडे सोपवलं पाहिजे. कोणाला बरं हें काम सांगावं ? ( थोडा विचार करून ) या कामाला आर्या अरुंधती व सप्तर्षींपैकीं वसिष्ठमुनि हेच योग्य होत. बरं तर त्यांचं ध्यान करून त्यांस बोलावतों. ( ध्यानस्थ बसतो. दारावर शृंगी उभा राहतो. आकाशाकडं पाहून )

शृं०—हें काय बरं अंतरिक्षामध्यें विमानासारखं चमकतं आहे ? अरे ! आलंच जवळ ! ओहो ! हे तर भगवान् वसिष्ठमुनि ! आणि ती पहा भगवती आर्या अरुंधती ! अहाहा, काय यांचं तपाचं तेज हें ! [ इतक्यांत अरुंधतीसह वसिष्ठ रंगभूमीवर प्रवेश करितात. शृंगी त्या उभयतांस वंदन करून ] महाराज ! आपल्या आगमनाची वार्ता भगवान् चंद्रमौळींच्या कानावर घालून येतों.

**व**०—ठीक आहे. आम्ही येथेंच तुझी वाट पहातों. ( शृंगी जातो )

**अ**०—हा प्रदेश किती तरी शांत, पवित्र व रम्य आहे ! तपश्चर्येला ही भूमी अगदीं योग्य आहे.

**व**०—म्हणून तर भगवान् शिवांनीं हिच्यावर वसतीचा अनुग्रह केला.

**अ**०—आपण एवढ्या लांबून आलों, पण येथें आल्याबरोबर सगळा शीण एका क्षणांत दूर झाला बाई !

**व**०—आतां चंद्रमौलीचं दर्शन झालं म्हणजे कृतार्थ झालों ! ( शृंगी येऊन वसिष्ठांस )

**शृं**०—मुनिवर्या ! आपणा उभयतांस आंत घेऊन येण्याविषयीं भगवान् शंकरांची आज्ञा झाली आहे. तर चलावयाचं तिकडे माझ्या मागून. मुनिवर्य ! हें असं इकडे यावयाचं, आर्ये अरुंधति ! असं इकडून ! ( असें म्हणून पुढें शृंगी व मागून अरुंधती व वसिष्ठ जाऊं लागतात. थोडं पुढें गेल्यावर ) महाराज ! ते पहा भगवान् महेश्वर ! आपण उभयतां पुढें व्हावं आतां. ( दंपती शिवापुढें जातात व )

**व**०—( नम्र होऊन ) ओं विश्वेश्वराय नमः, त्र्यंबकाय नमः, महेश्वराय नमः, चंद्रशेखराय नमः, मृत्युंजयाय नमः, मदनान्तकाय नमः, त्रिपुरमथनाय नमः ।

**अ**०—( हात जोडून ) त्रिभुवनवंद्य शिवाला या अरुंधतीचा नमस्कार आहे.

**शिव**–( उत्थापन देऊन ) आर्यें अरुंधती ! हा शिव वंदन करितो. हें आसन, यावर बसावें. मुनिवर्या ! हा शिव आपणांस प्रणामांजलि अर्पण करीत आहे. हें आसन अलंकृत करावें आपण. ( तिघेही आसनांवर बसतात. )

**व**०—महाराज ! आपल्या दर्शनानं आम्ही पुनीत झालों. आज आमच्या वेदाध्ययनाची सफलता झाली, यज्ञाची परिपूर्ती झाली, तपाचं फल पदरांत पडलं ! आज आमचं स्मरण आपणांस झालं हें आमचं मोठं भाग्य ! आपल्या स्वरूपाचं दर्शन महान् महान् मुनींना देखील दुर्लभ, चंद्रसूर्यांच्या वरच्या प्रदेशांत आम्ही राहतों; पण आज आपण केलेल्या अनुग्रहामुळें आम्हांस उच्चतरस्थान लाभलं असं आम्ही समजतों. आपण सर्वान्तर्यामी व सर्वसाक्षी आहां. आपल्या दर्शनानं आज आम्हांस केवढा आनंद झाला आहे व आमचा केवढा बहुमान झाला आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं ! तत्त्वतः आपलं ज्ञान होणें शक्य नाहीं. जें आपलं रूप दिसतं तें सृष्टि, स्थिति व संहार यांपैकीं कोणतं कार्य

करितें याचा निश्चय होत नाहीं. असो; हा विषय गूढ आहे व अप्रस्तुतही आहे. बरं, आपण आज आमच्यावर चिंतनाचा अनुग्रह किमर्थ केला ?

**शि०**—( हंसून ) मी कोणतीही गोष्ट स्वार्थाकरितां करीत नाहीं हें आपणांस विदित आहेच.

**व०**—आपल्या अष्टमूर्ति स्वरूपावरूनच हें सिद्ध होत आहे.

**शि०**—तारकासुरानें देवादिकांना फार पीडा दिली आहे.

**व०**—ही गोष्ट आम्हांस श्रुत झाली आहे.

**शि०**—तेव्हां त्यांनीं माझी प्रार्थना केली कीं, तारकासुराच्या वधाकरितां आपण पुत्रवान् झालं पाहिजे.

**व०**—आपल्याशिवाय असल्या संकटांत त्यांचं त्राण कोण करणार ?

**शि०**—तेव्हां मीं त्यांना ' हो ' म्हटलं. आतां हिमवानाची कन्या पार्वती हिच्याशीं विवाह करण्याचा विचार आहे.

**व०**—हा त्रिभुवनावर मोठा उपकारच होणार आहे.

**शि०**—म्हणून आपल्याला थोडी तसदी देण्याचं मनांत आणिलं आहे.

**व०**—तें कसं ?

**शि०**—आपण आमच्याकरितां हिमवानाजवळ त्याची कन्या पार्वती हिच्यासंबंधानें मागणी करावी, अशी माझी आपणांस प्रार्थना आहे.

**व०**—हा तर आमच्यावर अनुग्रहच झाला असं आम्ही समजतों ! त्रैलोक्याच्या जननीच्या व जनकाच्या या अलौकिक मंगलकृत्याची घटना आमच्यासारख्या मध्यस्थांकडे यावी हें आमचं मोठंच भाग्य आहे. हा कार्यभाग आम्ही अवश्य त्वरित करून येतों.

**शि०**—आपल्यासारख्या शिष्टांनीं घडवून आणिलेले संबंध सर्वथा कल्याणकारकच होतात. ठीक आहे. यावें. आर्ये अरुन्धति ! आपला या कार्यांत मोठाच उपयोग आहे. लग्नासारख्या कार्यांत आपल्यासारख्या प्रौढ कुलस्त्रियांनींच पुढाकार घ्यावयाचा असतो. आमचं हें कार्य आपल्या घरचं आहे हो ! आपणच पार पाडावयाचं आहे. बरें आहे. मुनिवर्या ! यावं. मी या महाकोशी नदीच्या प्रपाताजवळच्या आश्रमांत आहें. येथें मला परत येऊन भेटावयाचं.

अ०—जगज्जननी अंबिका आपली पत्नी होवो व जगन्मंगल करो !

व०-बरें आहे. कृतकार्य होऊन आम्ही इकडेसच परत येतों.

शि०-शिवा वः पन्थानः सन्तु. ( जातात. पडदा पडतो. )

———

## प्रवेश दुसरा.

( स्थल—मणिप्रासाद. पात्रें—हिमवान्, मेना व पार्वती. )

हि०—भगवान् चंद्रशेखर प्रसन्न झाला, यामुळें आपल्या पार्वतीचं तप सफल झालं ! प्रिये ! सत्पुरुषांची वाणी कधीं तरी खोटी ठरते का ? नारदांचं वचन म्हणजे केवळ वेदवाक्य ! घे आतां अनुभव प्रत्यक्ष. तुझं मन मध्येंच गडबडलं होतं ! पण माझा मुनिवचनावर पूर्ण विश्वास होता. पार्वतीला तपाचे अति क्लेश झाले खरे. पण त्याचं फल खचित मिळेल असा माझा विश्वास होता व म्हणूनच मीं त्याला अनुमति दिली. नाहीं तर माझ्या लाडक्या ताईला असं खडतर मुनिव्रत मीं कसं करूं दिलं असतं ?

मे०—परमेश्वराचीच कृपा ही ! पण माझी बाळी माझ्यापासून लवकरच दूर होणार याचीच मला आतांपासून काळजी वाटूं लागली आहे बाई !

हि०-हा संसारांतला क्रमच आहे !

मे० —पण पार्वतीला मागणी अजून कुठं आली आहे ? इकुडला तर निश्चय आहे कीं मुलीला तिच्या बापाकडे मागणं घातलं पाहिजे म्हणून !

हि०—मग ! तें माझं म्हणणं कायमच आहे.

मे०—म्हणजे ! आणि मागणं न आलं तर ! आणि आहे कोण तिकडं मागणं करावयाला ? वरानें कां तें स्वतां करावयाचं ?

हि०-( थट्टेनें ) त्याला काय हरकत आहे ?

मे०—इश्श मेलं. भलतंच काय तें बोलायचं ! असं कुठं ऐकलयं तरी का ?

हि०—थोडं थांब प्रिये ! मोठ्यांच्या गोष्टी मोठ्याच असतात. सर्व कांहीं होईल. त्यांत कांहीं चूक व्हावयाची नाहीं. वर-पक्षाला वऱ्हाडी फार मोठे यावयाचे आहेत हो ! लग्न मोठं थाटाचं होणार यांत संशय नाहीं !

मे०—आपणच दोन्ही पक्षांचं करावयाचं, हेंच कीं नाहीं !

हि०—छे ! छे ! आपलं वेगळं, त्याचं वेगळं ! अगदीं पृथक् पृथक् ; आणि सगळे सोहळे यथास्थित व्हावयाचे आहेत. तुमची बायकांची तक्रार कांहीं एक ठेवावयाची नाहीं; अशी माझी इच्छा आहे.

मे०—( खुष होऊन ) इकडून बोलायचं पुष्कळ होतं आहे ! पण दिसेलच काय तें आतां ! पण मी म्हणत्यें तिकडं वरमाय कोण होणार ?

हि०—एकच वरमाय काय विचारतेस ? वरमाया विचार कीं !

मे०—हिकडचं आपलं सर्वच कांहीं विलक्षण ! मला वाटतं हें सगळं थट्टेनंच चाललं आहे बोलणं !

हि०—अगदीं नाहीं. आर्या अरुंधती व सप्त देवमातृका या विहिणी !

मे०—अग्ग बाई ! आणि याच तोलाच्या इतर वऱ्हाडणी असतील !

हि०—अर्थात्. लक्ष्मी, सरस्वती, शची असल्या त्यांच्या वऱ्हाडणी ! काय समजलीस ? तुला वाटतं आपल्या तोडीचं कुणीच नाहीं तिकडे !

मे० - इकडं सगळी तिकडली त्रित्तम बातमी दिसते आहे ! माझ्यापासून बरी इतका वेळ चोरून ठेवली ! कमाल आहे बाई पुरुषांची ! पण बाई, इतक्या विहिणी येणार आणि माझ्या जन्माची हौस पुरणार यामुळें मला किती तरी हुरूप आला ! माझ्या बाळीकडे आतां पहावयाला नको. बरं पण व्याही व दुसरे वऱ्हाडी कोण ?

हि०—अग तेही जगद्वंद्य आहेत ! स्वतां प्रजापती ब्रह्मदेव, भगवान् शेष-शायी विष्णु, सहस्रनेत्र देवेंद्र, सप्तर्षि इत्यादि फारच मोठीं प्रस्थं आहेत !

मे०—मग उभयतांना आनंददायकच हें मंगल होणार तर !

हि०—या मंगलाला जगतांत दुसरी तोड मिळणार नाहीं.

मे०—भाग्य माझ्या बाळीच !

हि० – ताई ! तुला डागिन्याची मोठी हौस असेल नाहीं !

पा०—( लाजून ) एक मोठा अलंकार पाहिला, त्यापुढं इतरांची काय किंमत ?

हि०—शाबास ताई ! पण तुझ्या आईचा काय अभिप्राय पडतो तो पाहूं. मेनेकडे वळून ) ताईचं बोलणं ऐकलं का ? आपलं कसं काय मत आहे ह्मटलं !

मे०— योग्य वराला योग्य वधू मिळाली आहे बाई ! सगळं तिकुडच्चंच वळण दिसतं आहे! हेंही बरेंच आहे ! तिला जन्म काढावयाचा आहे तिथे-तेथल्याप्रमाणं झालं, म्हणजे झालं; दुसरं काय ?

हि० – प्रिये ! तुला या बाबतींत शंका नको ! सगळीं ऐश्वर्यं ताईच्या पुढें हात जोडून उभीं राहतील ! आणि आपण तर तिला अलंकृत करूनच वराला अर्पण करणार आहों ! हें नाहीं का तुझ्या लक्ष्यांत ?

मे०—हो खरंच ! पण म्हटलं शकनाचं सासुरवाडचं कांहींच कां नसावं ?

हि०—पुन्हां तेंच ! ताईला आभरणांखालीं वांकावं लागेल वांकावं ? मग तूंच म्हणशील मुलीला त्रास होतो, जरा तिचं ओझं हलकं करा म्हणून !

मे०—( आनंदानें ) बरं, दिसेलच काय तें ! ( इतक्यांत द्वारपाल येतो. )

द्वारपाल–महाराज ! भगवान् वसिष्ठ व आर्या अरुंधती आले आहेत. ( सगळे विस्मयानें व आनंदानें सामोरे जातात व वंदन करून त्यांस स्वागतपूर्वक आंत आणितात व त्यांस उच्च आसनांवर बसवून आपणही आसनांवर बसतात. )

हि०—महाराज ! मेघावांचून पर्जन्यवृष्टि किंवा फुलावांचून फलोत्पत्ति तसं आपलं आकस्मिक दर्शन आहे ! आपल्या अनुग्रहानें भूमीवरून स्वर्गाला गेल्याचा मला भास होत आहे ! आपल्या आगमनानें हा प्रदेश पवित्र झाला. मी दोन गोष्टींनीं पुनीत झालों. गंगेचा ओघ माझ्या मस्तकावर पडतो त्यामुळें मी पूर्वींच पावन झालेलों आहें. आज आपल्या चरणतीर्थाचा प्रसाद मिळाला त्यामुळें-ही पावन होण्याचा पुनरपि प्रसंग आलेला आहे ! आपल्या दर्शनानं झालेला आनंद एवढा मोठा आहे कीं, त्याला मावण्याला हा माझा अत्यंत विशाल देह-सुद्धां अगदीं अपुरा आहे. अहो तेजस्वि मुनिवर्य, आपल्या आगमनानें माझ्या गुहांतील तमच केवळ नष्ट झालं आहे असें नाहीं ! तर रजापलीकडे असणारं मानसिक तमःपटलही दूर झालं आहे ! आपणांकरितां मी तें काय करणार ह्मण ! कारण,आपणांस दुष्प्राप्य अशी वस्तूच नाहीं. मजवर अनुग्रह करण्याकरितां आपण येथें आलां, यांत कांहीं संशय नाहीं. तथापि, या दासाला कांहीं आज्ञा करणं असल्यास ती अवश्य करावी. प्रभूंनीं दासाला आज्ञा करणं ह्मणजे त्यावर अन-ग्रहच करणं होय. हा मी हिमवान्, ही माझी सहधर्मचारिणी भार्या मेना व ही माझी कुलप्रतिष्ठा कन्या पार्वती. यांतून कोणासही आपण सेवेला पात्र करावें.

व०– राजा, तूं जें बोललास तें योग्यच आहे. तुझ्या शिखरासारखं तुझं मनही उंच आहे, यांत संशय नाहीं. तुझ्या कीर्तिप्रमाणें तुझ्यापासून दिगंताला जाणाऱ्या नद्याही अखंड असून त्रैलोक्याला पुनीत करीत आहेत. परम पावन भागीरथी गंगा हिला विष्णुपदाप्रमाणं तुझा विमल प्रदेशही जन्मस्थानासारखा

प्रिय व आदरणीय वाटतो. भगवान् वामनानें मोठ्या प्रयत्नानें तीन पदांनीं त्रिभुवन आक्रमिण्याचा यत्न केला, तेव्हां तो सिद्ध झाला. तूं तर साहजिकपणेंच त्रिविक्रमाचं कार्य केलं आहेस ! तूं कठोरपणा बाह्य स्वरूपाला देऊन टाकिला आहेस, व अंतरंगामध्यें सज्जनाला प्रिय असा नितांत मृदुपणा स्वीकारिला आहेस. यज्ञामध्यें हविर्भागाचा मान तुला मिळाल्यामुळें मेरूचं तुंग शिखर तुझ्या पायाशीं नम्र झाल्यासारखं दिसत आहे ! अस्तु. आमचं काम आतां सांगतों, ऐक राजा. ज्यानें मस्तकावर अर्धचंद्र धारण केला आहे, ज्याला ईश्वर म्हणतात, जो अष्टमूर्ति म्हणून प्रसिद्ध आहे, ज्याचं योगी ध्यान करितात, ज्याचं स्थान प्राप्त झालं कीं जन्ममरणाचे फेरे टळतात, जो सगळ्या विश्वाच्या कर्माचा साक्षी, जो परम उदार व वरद, तो भगवान् शिव तुला विदित आहेच !

**हिमवान्**— ( हात जोडून ) हें काय विचारावं मुनिवर्या ?

**व०**—त्यानें आम्हांला तुझ्याकडे तुझी कन्या मागण्या-करितां पाठविलं आहे. वाणीशीं ज्या प्रमाणें अर्थाचा, त्या प्रमाणें तुझ्या कन्येशीं त्याचा, योग होणं उचित आहे. चांगल्या वराच्या पदरांत मुलगी पडली म्हणजे पित्याला कांहीं काळजी वाटत नाहीं. सर्व स्थावर जंगम पदार्थ पार्वतीला मातृस्थानीं समजोत ! कारण शिव हा विश्वाचा पिता आहे. ईश्वराचा प्रसाद झाल्यावर हिला वंदन करणाऱ्या देवांच्या मुकुटांतील रत्नप्रभांच्या पंक्ति हिच्या चरणकमलावर विराजमान होतील.

( साकी, राग जोगी, ता. धुमाळी )

उमा वधू, तूं असशी दाता, याचक आम्ही शैला !
शंभु असे वर; योग थोर तव अभ्युदयाचा आला,
साधीं हा आर्या ! । होवो कन्या शिवभार्या ॥ १ ॥

**हिमवान्**—( नम्र होऊन ) आपण म्हणतां तें खरं. ( आनंदोत्फुल्ल नयनांनीं मेनेस ) कां प्रिये ! तुला कसं काय वाटतं ? कन्येच्या कामांत त्यांच्या मातांचा विचार अवश्य घेतला पाहिजे. म्हणून विचारतों तुझा काय अभिप्राय आहे?

**मे०**—( विनयानें ) इकडच्या इच्छेबाहेर मी कधीं असतें काय ?

**हि०**—( स्वगत ) पत्नीही अनुकूलच आहे. आतां या मुनींना रुकार द्यावा व कन्येविषयीं वाङ्निश्चय करावा. ( उघड ) बाई पार्वती ! ये बाळे, अशी इकडे !

विश्वात्मा भगवान् शिव याच्या पदरांत तुला घातली आहे. तुला मागणी घालावयाला प्रत्यक्ष वसिष्ठ व आर्या अरुन्धती हे आले आहेत. केवढं हें तुझें भाग्य ! माझाही गृहस्थाश्रम आज सफल झाला म्हणावयाचा! ( मुनींना ) मुनिवर्या ! ही माझी कन्या पार्वती शिवाची भावी वधू या नात्यानें आपणांस वंदन करीत आहे.

**व०**—अम्बिके ! सर्व मंगलें तुला प्राप्त होवोत !

**अरुन्धती०**—( पार्वतीला ) ये बाळे ! अशी मांडिवर बैस. ( असं म्हणून तिला अंकावर बसविते व तिच्या गालाला हात लावून ) मोठी भाग्यवान् हो मुलगी ! त्रैलोक्यपतीची राणी होणार ना तूं आतां ! ( पार्वती लाजते )

**मे०**—( डोळे पुशीत आणि स्फुंदत )

( 'इडु इडु इडु नारायणा'—ही चाल )

पदरीं घ्या बाई ! आप्तची दुहिता आजी ॥ ध्रु ॥
तात तुम्ही माताहि तिला । थोर आसरा कीं गाला।
काळजी नुरे लव मजला । सांभाळा लाडकी माझी ॥ १ ॥

( रडूं लागते )

**अ०**—( स्वगत ) मातेचंच हृदय हें ! आणि त्यांतून मुलगी एकुलती एक, फार गुणाची व लाडकी. म्हणून ही मेना दुःखानं अगदीं वेडी झाल्यासारखी दिसते. हिचं समाधान केलं पाहिजे. ( उघड मेनेला ) मेनाबाई ! असं डोळ्याला पाणी नका हो आणूं. अहो ! अशा मंगल प्रसंगीं रुदन योग्य नव्हे. वराचे गुण ऋषिवर्यांनीं आतांच सांगितले ना ? अहो बाई, खरोखर असा वर मिळणं फार दुर्लभ ! पण तुमच्या भाग्यानें व मुलीच्या नशीबानें तो लाभला ! तुम्हीं कांहीं काळजी करूं नका, व दुःखी होऊं नका. अहो ! मुली सासरीं जाण्याचे हे प्रसंग मीं किती तरी अनुभविले आहेत ! तुमचा हा पहिलाच प्रसंग म्हणून तुह्मांस फार अवघड वाटत आहे; आणि तें साहजिकच आहे ! पण बाई ! अशा वेळीं मन अगदीं घट्ट करावं लागतं हो ! मी स्वानुभवानें हें सांगत्यें ! हा जांवई मृत्युंजय आहे; व तुमच्या कन्येशिवाय इतर स्त्रिया त्यास मातृस्थानीं आहेत ! समजलांत ? ही महा भाग्यशालिनी कन्या संसार थाटून बसली म्हणजे तुमच्या आनंदास पारावार नाहीं असं होईल, असं खचित समजा.

**मे०**—( डोळे पुशीत ) आपल्या आशीर्वादानं असंच होवो !

हि०—( औत्सुक्यानें ) मुनिवर्य ! वाङ्निश्चय झाला. पण विवाहाला मुहूर्त कधीं आहे ?

अं०—अरे ! अगदीं जवळ ! आजपासून तीनच दिवसांनीं ! शुभंच शीघ्रंच. आतां पुढला कार्यभाग पाहिला पाहिजे.

हि०—अवश्य. आम्हीही तयारीला लागतों.

व०—खुशाल !

अ०—येतों हो ! या मध्यस्थीमुळें आम्हीही तुमचे संबंधीच झालों. आतां पुन्हां लवकरच भेटी होतील.

मे०—आपल्या ओटींतच मुलीला घातली आहे. आतां परकेपणा कुठें राहिला आहे! ( कुंकू लावते ) ( राजा, राणी व पार्वती वसिष्ठ व अरुंधती यांस नमस्कार करितात. सर्व जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

( स्थल-ओषधिप्रस्थ, यज्ञेश्वरदीक्षितांचें घर; पात्रें-यज्ञेश्वरदीक्षित व कपिलाचार्य दीक्षित तपकिरीचा बार भरून व आचार्य जेठा मारून बैठकीवर बसले आहेत. )

**दीक्षित**—का आचार्य ! लग्नाचा बार कसा काय उडाला ?

**आचार्य**—' न भूतो न भविष्यति ! ' अशांतलं तें प्रकरण !

दी०—माझ्या आठवणींत तर हें पहिलंच टोलेजंग लग्न बुवा ! युवराजाचं लग्न देखील कांहीं कमी थाटाचं झालं अशांतला प्रकार नाहीं. पण राजकन्येच्या विवाहाचा प्रसंग कांहीं औरच ! बाकी भुवनसुंदरी आणि युवराज मैनाक यांचा जोडा अगदीं दृष्ट लागण्यासारखा आहे हो !

आ०—यांत काय संशय ! या मोठ्या लग्नांबरोबर विजया व विजयसेन यांचंही लग्न अनायासं उरकून गेलं.

दी०—ही आपली गाड्याबरोबर नळयाला यात्रा ! पण तुम्हांला सांगतों, कल्याण झालं बिचारीचं.

आ०—राणीसाहेबांचं विजयेवर मोठं प्रेम; आणि त्यामुळेंच हा योग आला असं ह्मगतात.

दी०—राणीसाहेब खरोखरच फार थोर आहेत.

आ०—दीक्षित ! तें राहूं द्या. ( विस्मरण झाल्यासारखं दाखवून ) तुमचं देव बरं करो. काय बरं तुह्यांला विचारणार होतों पहा ! ( आठवण होऊन ) हं हं ! म्हटलं.गेला सबंध महिना तुमच्या घरांत चुलीला अक्षत असेल सारखी !

दी०—काय वेड आहे आचार्य ! अहो आजच पुरा दीड महिना झाला ! पक्कान्नाचं नांव घेतलं कीं शिसारी येते एकदम्! आज निव्वळ बेसन—भाकरीचा बेत आहे !

आ०—माझंही तसंच झालं आहे बुवा ! पण म्हटलं, दीक्षित ! बिदागीचं कसं काय झालं एकंदरींत ?

दी०—अहो ! बिदागीचं काय विचारतां ? नुसती दक्षिणाच मूर्तिमंत बत्तीस हजार मुद्रा जमली ! त्याशिवाय सोन्याचांदीचीं भांडींकुंडीं, धोतरजोडे, शाली, पागोटीं ही संभावना ! आचार्य ! तुमचं कसं काय ? मथुरेच्या पंडितांपैकीं तुमचंच नांव मोठ्या दक्षिणेच्या यादींत होतं.

आ०—( प्रसन्न मुद्रेनें ) मलाही एकंदर नऊ हजार मुद्रा मिळाल्या. शिवाय महावस्त्रं !

दी०—योग्य संभावना झाली ! मोठ्या संतोषाची गोष्ट आहे. बरं आचार्य, तुमचं कुटुंब गत झाल्याचं माझ्या कानावर आलं आहे. मग म्हणतों, आतां हातांत चार पैसे आहेत तर लग्न उरकून घ्या एकदांचं !

आ०—कुटुंब जाऊन बरींच वर्षं लोटलीं. एक मुलगा आहे बावीस वर्षांचा. त्याचंच लग्न करून देऊन मोकळं व्हावं म्हणतों.

दी० – आचार्य ! तुम्ही विद्वान् खरे. पण—माफ करा स्पष्ट बोलतों याबद्दल—तुम्हांला व्यवहार कांडीचा नाहीं ! येथेंच तर सगळं चुकतं! माझ्याकडे पहा ! आज तीन बायका करून बसलों. यामुळें किती तरी सोय व केवढा तरी फायदा झाला !

आ०—काय ! तीन बायका आणि त्या विद्यमान ! आपला तृतीय संबंध झाल्याचं मात्र ऐकलं होतं !

दी० —होय तीन केल्या व तिन्ही हयात आहेत ! काय समजलांत ? पहिलीला मूल होईना म्हणून दुसरी केली, दुसरीचं वांचेना म्हणून तिसरी करावी लागली ! या दूरदर्शीपणामुळें घरांतल्या अडचणी नाहींशा झाल्या हें तर खरंच, पण या घनचक्कर लग्नांत तिप्पट लाभ झाला ! आलं का लक्षांत ! घरांत लुगडीं, खण, नारळ यांच्या राशींच्या राशी पडल्या आहेत ! तीन बायकांना घर आवरेनासं झालं आहे. हें सगळं सामान विकून टक्के करून टाकणार आहें लवकरच.

आ०—तीन बायका वागविणं म्हणजे मोठं कठीणच काम आहे, नव्हे का ?

दी०—तुम्ही हें नुसतं ऐकूनच घाबरलां वाटतं ! अहो ! मला त्यांत कांहींच वाटत नाहीं. पहिली बायको किती अस्ताप होती म्हणून सांगूं ! दुसरी देखील कांहीं नांव ठेवण्यासारखी नाहीं म्हणा. पण तिसरं प्रकरण जरा, ( इकडे तिकडे कोणी नाहीं असं पाहून) जरा कां? शुद्ध ढालगज-भवानी आहे,ढालगज-भवानी ! मी म्हणून पुरून उरलों आहें, इतकंच !

( इतक्यांत तिसरी बायको एकदम प्रवेश करून )

रंगूबाई—( दीक्षितांना ) काय हो ! ढालगजभवानी ! ढालगजभवानी कोणाला म्हणतां ? मी ढालगजभवानी होय !

दी०—( घाबरून ) छे ! छे ! तुला नाहीं म्हटलं ढालगजभवानी !

आ०—( आपल्याशीं ) हें तरुणी-वृद्धांचं नाटक फुकट पाहण्याचा हा सुयोग अनायासें मिळाला !

रंगू०—आणि शिवाय ' तुला आणि मला ' असं एकेरी भाषण ! आणि तेंही तिन्हाइतादेखत ! हें मला मुळींच खपायचं नाहीं हो !

आ०—( स्वगत ) मलाही कांहीं प्रसाद मिळणार वाटतं !

दी०—अहो चुकलों ! तुम्हांला नाहीं म्हटलं ढालगजभवानी! तरी चुकलंच! म्हटलं, आपणांला नाहीं म्हटलं ढालगजभवानी ! आतां तर झालं ना समाधान !

रंगू०—मग चवथी आणखी ढालगजभवानी कुणी तयार केली आहे वाटतं!

दी०—अहो हे आचार्य बसले आहेत यांची तरी कांहीं मर्यादा ठेवा !

रंगू०—अहाहा ! काय मर्यादेचे डौल ! म्हणे त्यांची मर्यादा ठेवा ! आणि त्यांच्या देखत माझी मर्यादा केवढी पण ठेवली !

आचार्य—( जेठा सोडून डोक्यावर पागोटें चढवूं लागतात व पुटपुटतात ) आतां येथें बसण्यांत शोभा नाहीं ! तडक चालतं व्हावं हें उत्तम !

दी०—अहो आचार्य ! भिऊं नका असं. बसा कीं अंमळ. ( रंगूबाईला ) बाई जगदंबे ! हात जोडतों मी तुला ! माझी अब्रू चव्हाट्यावर जाऊं देऊं नको ! आणि यांच्या पुढंही उघडी करूं नको !

रंगू०—वा! केवढी तरी अब्रूची चाड ! असेल मेली तर जाइल ना चव्हाट्यावर !

दी०—( स्वगत ) हिचं तोंड बंद करावयाला एकच उपाय आहे. हिला असं विचारावं ( उघड ) अग, तो मुकुंदशेट सोनार चंद्रहार, मोत्यांचं पेंड, व

कमरपट्टा घेऊन आला होता. त्याचं काय झालं ?

आ०—( स्वगत ) तोंडाचा-पट्टा व कमरपट्टा यांत कोण जिंकतो तें पहावं !

रंगू०—त्याचं काय व्हायचं आहे ! हा पट्टा चंद्रहार—माझ्या गळ्यांत ! हा कमरपट्टा कमरेला पट्टा ! हें मोत्यांचं पेंडं ! दुसरं राहोच सगळं मेलं ! डोळे देखील असून नसून सारखेच ! डोळस नवऱ्याला अशी नटलेली बायको पाहून किती तरी कौतुक वाटलं असतं बाई ! पण इथं मेलं कध्धीं कध्धीं कश्शाचंच चुकून देखील कौतुक नाहीं !

दी०—तुम्हां तिघींकरितां ते डागिने मागविले होते ! बरं का !

रंगू०—तिघींचा संबंध काय डागिन्यांशीं ! माझं एकटीचंच लग्न डागिन्याशीं लागलं आहे ! त्यांवर माझाच हक्क. डागिने सगळे माझे. त्या जुन्या केरसुण्यांचा त्यांवर काय हक्क आहे ! तुमचं केसाळ अंग व दाढी-मिशांचं रान झाडण्याचं काम त्या केरसुण्यांचं आहे ! म्हणे त्यांनाही डागिने द्या ! काय कौतुक ! त्यांच्या बापानीं ठेवले आहेत डागिने ! केवढं त्या थेरड्यांविषयीं प्रेम ! नुसतं रस्त्यांतल्या मोऱ्यांतून वाहात जातं आहे सारखं ! पुन्हां त्यांना डागिने देण्याची गोष्ट काढली तर खबरदार ! माझं खेटर अडलं आहे त्या दिवट्यांना दागिने द्यावयाला ! पण, अहो ! परवांचं तें वचन विसरलांत वाटतं ! डोळ्यांप्रमाणें स्मरणानेंही आपली रजा घेतली असं दिसतं !

दी० - कसलं वचन ?

रंगू०— मीं म्हटलंच, कानावर हात ठेवणं होईल म्हणुन ! तुला हिऱ्याचीं कांकणं देईन असं परवां म्हणालां होतां कीं नाहीं ? बोला, बोला एकदांचं, असं म्हणालां कीं नाहीं !

दी०—( स्वगत ) आतां हिचं म्हणणं एकदम कबूल करावं, म्हणजे हिच्या हातून सुटका होईल. ( उघड ) होय, कबूल, एकदम कबूल.

रंगू०—नुसतीं कोरडीं वचनं नको आहेत ! आज संध्याकाळीं मला जायचं आहे राजवाड्यांत हळदीकुंकवाला. ( जवळ जाऊन मोठ्यानें ) आलं कां लक्षांत! मी कांकणांशिवाय हालणार नाहीं येथून!अश्शी बसेन इथे! कोणाची कांहीं भीति नाहीं ! ( जवळ जाऊन खेटूं पाहते ).

दी०—( दचकून मागें सरून भीतीनें ) अग्ग अग्ग अग्ग ! जनाची नाहीं

तर मनाची तरी बाळग थोडी ! तुझ्या मागोमाग मी कांकणं पाठवून देतों त्या मुकुंदशेटांकडून मागवून. मग तर झालं ना ?

**रंगू०**—पुन्हां 'अग्ग अग्ग !' असं एकेरी भाषण! इतक्यांत बजावलं ना? असं एकेरी बोलणं खपायचं नाहीं म्हणून ! आणि शिवाय माझी लाज काढतां ? माझी लाज वेशीवर बांधली आहे! समजलांत ? तुमची गुंडाळलेली थोडी बाहेर काढा ह्मणजे झालं !

**दी०**—( हात जोडून ) चुकलों ! चुकलों ! दुरुस्ती करितों. आपलीं कांकणें आपल्या मागोमाग आपल्या हातांत घालण्याकरितां आपल्याकडे हा आपला दास पाठवीत आहे, बाईसाहेब !

**रंगू०**—( खुषींत येऊन ) कां ? आतां कस्सं सरळ व गोड बोलणं झालं ! ढालगज–भवानीचा हा केवढा पराक्रम आहे, पाहिलात ना ! ढालगज–भवानी ! ढालगज–भवानी ! ढालगज-भवानी ! ( हंसत हंसत अंगविक्षेप करीत जाते )

**आ०**—( स्वगत ) कमरपट्ट्यानें व कांकणानीं लढाई जिंकली ! दीक्षितांचा पराक्रम थंडा पडला !

**दी०**—आचार्य ! तुम्ही घाबरण्याचं कारण नाहीं. अब्रू ठार होण्याचा प्रसंग आला होता एवढं मात्र खरं ! हा प्रकार एकांतात झाला एवढं तरी बरं झालं. नाहीं तर हें तोंड जगांत दाखविण्याची सोय राहिली नसती ! पण द्रव्यानें बचाव केला हो ! तस्मात्, हे द्रव्या ! तुला नमस्कार असो !

**आ०**— दीक्षित ! आपलं प्रसंगावधान खरोखर अवर्णनीय आहे ! त्यामुळें माझाही थोडा बचाव झाला !

**दी०**—तरी मला वाटलंच तुम्ही थोडं घाबरलां म्हणून ! मला त्यांत कांहींच वाटलं नाहीं ! पाहिलंत ना कसं चुटकीसरसं प्रकरण मिटवलं तें !

**आ०**—मला हें खचित साधलं नसतं बोवा !

**दी०**—शंका कशाला पाहिजे ! अशा प्रसंगीं तुम्हांला वेड लागलं असतं वेड ! तुमचीं हीं कामं नव्हत ! परमेश्वर करुणा–सागर आहे असं म्हणतात तें-ही कांहीं खोटं नाहीं ! त्यानं प्रत्येक वस्तूंत कांहीं तरी व्यंग ठेविलं आहे. त्यानें बायकांत डागिन्याची मनस्वी हाव ठेविली आहे. ही किती तरी पुरुष म्हणविणारांचा बचाव करिते ! याचा फायदा मला कसा अचानक मिळाला ! माझ्यासारख्या साठी उलटलेल्या वृद्धाला तरुण बायको वांकविण्याच्या कामीं

डागिन्याचा भार कशी मदत करितो हें तुम्हीं आतांच पाहिलं आहे. परमेश्व-रानें या दिक्षिताला अत्यंत संपन्न स्थितींत ठेविलं आहे. हे त्याचे केवढे उपकार आहेत ! अस्तु. मग काय ? बोला ! माझ्याकडे पहा आचार्य ! तुम्हांला कांहीं तीन बायका करावयाला सांगत नाहीं ! घाबरूं नका. तुमची धमक पाहूनच तुमच्याशीं बोलत आहें. मागें पुढें पाहूं नका. द्या लग्न ठोकून ! म्हणजे घरांत लक्ष्मी आली, सोय झाली, कर्मकथा आटोपली ! हातांत पैसा असून अशी अवदसा तुम्हांला कशी आठवली ? शिवाय, माझ्याप्रमाणें तुह्मांलाही या बाबतींत धर्मशास्त्र कांहीं आडवं येत नाहीं. ही केवढी समाधानाची गोष्ट आहे ! मग काय ? बोला. आहे तयारी ? बोला; याच बैठकीला. तें पागोटें ठेवा अंमळ काढून खालीं पाहूं. त्याच्या ओझ्याखालीं विचार दडपून जातो सगळा ! ही तपकिरीची चुट्टी ओढा जोरानें एकदा ! म्हणजे डोकें साफ होऊन जाईल, म्हणतों ! हें पहा, येथें जुन्या राजवाड्याच्या पिछाडीला भुवनेश्वरीच्या मंदिराजवळ तो पिलंभट गलगले राहतो. त्याची मुलगी आहे. तिच्याकरतां स्थळं पाहून पाहून तो बिचारा अगदीं मेटाकुटीला आला आहे ! गरीबीपुढें त्याचा नाइलाज आहे ! पण मुलगी म्हणजे काय आहे ! दाणा आहे नुसता, दाणा ! सणसणीत सणंग ! तिच्या गरीबिशीं तुम्हांला काय करावयाचं आहे ? तुमच्या पदरीं पडून तीच उलट श्रीमंत होणार ! पिलंभट आपल्या अर्ध्या वचनांत आहे. तुम्ही हुकार भरण्याचा उशीर, कीं तो डोळे मिटून आपली मुलगी तुमच्या पदरांत टाकील. मग, बोला काय विचार तो !

आ०—कोणीही डोळे मिटूनच मला मुलगी दिली तर देईल ! डोळे उघडे ठेवून मला मुलगी कोणीच देणार नाहीं ! पैशाची वाण नाहीं तरी वयाचें मान मला आडवं येणार आहे ! शिवाय मुलीचा सणसणितपणा तिच्या बापाला किंवा तुमच्या सारख्या आप्ताला प्रशंसनीय गुण वाटला तरी त्याचं अभिनंदन करण्याची ताकद माझ्या अंगांत उरली नाहीं ही खेदाची गोष्ट आहे ! तुमचा प्रपंच पैशानें खूप रंगला आहे एवढं मात्र खरं !

दी०—म्हणूनच म्हणतों. माझ्याकडे पाहून तरी लग्न ठोका ! कां उगीच जीवाला कष्ट देतां ?

आ०--तुमच्याकडे आतांपर्यंत पाहिलंच कीं ! आणि म्हणूनच प्रपंचरंगाला नमस्कार ठोकण्याचा निश्चय मीं कायम केला आहे.

**दी०**—आचार्य ! व्यवहारशून्यतेबरोबर घावरटपणा हाही तुमच्यामध्यें बराच दिसतो आहे ! असा धीर सोडूं नका. तुमचं वय कांहीं साठीच्या बाहेर फारसं गेलं नाहीं. आणि गेलं असलं म्हणून काय झालं ! लोकांना याची उठाठेव कुणीं सांगितली आहे ! या जगांत लक्ष्मी व विद्वत्ता यांनाच वास्तविक अधिक मान पाहिजे द्यावयाला. नुसतं वय घेऊन करावयाचं काय ? माझ्या मतें लग्नाच्या बाबतींत लक्ष्मीला वीस गुण, विद्येला दाहा गुण व वयाला सहा गुण असावे. म्हणजे, आलं का लक्ष्यांत काय तें ? नुसत्या लक्ष्मीच्या बळावर देखील लग्न ग्राह्य कोटींत सहज येतं ! काय समजलां आचार्य !

**आ०**—मला लग्नाच्या फंदांतच पडावयाचं नाहीं. मग मला तुमचं हें गुणांचं कोष्टक करायचं काय ?

**दी०**—तुमचा हा वेदांत आम्हांला सुचत नाहीं, रुचत नाहीं व पचतही नाहीं बोवा ! बरं; तो विषय द्या सोडून तर मग आतां ! शिवपार्वतींच्या विवाहाची मौज मोठी अपूर्व होती नाहीं ?

**आ०**—होय, मला ती पहावयास सांपडली हें माझं मोठं भाग्यच मी समजतों !

**दी०**—लोक म्हणतात या उत्सवानें अमरावती व वैकुंठ यांनाही मागें टाकिलं.

**आ०**— असेल ! मी स्वर्गास किंवा वैकुंठास अद्यापि गेलों नसल्यानें मला त्याची नीटशी कल्पना होत नाहीं !

**दी०**—नगरच्या सीमेवर महाराजांनीं वराचं स्वागत केलं व पुढें वराची स्वारी हत्तीवर बसून मिरवत राजवाड्यांत आली, तेव्हांचा थाट कसा उडाला आठवतं काय ?

**आ०**—तो काय विचारावा ! तो वर्णन करावयाला सुरगुरूंची वाणीच समर्थ होईल.

**दी०**—अगदीं खरं ! ( तपकीर ओढून ) बरं आहे, आचार्य ! स्नानाची वेळ झाली. पण एक सांगतों, येथल्या गोष्टी येथेंच हो !

**आ०**—त्याविषयीं काळजी नको ! येथल्या गोष्टी बाहेर नाहींच दिसावयाच्या! येतों दीक्षित ! [ जातात. पडदा पडतो. ]

---

२२६९८.०१

## प्रवेश चवथा.

( स्थळ:—कैलास-मार्ग; पात्रें:-विद्याधर व प्रियंवद )

**विद्याधर**—प्रियंवदा ! कोणकिडे निघालास !

**प्रियंवद**—आज हिमवानाच्या राजधानींत आनंदविलास नाटकगृहांत नवीन वधूवर उमामहेश्वर यांच्या सम्मानार्थ देवांगना नाटकप्रयोग करणार आहेत, तिकडे चाललों आहें.

**वि०**—अरे वा ! मी पण तिकडेच निघालों आहें ! आज देवेंद्र वगैरेसुद्धां प्रयोग पाहण्याला येणार आहेत म्हणतात. तेव्हां अप्सरा आपलं कसब आज पूर्णपणें दाखावितील व प्रयोग मोठा बहारीचा होईल असं वाटतं.

**प्रि०**—यांत काय शंका आहे ! म्हणून तर मीं जावयाचा विचार ठरविला.

**वि०**—अरे ! शिवाच्या विवाहांत तूं कुठें दिसला नाहींस हें कसं ?

**प्रि०**—कुबेराच्या नगरींत मी एका कामांत गुंतलों होतों. पण वराची कैलासापासून तो ओषधिप्रस्थापर्यंतची मोठ्या थाटाची मिरवणूक मात्र मला पहावयाला सांपडली बुवा !

**वि०**—मला राजधानींतली तेवढी पहावयाला मिळाली. फारच दिव्य व अपूर्व होती यांत संशय नाहीं. माझ्या तर डोळ्यांचं पारणं फिटलं बुवा ! आकाशमार्गांतली मिरवणूकही तशीच किंबहुना त्यापेक्षांही प्रेक्षणीय असली पाहिजे. कारण शिवाचं वैभव अचिंतनीय आहे !

**प्रि०**—तुझा तर्क अगदीं बरोबर आहे. मी ती हकीकत सांगतों, ऐक तर मग. आर्या अरुंधती व भगवान् वसिष्ठ मुनी पार्वतीला मागणं घालण्याकरितां शिवाकडून हिमवानाकडे गेले होते, हें तुला ठाऊक असेलच ?

**वि०**—होय, ही बातमी कानावर आली होती.

**प्रि०**—पुढें वसिष्ठानीं हिमवानापाशीं महेश्वराकरितां पार्वतीची याचना केली. ती महाराजांनीं मान्य केली; व शिवाची भावी पत्नी म्हणून त्यांनीं पार्वतीला अरुंधतीच्या ओटींत घातलं. याप्रमाणें वाङ्निश्चय झाला. पुढें महाराजांनीं लग्न-मुहूर्त विचारला. तेव्हां वसिष्ठ म्हणाले, मुहूर्त आजपासून तीन दिवसांनीं आहे. त्यावर वसिष्ठ अरुंधतीसह निघून गेले व त्यांनीं झालेला वृत्तांत कैलासपर्वतावर शिवास निवेदन केला.

वि०–या बाबतींत शिवानीं लोकसंग्रहाकरितां अगदीं लौकिक पद्धतीचं अनुकरण केलं.

प्रि०–एवढंच नव्हे, तर सगळा लग्नसोहळा लौकिक रीतींचाच झाला असं ऐकतों.

चि०–होय. तें अगदीं खरं आहे. बरं. आतां वर-यात्रेची हकीकत सांग कीं.

प्रि०–मग मुहूर्तदिवशीं कैलासपर्वतावर शिवाच्या आश्रमांत ब्राह्मीप्रभृति सप्त मातृका आल्या. त्यांनीं पाणिग्रहणाला योग्य अशी अलंकार–सामग्री व पुष्कळ मंगलवस्तु शिवापुढें ठेविल्या.

वि०–महाभाग्यशालीच तो !

प्रि०–शिवानें संमानपूर्वक त्या वस्तूंना स्पर्श मात्र केला; त्यांचा स्वीकार केला नाहीं. पण चमत्कार असा झाला कीं शिवाचा नेहमींचाच वेप एकाएकीं विलक्षण रीतीनें बदलून गेला !

वि०–केवढा चमत्कार हा ! हें तपाचं बल कीं ही मानसी सिद्धि ?

प्रि०–तें आपणांसारख्या प्राकृत जनास काय समजणार ? त्यानें अंगाला चर्चिलेलं भस्म चंदनचूर्णाप्रमाणं दिसूं लागलं. त्याची कपाल–माला शिरोभूषणा-सारखी चमकूं लागली. गजाजिनाला रेशमी वस्त्राची शोभा आली. त्याच्या पदरावरील रंगवल्ली कलहंसासारखी झळकूं लागली !

वि०–स्मशानाचं मंदिरच झालं म्हणावयाचं !

प्रि०–त्याच्या कपाळावर तृतीय नयन होतें तें त्याच्या मुखश्रीवरील तिल-कासारखं विलसूं लागलं. अंगावरील भुजंगरत्नांनीं वराचं शरीर उज्ज्वल करून सोडिलं. निष्कलंक चंद्राची कोर मस्तकावर मिरवत असल्यानें इतर अलंकारांची तेथें प्रतिष्ठाच राहिली नाहीं.

वि०–खरंच आहे.

प्रि०–त्या प्रभावशाली महानटानं असा उज्ज्वल वेष स्वीकारल्यावर प्रमथा-दिगणांनीं त्याच्यापुढं नीलसलिल–धारेचा खड्ग ठेविला. त्यांत त्या वीरानें आपलं प्रतिबिंब पाहिलं.

वि०—वीरांचा असाच परिपाठ आहे.

प्रि०—नंतर ज्याच्या विशाल पृष्ठावर शार्दूलचर्म घातलं आहे अशा नंदि-केश्वरावर वराची स्वारी आरूढ झाली. नंदिकेश्वर पांढरा शुभ्र असल्यामुळें जणूं

काय वराची स्वारी कैलासावर विराजमान झाली असें प्रेक्षकांना वाटलं. याप्रमाणें वर चालूं लागला.

**वि०**—आणि वराच्या मागेंपुढें कुणीच नव्हतं वाटतं !

**प्रि०**—वा: ! नाहीं कसं ! ज्यांच्या कानांतील सुवर्णकुंडलं तळपत आहेत अशा सप्तमातृका मोठ्या लगबगीनें वराच्या मागून चालूं लागल्या. त्यांच्या देदीप्यमान प्रभामंडळानें त्या अरुणवर्ण दिसत होत्या. त्यांच्या प्रसन्न मुखकमलानीं आकाशाला सुंदर पद्माकराचं स्वरूप प्राप्त झालं होतं !

**वि०**—साध्वींचा महिमा असाच आहे.

**प्रि०**—वराच्या पुढें त्याचा प्रमथादि गण चालला होता. त्यांनीं मंगलवाद्यांचा महाघोष सुरू केला. विमानांत संचरणाऱ्या देवांच्या कानांवर तो जाऊन थडकला तेव्हां ते वरसेवेला सादर झाले.

**वि०**—योग्यच आहे.

**प्रि०**—भगवान् सहस्ररश्मी सूर्यानें, विश्वकर्म्यानें नवीन तयार केलेलं, शुभ्र छत्र, वरावर धरिलं. त्यावेळीं शिवाच्या मस्तकावर गंगेचा परमपवित्र व शुभ्र प्रवाहच अवतीर्ण झाला असा भास झाला !

**वि०**–अलौकिक गोष्ट !

**प्रि०**–मग गंगायमुनांनीं देहधारी होऊन वरावर चामरं ढाळलीं !

**वि०**–याला म्हणावं भाग्य !

**प्रि०**–नंतर भगवान् ब्रह्मदेव व श्रीवत्सांक पुराणपुरुष विष्णु हे वराला सामोरे आले, आणि त्यांनीं शिव–नांवाचा मोठ्यानें जयजयकार केला.

**वि०**–हविर्द्रव्यानें जसा अग्नीचा प्रभाव वाढवावा तसंच हें झालं !

**प्रि०**–एकच मूर्ति तीन रूपांनीं प्रगट झाली म्हणावयाची ! हरिहरविरिंचीं यांतील ज्येष्ठकनिष्ठभाव कांहींच समजेनासा झाला !

**वि०**–या संबंधांत तत्त्ववेत्त्यांचा देखील घोटाळा उडावयाचा मग सामान्य जनांची दृष्टि भ्रांत झाल्यास नवल तें कसलं ?

**प्रि०**–मग इंद्रादिक लोकपाल नम्र वेषानें पुढें आले व त्यांनीं शिवाला प्रणाम केला. शिवानें मस्तक हालवून ब्रह्मदेवाची संभावना केली, विष्णूशीं चार शब्द बोलून त्याचा बहुमान केला, इंद्राकडे स्मितपूर्वक पाहून त्याचं अभिनंदन केल व देवगणांवर केवळ कटाक्षांचाच अनुग्रह केला !

**वि०**—अहो ! शिवाचं चातुर्य व वैभव हीं दोन्हीं यांत एकदमच दिसून येतात!

**प्रि०**—मग वसिष्ठ वगैरे सप्तर्षींनीं ‘ जय जय ! ’ असा शब्द करून शिवास आशीर्वाद दिला. शिवानें नम्रतापूर्वक त्याचा स्वीकार केला व त्यांस म्हटलें, ‘ मुनिवर्यां ! आपण आरंभिलेल्या विवाहयज्ञामध्यें अध्वर्युत्व पतकरण्याविषयीं यापूर्वीच मीं आपणांस प्रार्थना केली आहे; ती कृपा करून लक्ष्यांत असावी. ’ सप्तर्षींनीं ती प्रणामपूर्वक मान्य केली.

**वि०**—योग्यांचा योग्य मान झाला !

**प्रि०**—नंतर पुढल्या बाजूला विश्वावसु वगैरे गंधर्वांचें त्रिपुर–विजयासंबंधाचं गान सुरू आहे; नंदिकेश्वराच्या गळ्यांतील सुवर्णघंटिकांचा घणघणाट चालला आहे; अशा थाटानें भगवान् शिव लवकरच ओषधिप्रस्थ नगराच्या जवळील भूप्रदेशावर येऊन उतरले. त्यासरशीं हिमवान् महाराज आपल्या बंधुजनांसह गजारूढ होऊन त्यास सामोरे गेले. नगराच्या द्वाराशीं देव व महीधर यांचे प्रचंड ओघ आनंदघोष करीत एकमेकांत मिसळून गेले. त्यामुळें गंगायमुनांच्या असंख्य तरल तरंगांच्या संगमाची त्यास शोभा आली ! त्रैलोक्यवंद्य शिवानें हिमवानास विनीतपणें वंदन केलं ! तेव्हां महाराज हिमवान् यास फार संकोच वाटला असं दिसलं. पुढें हत्तीवर आरूढ झालेल्या वराचा नगरप्रवेश व राजमंदिरप्रवेश तूं पाहिलाच आहेस ?

**वि०**—होय. असा प्रसंग पहिलाच व शेवटलाच असं म्हटलं तरी चालेल ! लग्नविधि झाल्यावर तरी केवढा उदात्त देखावा दिसला !

**प्रि०**-तो कसा सांग पाहूं ?

**वि०**—लक्ष्मीनारायणस्वरूप वधूवरांनीं पद्मासनावर बसलेल्या पितामहास नमस्कार केला. तेव्हां त्यानें पार्वतीला म्हटलं, ‘ कल्याणि ! तूं वीरमाता हो. ’ पण अष्टमूर्ती परमेश्वराला काय आशीर्वाद द्यावा याची त्यास मोठीच पंचाईत पडली !

**प्रि०**—वस्तुतः उभयतां एकच. पण ही लौकिक दृष्टि पहा कशी ती !

**वि०**—या अलौकिक दंपतींवर मंगलाक्षतांची वृष्टि होत असतां स्वतां लक्ष्मीनें त्यांवर कमलांचं छत्र धरलं !

**प्रि०**—केवढा मान हा !

**वि०**—सरस्वतीनें तर मौजच केली. तिनें वराला संस्कृतांत व वधूला प्राकृतांत आशीर्वाद दिला !

**प्रि०**—वाणीची अधिदेवताच ती !

**वि०**—बरें तर चला. नाटकाला उशीर होईल. (जातात. पडदा पडतो.)

---

## प्रवेश पांचवा.

(स्थल—ओषधिप्रस्थांतील राजमहाल; पात्रें—शिव व पार्वती.)

**शि०**—सुंदरि ! तुझी परीक्षा पाहण्याकरितां मीं तुला पराकाष्ठेचे क्लेश दिले याबद्दल मला फार फार खेद वाटत आहे. ही गोष्ट तूं मनांत ठेवूं नकोस अशी तुला माझी प्रार्थना आहे.

(राग देशी, ताल त्रिमातिताला.)

क्षमा करीं प्राणेश्वरी ! तव तनुला शिणविलें मीं अदय ॥ ध्रु०
विसरुनि जाईं सगळें, दयिते ! तें, अनुतप्त मन सखये ! ॥ १

**पा०**—(हंसून) इकडल्या कसोटीला मी उतरल्यें यामुळं माझ्या मनाला तर फार समाधान वाटत आहे. या संबंधानें माझ्या मातापित्यांनाही मोठा आनंद झाला आहे व धन्यता वाटत आहे.

**शि०**—हा त्यांच्या मनाचा थोरपणा आहे.

**पा०**—आलेले पाहुणे परत जाऊं लागले यामुळें बाबांना व आईला फार वाईट वाटत आहे. मी आतां त्यांच्यापासून लवकरच दूर होणार यामुळं त्यांच्या मनाला अस्वस्थता उत्पन्न झाली आहे. आईला तर माझ्याशिवाय क्षणभरही करमणार नाहीं !

(राग कालंगडा, ता० दीपचंदी.)

विरह हा मम कसा साहिल आई, तातहि नाथा ? ॥ धृ० ॥
ते होतिल शोकें व्याकुल, गा ! कोण त्या शांतवी प्रिया आतां ?

**शि०**—हा संसार असाच मोहमय आहे. आपणांवर असेच प्रसंग पुढें येतील कदाचित् ! इष्टांचे संयोग-वियोग आनंद-खेदांचे उमाळे उत्पन्न करतात. तथापि विवेकाच्या दृष्टीनें यांत कांहींच नाहीं.

**पा०**—आज आपणांस बाबांचा निरोप घ्यावयास जावयाचं आहे. तेथें आर्या अरुंधती व भगवान् वसिष्ठमुनि यावयाचे आहेत. आपणांस अनायासें त्यांच्या दर्शनाचा लाभ होईल व आशीर्वादही मिळेल.

**शि०**—हा मोठा अभीष्ट योग आहे.

**पा०**—पण दादा कां बरं येत नाहीं अजून ? वहिनींसह त्याला इकडे बोलाबलं आहे. बाकी स्वारी आहे लहरीच !

**शि०**—ही दादांची स्वारी आलीच वाटतं ! ( मैनाक व भुवनसुंदरी येतात. शिवपार्वती त्यांस वंदन करितात.)

**मै०**—( शिवास ) महाराज ! नमस्कार घेण्याचा मान आपला आहे व करण्याचा हक्क आमचा आहे. आतां ताईची थट्टा मात्र करतां कामा नये हो !

**पा०**—दादा ! व्यवहाराच्या दृष्टीनें नमस्कार घेण्याचा मान तुझाच आहे; आणि त्याच दृष्टीनें थट्टा करण्याचाही तुला हक्क आहे. मला खचित ठाऊक आहे, तुला विनोद केल्याखेरीज चैनच पडावयाचं नाहीं !

**मै०**—तुला राग न येईल तर करीनही म्हणा.

**शि०**—दादा ! खरोखर चार दिवस आमच्या कैलासावर चलाल का ? तेथली मौज कांहीं विशेष आहे. तुम्ही आलांत तर आमची मोठीच करमणूक होईल. पण वहिनींना सुद्धां घेऊन यावयाचं हो ! कां वहिनी, आहे ना तयारी !

**भु०**-( लाजून ) कैलासदर्शन मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. त्यांतून आपल्या पुण्यचरणांचा सहवास तर परम भाग्याचं फल आहे. तें आयतं प्राप्त झाल्यास कोण दवडणार !

**मै०**—अहो पण, तुमच्या त्या नंदिकेश्वरावर आपण नाहीं बसणार बोवा ! व आपणांसही बसूं देणार नाहीं ! आमच्या या नगरांत त्या नंदीचं प्रदर्शन झालं नाहीं हें बरं झालं. नाहीं तर चहूंकडे हंसं झालं असतं ! बाकी आमच्या ताईला हें वाहन पसंत असेल असं वाटतं !

**पा०**—दादा ! आज तूं नंदिकेश्वराला हंसत आहेस. पण एकदा कैलास तर पाहून ये. म्हणजे त्याचीच स्तुति करावयाला लागशील !

**मै०**-ताई ! इतक्यांतच तूं तिकडल्या वाटेल त्या वस्तूची स्तुति करायला लागलीस आं ! आजपर्यंत तूं कधीं नंदीबैलावर एकदा तरी बसलीस का ?

बाबांनीं तुझ्याकरितां हत्ती व पालख्या यांचीच तरतूद केलेली आहे. नंदीवर बसण्याची तुझी हौस कधीं कोणाच्या नजरेस पडली नाहीं आजपर्यंत! आतां तुला कैलासाकडील सगळंच प्रिय वाटायचं! यांत कांहीं नवल नाहीं म्हणा! आपलेपणा उत्पन्न झाला म्हणजे झोंपडी देखील राजवाडा वाटूं लागते!

पा०—दादा! तुला इकुडच्या वैभवाची व ऐश्वर्याची खरी कल्पनाच नाहीं, म्हणून तूं असं बोलतोस.

शि०–( हंसून ) हा तुमचा बंधुभगिनींचा संवाद मोठा मनोरंजक आहे. दादा! मला वाटतं तुमचंच म्हणणं बरोबर आहे. गांवढळासारखं नंदीवर बसणं खरोखर हास्यास्पद आहे. पण मी तपोवनांत राहणारा व तपश्चर्या करणारा असल्यामुळें मला राजवाड्यांतल्या उपभोगांच्या सवई नाहींत. रानांतलीं कंदमूलं खावीं, वल्कलं नेसावीं, झऱ्याचं पाणी प्यावं, मृगाजिनावर पडावं, तीर्थांत स्नान करावं, भगवदुपासना करावी; ही आमची दिनचर्या! हरिण, गाई, बैल, इत्यादि आमचे परम प्रिय बांधव होत. म्हणून आमची नंदीवर फार भक्ति! हा तुमच्या दृष्टीनें अर्थात् विक्षिप्तपणाच असणार! पण आमची राहणीच रानांतल्या पशूंसारखी! आमची व तुम्हां नागरिकांची या बाबतींत तुलना करतां येणार नाहीं. तुमच्या बहिणीला मात्र आरंभीं आरंभीं हें थोडं जडच जाईल, नव्हे!

मै०—छे छे! ती तपश्चर्या कर करून या कामांत पटाईत झाली आहे! आम्हांला मात्र तपोवनाची राहटी मानवणार नाहीं हें खरं आहे.

शि०—बरें तर मग, करा तयारी कैलासाची!

मै०—माझी हरकत नाहीं. पण बाबा याच वेळेला मला धाडतील किंवा नाहीं याची शंका आहे. कारण राज्यकारभाराचीं कांहीं महत्त्वाचीं कामं तुंबून राहिलीं आहेत. बाकी, आपण म्हटलं तर बाबा नाहीं नाहींच म्हणणार.

शि० – हिमवान् महाराजांची अडचण मी कधींच करणार नाहीं. त्यांच्या इच्छेप्रमाणें पुढं मागें केव्हां तरी तुमचा योग जुळवून आणूं. ( बाजूला पाहून ) ओहो! विजयाबाई! आणि विजयसेनही! या या! ( शिवपार्वतींस वंदन करून )

**विजया** माझ्या सखीला त्रैलोक्यनाथ भगवान् शिव पति मिळाला हें पाहून मला फार आनंद वाटत आहे. तिचं सर्वप्रकारांनीं कल्याण होवो!

**विजयसेन**—माझ्या प्रियेमुळें जगज्जननी अंबिका व त्रिभुवनवंद्य चंद्रमौळी यांच्याशीं माझा स्नेहसंबंध जडला हें माझें मोठें भाग्य आहे!

**पा०**—विजये! आज आपण पाहतों हें काय स्वप्न, कीं माया, कीं भ्रम कीं सत्य याचा उलगडा माझ्या मनाला होत नाहीं बाई! इतका त्याचा गोंधळ उडाला आहे! आनंदप्रसंगांचं हें संमेलन मनाला किती तरी मोह पाडीत आहे!

**विजया**—सखे, आनंदाचीं पर्वं एकामागून एक अशीं येऊं लागलीं म्हणजे मनाची वृत्ति अशीच होते खरी.

**शि०**—दादा! वहिनी! विजये, विजयसेना! काल आपण अप्सरांचं नाटक पाहिलं तें आजच्या या मधुर संमेलनापुढें अगदीं फिक्कं होतं नाहीं बरें?

**मै०**—खरोखरीच तसं.

**पा०**—चला, बाबांकडे जाण्याची वेळ झाली. ते वाट पहात असतील.

[ जातात ]

---

## प्रवेश सहावा

( स्थल—कांचन-प्रासादांतील हीरकमहाल. पात्रें—हिमवान्, मेना, वसिष्ठ, अरुंधती, शिव, पार्वती, विजया, विजयसेन, मैनाक, भुवनसुंदरी इ० )

( प्रवेश करून ) कंचुकी–( स्वगत ) भगवान् वसिष्ठ व आर्या अरुंधती यांना कांचन-प्रासादाच्या हीरक-महालाकडे घेऊन ये अशी महाराजांची आज्ञा झाली आहे; म्हणून मी मुनिवर्यांची वाट पाहात आहें. (बाजूला पाहून) अरे! हें तेज कुणाचं फांकलं आहे! ( निरखून पाहून ) ही आर्या अरुन्धती यांत शंका नाहीं. आणि ते, शांतीचें देदीप्यमान धाम, वसिष्ठ होत. ( उभयतां प्रवेश करितात त्यांस ) या मुनिवर्य! या अरुंधती माई! चला असं माझ्या मागें. ( थोडें चालून ) मुनिवर्या! हे पहा आमचे महाराज आपल्या पत्नीसह, सकल नूतन दंपतींसह व सर्व परिवारासह आपल्या दर्शनाची उत्कंठेनें वाट पहात आहेत. ( पुढें होऊन राजाला प्रणाम करून ) महाराज! हे मुनिवर्य सपत्नीक आले आहेत. ( सर्व उभे राहून उभयतांस वंदन करितात. राजानें दर्शविलेल्या उच्च आसनावर मुनि व त्यांची भार्या बसतात. इतर सर्व आपआपल्या आसनांवर बसतात. )

**हिमवान्**—( मुनींस हात जोडून ) महाराज ! आपल्या आगमनानं, दर्शनानं व आपण घडवून आणलेल्या या पवित्र संबंधामुळें आम्हीं अगदीं कृतकृत्य झालों आहों !

[illegible]—अरे ! सगळें विश्व या मंगल विवाहामुळें धन्य झालें आहे. तूं मोठा भाग्यवान् तशीच आर्या मेनकाही मोठीच भाग्यशाली आहे. कारण त्रैलोक्यनाथ तुमचा जामाता झाला आहे.

**अरुन्धती** – आर्ये मेनके ! तुमचं ऐश्वर्य अखंड कायम राहो; व तुमच्या जामात्याचा सर्वत्र विजय असो !

**शिव** —भगवन्, या दासावर आपला अनुग्रह आहेच. तो सदैव तसाच असावा अशी प्रार्थना आहे.

( राग भैरवी, ताल दीपचंदी. )

**पा०**—

मुनिजाये, तव पी ही कन्या, करिं हिला आशीर्वादें धन्या ॥ ध्रु० ॥

कृपाछत्र तव मंगल शिरिं या असो ! इच्छा नच अन्या ॥ १ ॥

**वसिष्ठ**—हे चन्द्रमौलि ! तूं इतरांच्या प्रसादाविषयीं अगदीं निरपेक्ष आहेस हें मी जाणतों. तसाच तूं स्वयंसमर्थ, विभु व ऐश्वर्यशाली आहेस याची जाणीव मला पूर्ण आहे. तथापि आम्हां वडील माणसांचा तुला आशीर्वाद असणें उचित आहे. तुला महापराक्रमी पुत्र होऊन तो त्रिभुवनाचा तारक होवो !

**अरुन्धती**—बाळे पार्वती ! वीरमाता हो, जगांत धन्य हो.

**वसिष्ठ**—मैनाका ! त्रिभुवनसुंदरी ! विजये ! विजयसेना ! हा शिवविवाह म्हणजे विश्वाचं मंगल आहे. सर्व जगाला हें विश्वमंगल आदर्शभूत आहे हें लक्षांत ठेवा.

**सर्व०**—( नम्र होऊन ) मुनिवर्यांचं वचन योग्य व मान्य आहे.

**हिम०** –महाराज ! पुन्हां आपल्या उभयतांच्या दर्शनाचा लवकर लाभ व्हावा अशी आमची फार इच्छा आहे.

**व०**—राजा, ती लवकरच सफल होईल. या नूतन दंपतीला मंगलप्रद अपत्ययोग सत्वर येणार आहे. आपला अतुलपराक्रमी नातू कुमार अथवा कार्तिकेय याच्या मुखदर्शनाचा लाभ आपणां सर्वांस व्हावयाचा आहे. त्यावेळीं आपण

सगळे पुन्हां मोठ्या आनंदानें एके ठिकाणीं जमूं. आणखी तुझं कांहीं प्रिय असेल तर असें होवो !

( राग विभास, ताल दादरा )

विलसो तें शारदीय सततच या तेज भूवरी ।। ध्रुं० ।।
ज्ञानाचा विजय असो । सत्याचा पंथ दिसो ।
सद्धर्मी प्रीति वसो । मनिं खरोखरी ।। १ ।।
प्रेमाची दिव्य ज्योति । वीर्याची वैजयन्ती ।
स्फुरण पावुं शील–कांति । जनपदांतरीं ! ।। २ ।।

**हिम०**––तथास्तु !

( सर्व जातात. पडदा पडतो. नाटक संपतें. )

पांचवा अंक समाप्त.

ग्रंथालय ठाणे
दा. क्र. 2258

म. ग्रं. सं. ठाणें
संग्रहालय क्रमां

| | | | |
|---|---|---|---|
| | | दवाचा | देवाचा |
| | | गेड | गडे |
| | | उडवितात | उठवितात |
| | | तोडून | तोडून |
| ६३ | ३ | समज | समजतो |
| ६३ | १५ | शरें स्त्री | शरें तशी स्त्री |
| | २३ | मासतो | भासतो |
| ६४ | १० | मेनक | मेनका |
| ७२ | २९ | लाकात्तर | लोकोत्तर |
| ७ | १५ | होव | हे.वे। |
| | २५ | ( तिच्याकडे न्याहाळून पाहून | ( तिच्याकडे न्याहाळून पाहून ) |
| ० | २७ | मेनेकडे वळून ) | ( मेनेकडे वळून ) |
| ३ | ४ | सकल | सफल |
| | ७ | मांडिवर | मांडीवर |
| | १४ | कंपिलाचार्य | कपिलाचार्य. |
| | १३ | ‘ तुला आणि मला ’ | ‘ तुला नाहीं म्हटलं ! |